मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय अधिक भाद्रपद-आश्विन-कार्तिक-मार्गशीर्ष शके १९४५

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२४/खंड ४८, अंक ३

## ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(यु.जी.सी. केअर लिस्ट (ग्रुप१) समावेशीत तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२४ / खंड ४८ / अंक ३

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०२२-२५)**
**संतोष दास्ताने**
**मुक्ता जहागिरदार**
**के. के. पाटील**
**एस. एम. भोसले**

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. **राहुल शं. म्होपरे**
संपादकीय .................................................... १९५

२. **किशोर गजाजन सुतार, गणेश आदिनाथ टेकळे**
सात्विक संपत्ती निर्मितीचा आदर्शः रतन टाटा .................... १९७

३. **किशोर बी. मेंढे, निलोफर एस. शेख**
अर्थशास्त्राचे २०२४ चे नोबेल पारितोषिक :
काही राष्ट्रे इतरांपेक्षा मागे का आहेत? .......................... २०५

४. **सुरज रामचंद्र चिगरे, रोहिदास अर्जुन अभंगे**
डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान .................... २१४

५. **रेवप्पा सिद्धप्पा कोळी, युवराज रेवणसिद्ध सोलापूरे**
किमान आधारभूत किमती व शेतमजुरांच्या
मजुरी दरातील वाढीचा तुलनात्मक अभ्यास .................... २२४

६. **रोहन रविराज बावडेकर, नम्रता नरेश पाटील**
विकसनशील देशांच्या कृषिक्षेत्रावर होणारा
हवामान बदलाचा आर्थिक प्रभाव आणि अनुकूलन धोरणे....... २३२

७. **प्राची मिलिंद साळुंखे, निकिता व्यंकटेश धवन**
सामाजिक संरचनांतर्गत आरोग्य व शिक्षणक्षेत्राची
वास्तवता आणि आव्हाने.......................................२४१

८. **शीतल मोहन कदम, प्रज्ञा शरद लाड**
प्रधानमंत्री जनधन योजनेचे समीक्षात्मक मूल्यमापन............. २५०

९. **वनिता केरुजी बनकर, रोहिदास शेकू जाधव**
झोपडपट्टीतील स्त्रियांची अवस्था : विशेष संदर्भ मराठवाडा ..... २६०

१०. **हरिभाऊ सामा खरात, स्नेहल नितेश जाधव**
सामाजिक संरचना आरोग्य आणि शिक्षण ........................२६७

११. **केशव नागोराव देशमुख, राणी नवनाथराव पावडे**
महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय
समितीच्या अहवालाचे मूल्यमापनः एक टिपण ..................२७४

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०२४-२५

- **अध्यक्ष**

  **अनिलकुमार कृ. वावरे (सातारा)**

- **कार्याध्यक्ष**

  **अविनाश रा. निकम (शहादा)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **विकास सुकाळे (नांदेड)**
  **विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)**
  **धोंडीराम पवार (पुणे)**

- **सदस्य**

  **संजय धनवटे (कारंजा)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **सुरेश घुमटकर (बीड)**
  **जयवंत इंगळे (मलकापूर)**
  **बाळासाहेब पाटील (पनवेल)**
  **सुभाष सावंत (नाशिक)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **जितेंद्र तलवारे (धुळे)**
  **विठ्ठल ठावरी (भिसी)**
  **राजू शिंदे (धुळे)**
  **हनुमंत भोसले (खामगाव)**

- **स्वीकृत सदस्य**

  **अजय दरेकर (बारामती)**
  **संजय धोंडे (मेढा)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **बालाजी घुटे (लातूर)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

  आजीव सदस्य : रु. ३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु. २०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक) रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# संपादकीय

जगाच्या पाठीवर सर्वच क्षेत्रात संशोधकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी जीवन सुसह्य आणि आनंददायी करण्यामध्ये संशोधकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अर्थशास्त्रसुद्धा याला अपवाद नाही. अर्थशास्त्रातील तथा अर्थव्यवस्थेतील विविध प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी संशोधक महत्त्वाची भूमिका बजावत असतो. नवीन विचार, नवीन सिद्धांत, नवोपक्रम, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक असा सर्वच प्रकारचा विकास हा त्या त्या देशातील संशोधकांवर अवलंबून असतो. किंबहुना संपूर्ण जगालाच कल्याणकारी दिशा देण्याचे काम संशोधक करीत असतो असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

या पार्श्वभूमीवर व यूजीसी व विविध विद्यापीठांच्या पीएच.डी. पदवी प्राप्त करण्यासाठी बदललेल्या नियमावलींच्या अनुषंगाने (उदा. पीएच.डी. पदवीसाठी युजीसी केअर लिस्ट जर्नलमध्ये लेख प्रकाशित असणे आवश्यक) संशोधकांना थोडी सुलभता निर्माण व्हावी; तसेच त्यांचे संशोधन लेखन वाचकांसमोर यावे या उद्देशाने सदरचा 'संशोधक विशेषांक' काढण्यात आलेला आहे. यापाठीमागे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद वाढविणे हा विचार देखील आहेच. ही बाब विशेषत्वाने नमूद करावी असे वाटते. कारण निमंत्रित लेख वगळता आपण अंकात फक्त आजीव सदस्यांचेच लेख प्रसिद्ध करतो.

प्रस्तुत अंकात महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमधील पीएच.डी. संशोधन करीत असलेल्या एकूण २० संशोधकांनी आपले लेखरूपी योगदान दिलेले आहे. हे योगदान देण्यामध्ये जशी त्यांची भूमिका महत्त्वाची आहे तशीच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकांची भूमिका देखील तेवढीच महत्त्वाची आहे असे मला वाटते. यामध्ये मला माझ्या स्वत:सह प्रा. (डॉ.) अनिल वावरे (सातारा), प्रा.(डॉ.) आर. बी. भांडवलकर (यवतमाळ), प्रा. (डॉ.) राजू पाटील (सोलापूर), प्रा. (डॉ.) बाळासाहेब पाटील (पनवेल), प्रा. (डॉ.) सुभाष पाटील (पुणे), प्रा. (डॉ.) प्रविण जाधव (पुणे), प्रा. (डॉ.) विकास सुकाळे (नांदेड), डॉ. समित माहोरे (नागपूर), प्रा. (डॉ.) जितेंद्र तलवारे (धुळे), डॉ. मारोती तेगमपुरे (अंबड) या सर्वच सहकारी प्राध्यापक मित्रांचा व मार्गदर्शकांचा नामोल्लेख करणे अत्यंत गरजेचे वाटते. कारण या सर्वांनीच आपआपल्या विद्यापीठातील संशोधकांकडून सदर अंकातील लेखांची मांडणी उत्कृष्ट पद्धतीने करण्यासाठी भरपूर कष्ट घेतले आहेत. तसेच संशोधक लेखकांना मौलिक मार्गदर्शनसुद्धा केलेले आहे. अर्थसंवादच्या सन्माननीय सल्लागार मंडळाने देखील सदर विशेषांक काढण्याच्या माझ्या कल्पनेला बळ आणि प्रोत्साहन दिलेले आहे, हे सांगणे गरजेचे आहे.

सदर विशेषांकात दोन संशोधक विद्यार्थ्यांनी मिळून लिहिलेला संयुक्त स्वरूपातील एक लेख याप्रमाणे एकूण १० उत्तम लेखांचा समावेश आहे. सदर लेख हे अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंवर तसेच चालू घडामोडींवर आधारित आहेत. यामध्ये पहिला लेख किशोर सुतार व गणेश टेकळे यांचा असून ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी दिवंगत झालेले महान उद्योगपती श्री. रतन टाटा यांच्यावर आधारित व्यष्टी अध्ययन आहे. सदर लेखात

संशोधकांनी श्री. रतन टाटांचा जीवनपट उलगडून त्यांची देशाच्या संपत्ती निर्मितीतील भूमिका विषद केली आहे. दुसरा लेख किशोर मेंढे व निलोफर शेख यांनी अर्थशास्त्राच्या २०२४ साली घोषित झालेल्या नोबेल पारितोषिकावर (डॅरेन एस मोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन) आधारित अभ्यासपूर्ण पद्धतीने लिहिलेला दिसून येतो. अंकातील तिसरा लेख हा सुरज चिगरे व रोहिदास अभंगे यांचा असून हे सुद्धा एक व्यष्टीअध्ययन आहे. भारताचे माजी पंतप्रधान व थोर अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या अर्थशास्त्रीय योगदानाबद्दल विस्तृत ऊहापोह सदर लेखात संशोधकांनी केलेला दिसून येतो. चौथा लेख रेवप्पा कोळी आणि युवराज सोलापुरे या संशोधकांचा असून दर लेखात संशोधक किमान आधारभूत किंमती व शेतमजुरांच्या मजुरी दरातील वाढीचा तौलनिक अभ्यास सांख्यिकीय तक्ते व आलेखांच्या माध्यमाने मांडण्यात यशस्वी झाल्याचे दिसून येते. पाचवा लेख राहन बावडेकर व नम्रता पाटील यांचा असून हा लेख हवामान बदलाचे आर्थिक प्रभाव आणि त्याला अनुकूल धोरणे अशा विकसनशील देशांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या वेगळ्या विषयावर आधारित आहे. सदर विषय संशोधकांनी प्रभावीपणे मांडलेला दिसून येतो. अंकातील सहावा लेख प्राची साळुंखे आणि निकीता धवन या महिला संशोधकांनी सामाजिक संरचनेवर आधारित मांडलेला आहे. यामध्ये त्यांनी सामाजिक संरचनेची भारताच्या व महाराष्ट्राच्या अनुषंगाने आरोग्य व शिक्षण क्षेत्राची वास्तवता मांडून या क्षेत्रापुढील आव्हाने नमूद केली आहेत. सातव्या लेखात शीतल कदम व पूजा लाड या महिला संशोधकांनी प्रधानमंत्री जनधन योजनेचे समीक्षणात्मक मूल्यमापन अत्यंत दर्जेदार पद्धतीने केलेले आहे. अंकातील आठवा लेख हा अत्यंत वेगळ्या धाटणीचा आहे. वनिता बनकर आणि रोहिदास जाधव यांनी या लेखाद्वारे मराठवाड्यातील झोपडपट्टीतील स्त्रियांची अवस्था अत्यंत चपखल व वाचनीय स्वरूपात अभ्यासकांसमोर मांडलेली आहे. नववा लेख हा सामाजिक संरचनेतील आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील वास्तविकतेचा आणि आव्हानांवर प्रकाश टाकणारा असून सदर लेख हरिभाऊ खरात व स्नेहल जाधव या संशोधकांनी लिहिलेला आहे. अंकातील अखेरचा आणि दहावा टिपणवजा लेख केशव देशमुख आणि राणी पावडे यांनी महाराष्ट्राचा समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवर आधारित अहवालाचे मूल्यमापन करणारा आहे.

अशा पद्धतीने महाराष्ट्रातील विविध १० विद्यापीठांमधील एकूण २० संशोधकांचा विशेषांक आपणासमोर सादर करताना प्रमुख संपादक या नात्याने मला मनस्वी खूप आनंद होत आहे.

अर्थसंवादच्या माध्यमातून गेली निरंतन ४७ वर्षे मराठी अर्थशास्त्र परिषद मराठी लेखकांचे आर्थिक प्रश्नावरील दर्जेदार लेखन देशभर पोचवित आहे. प्रमुख संपादक पदाची जबाबदारी (१ एप्रिल, २०१७) स्वीकारल्यापासून माझ्या कारकिर्दीतील हा पाचवा विशेषांक आहे. (पहिला विशेषांक म. अ. परिषदेच्या माजी अध्यक्षांचा, दुसरा विशेषांक महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुखांचा, तिसरा विशेषांक - महिलांचा, चौथा विशेषांक अर्थशास्त्रातील पती-पत्नी जोडीचा आणि पाचवा विशेषांक संशोधकांचा) हे सर्वच विशेषांक अर्थसंवादच्या इतिहासातील नावीन्यपूर्ण आणि वेगळी वाट चोखाळणारे विशेषांक आहेत. अर्थात, याचे संपादन काम जरी मी करीत असलो तरी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजी-माजी पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य आणि आजीव सभासद यांचे सहकार्य व मार्गदर्शन मला सदैव लाभत असते. त्यामुळे या सर्वांचे आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रस्तुत अंकातील उणिवा संपादक या नात्याने पूर्णत: माझ्या आहेत. सदर उणिवा माझ्या निदर्शनास आणून देवून अर्थसंवादची गुणवत्ता वाढविण्यास सूचना केल्यास त्या नेहमीच स्वागतार्ह आहेत, अशी मी आपणास विनंती करतो.

**- राहुल शं. म्होपरे**
प्रमुख संपादक

# सात्विक संपत्ती निर्मितीचा आदर्श: रतन टाटा

**किशोर गजाजन सुतार** †
**गणेश आदिनाथ टेकळे** ††

**प्रस्तावना**

रतन टाटा (२८ डिसेंबर १९३७ - ९ ऑक्टोबर २०२४) एक भारतीय उद्योगपती आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रमुख व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी टाटा समूहाचे अध्यक्ष म्हणून दोन कार्यकाळ सांभाळले (१९९१-२०१२ आणि २०१६-२०१७). २००८ साली त्यांना पद्मविभूषण पुरस्कार (भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी सन्मान) प्रदान करण्यात आला. त्याआधी, २००० साली त्यांना पद्मभूषण पुरस्कार (तिसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी सन्मान) प्राप्त झाला होता. त्यांनी गरीब लोकांना १०२ अब्ज डॉलर्स दान केले ज्यामुळे त्यांना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणूनही ओळखले जाते. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी टाटा यांना श्वासोच्छवासाच्या त्रासामुळे मुंबईत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन दिवसानंतर ९ ऑक्टोबर २०२४ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी श्वसनक्रिया बंद पडल्यामुळे त्यांचे निधन झाले. रतन टाटा या एका यशस्वी व्यक्तिमत्त्वाचे आपल्यातून जाणे हे फक्त एका व्यक्तीचे झालेले देहावसन नसून औद्योगिक क्षेत्रातील सात्विकतेचा सुगंध हरपला आहे. प्रस्तुत लेखामध्ये लेखकांनी, रतन टाटा या महान व्यक्तिमत्त्वाचे विविधांगी जीवनपैलू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्यत्वे टाटांच्या शैक्षणिक वाटचालीपासून ते औद्योगिक कारकिर्दीपर्यंत, यासोबतच त्यांच्या सामाजिक भानाचे आदर्श दर्शन घडविले आहे.

**कौटुंबिक पार्श्वभूमी**

रतन टाटा यांचे जरी आडनाव टाटा असले, तरी ते काही सोन्याचा किंवा चांदीचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आले नव्हते. टाटा उद्योग समूहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांना दोन 'दोराबजी' आणि 'रतनजी' मुले होती, मात्र या दोघांनाही पुत्रपात्री झाली नाही. थोरल्या टाटांची टाटा स्टिल व ताज हॉटेल ही स्वप्ने दोराबजी यांनी पूर्ण केली. त्यांचे मोठे बंधू रतन टाटा यांना सर हा किताब प्राप्त झाला होता. मात्र त्यांना व्यवसाय, व्यापार व उद्योगांपेक्षा कला, संस्कृती यामध्येच जास्त रस होता. दरम्यानच्या काळात दोराबाजींच्या मदतीला फ्रान्समधून आर.डी.टाटा आले. नंतर याच आर.डी.टाटांचे पुत्र जे.आर.डी. यांनी त्यांच्या

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सदस्य क्र. १८४८ भ्रमणध्वनी : ८३२९३८९९७९ , ई-मेल: kishorsutar2021@gmail.com
†† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सदस्य क्र. २००० भ्रमणध्वनी : ८६००८०४१०७, ई-मेल: ganeshtekale159@gmail.com

कार्यकाळात टाटा उद्योग समूहाचा मोठा विस्तार घडवून आणला. हे जे.आर.डी. निःसंतान होते. त्यामुळे त्यांनी एका पारशी अनाथाश्रमातून एक मुलगा दत्तक घेतला. ते होते 'नवल टाटा' म्हणजे आताच्या रतन टाटांचे वडील नवल टाटांना त्यांच्या संपूर्ण हयातीत टाटा उद्योग समूहाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही. मात्र ती पुढे बऱ्याच प्रतीक्षेनंतर रतन टाटा यांना मिळाली. त्यांनी त्या संधीचे अक्षरशः सोने केले.

रतन टाटा यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ ला मुंबईत झाला. नवल टाटा आणि नवजबाई शेठ यांचे दत्तक पुत्र म्हणजे रतन टाटा. रतन टाटा लहान असतानाच त्यांचे आई-वडील विभक्त झाले. त्यानंतर त्यांचे संगोपन त्यांची आजी नवजबाई टाटा यांनी केले. रतन टाटांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतच झाले. यानंतर त्यांनी विशप कॉटन स्कूल, शिमला आणि रिव्हरडेल कंट्री स्कूल, न्यूयॉर्कमधून १९५५ मध्ये डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले. रतन टाटांना त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर अमेरिकेतच आयबीएम कंपनीत चांगल्या पदावर नोकरी मिळत होती. मात्र त्यांनी ती नाकारली व ते भारतात येऊन टाटा उद्योग समूहातील पोलाद कारखान्यात एखाद्या सर्वसामान्य कुशल कामगाराप्रमाणे आपल्या कामाला सुरुवात केली. तेथून पुढील अनेक वर्षे हेच रतन टाटा एखाद्या सर्वसामान्य कामगाराप्रमाणे टाटा उद्योग समूहात कार्यरत होते. पुढील काळात त्यातूनही ते बाहेर पडले. कारण गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या आपल्या आईच्या सेवेसाठी त्यांना पुन्हा अमेरिकेला जावे लागले. मात्र याकाळातही त्यांनी आधुनिक युगात टाटा उद्योग समूहाने परंपरागत उद्योग, उत्पादन, उत्पादनतंत्र यामध्ये कोणते बदल करायला हवेत याविषयीचे अगदी सखोल व अभ्यासपूर्ण असे एक प्रदीर्घ विश्लेषण तयार करून टाटा उद्योग समूहाचे तत्कालीन प्रमुख म्हणून जे.आर.डी. टाटा यांना पाठविले होते.

**भारतीय उद्योग क्षेत्राची पायाभरणी**

टाटा या औद्योगिक घराण्याने स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत भारतीय औद्योगिक क्षेत्राची पायाभरणी केली. अगदी सुरुवातीला कापड व्यवसायापासून सुरू झालेली व्यावसायिकतेची ही गंगोत्री विभिन्न प्रांत, देश आणि भाषा यांना पादाक्रांत करीत आपला व्याप अविरतपणे वाढवित गेली. त्यांनी सेवा, उत्पादन, निर्मिती, व्यापार, वाणिज्य अशा वैविध्यपूर्ण क्षेत्रांना गवसणी घालत विस्तारत गेली. टाटांनी खाजगी क्षेत्रातील उत्पादनांसोबत सरकारच्या सार्वजनिक उपक्रमांमध्येही भागीदार स्वरूपात तर कधी एक उत्तम पुरवठादार म्हणून अतिशय चोख अशी भूमिका बजावली. सुमारे ५०० वर्षापेक्षा जास्त उद्योजकतेची परंपरा असलेले हे टाटा अगदी कापड, सिमेंट, स्टिल, पोलाद, रसायने, रंग, फर्निचर, वाहने, गाड्या, यंत्रे, अवजारे यांच्यासह सॉफ्टवेअर, ज्वेलरी अशा क्षेत्रांतही काळानुरूप उतरले व यशस्वी ठरले.

**रतन टाटांचा अध्यक्ष पदापर्यंतचा प्रवास**

जेआरडींना रतन टाटा यांच्या दूरदृष्टीची चुणूक सतत जाणवत असे. रतन टाटा अमेरिकेतून जेव्हा पुन्हा भारतात आले, तेव्हा जेआरडींनी त्यांच्यावर अगदीच लहानशा व अवसायनात गेलेल्या 'नेल्को' या कंपनीची जबाबदारी सोपविली. रतन टाटांसाठीची ती एक अग्निपरीक्षाच होती. त्यांनी ते आव्हान स्वीकारले आणि ती कंपनी फायद्यात आणून तिला वाचवले. मात्र तरीही पुढील बरीच वर्षे जेआरडींनी रतन टाटांना मोठी अशी संधी दिली नाही. कारण तेव्हा टाटा उद्योग समूह हा आतासारखा एकसंघ नव्हता. अनेक बडे बडे व तगडे असे प्रस्थापित गुंतवणूकदार आपापले वर्चस्व टिकवून होते. प्रत्येक उद्योगावर कोणाची ना कोणाची तरी जणू मक्तेदारी होती. टाटा स्टिल हे रूसी मोंदीकडे होते, तर ताज हॉटेलवर अजित केरकरांचा ताबा होता. टाटा मोटर्सवर सुमंत मूळगावकर यांचा ताबा होता. एसीसी

म्हणजे जणू नानी पालखीवाला यांची जहागिरी झालेली होती. शिवाय टाटा केमिकल्ससारखी कंपनी दरबारी सेठच्या हातात होती. त्यामुळे यातील प्रत्येकाची अशी महत्त्वाकांक्षा होती की, जेआरडीनंतर टाटा उद्योग समूह त्यांच्या ताब्यात यावा. मात्र एव्हाना टाटा उद्योग समूहाचा झालेला विस्तार व व्याप पाहाता जेआरडींना यापैकी कोणी एक टाटा उद्योग समूहाचा गाडा हाकण्यास सक्षम आहे, याविषयी साशंकता होती. शिवाय रतन टाटाही तेव्हा या क्षेत्रात फारसे सरावलेले नव्हते. मात्र तेव्हा शापूरजी पालनजी मिस्त्री हा टाटा उद्योग समूहातील एक मोठा समभागधारक गट होता. त्यांनी जेआरडींचा उत्तराधिकारी निवडताना आपले निर्णायक मत रतन टाटा यांच्या बाजूने दिले. परिणामी, रतन टाटा यांच्या टाटा उद्योग समूहाच्या अध्यक्षपदांचा मार्ग मोकळा झाला. मात्र दुर्दैव असे की, पुढे रतन टाटांना, याच मिस्त्रीचा मुलगा सायरस याला अध्यक्ष पदावरून काढावे लागले.

**टाटांच्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात**

रतन टाटा यांनी आपल्या टाटा समूहातील कारकिर्दीची सुरुवात टाटा स्टीलपासून केली. ते साल होते १९६१. त्यांनतर १९७५ मध्ये ते हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये बिझनेस मेनेजमेंट शिकण्याकरता गेले. पुढे त्यांनी कॉर्नेल युनिर्व्हसिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमधूनही पदवी मिळवली. १९९१च्या आर्थिक सुधारणांमुळे तो काळ भारतासाठी व संपूर्ण उद्योग जगतासाठी खूप महत्त्वाचा होता. कारण देशाने नवीन आर्थिक धोरणे स्वीकारण्याच्या याच काळात रतन टाटा हे टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष झाले. १९९० ते २०१२ असे तब्बल २३ वर्षे या समूहाचे ते अध्यक्ष होते. पुढे ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या काळात ते टाटा समूहाचे हंगामी अध्यक्ष होते.२००४ साली त्यांनी 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' (टीसीएस) सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला. यासह टाटांनी ऑटोमोबाईल क्षेत्रात अँग्लो-डच स्टिल निर्माता 'कोरस', ब्रिटिश ऑटोमोबाईल कंपनी 'जग्वार', 'लँड रोव्हर' आणि ब्रिटिश चहा कंपनी 'टेटली' यांसारखे अनेक जागतिक ब्रँड विकत घेतले होते. सन २००९ मध्ये सामान्य माणसाचे कारचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी टाटांनी 'नॅनो' ही छोटी कार सादर करण्याचा निर्णय घेतला. एक लाख रुपयांत तेव्हा ही कार मिळत होती. त्यामुळे अगदी मध्यमवर्गीयांच्या दारात ही कार उभी राहिली. 'इंडिका' ही कार देखील टाटा यांच्या कल्पनेतूनच साकार झाली होती.

रतन टाटा जेव्हा या टाटा समूहात रुजू झाले तेव्हा त्या उद्योग समूहाची एकूण उलाढाल १०,००० कोटी रुपये एवढी होती. पुढे सन २०११-१२ मध्ये त्यांचा महसूल ४०५.७२१ कोटी रुपये एवढा झाला. आज जगातील तब्बल ८० देशांत टाटा उद्योग समूहाच्या कंपन्या कार्यरत आहेत. जी गोष्ट कंपनीसाठी चांगली व जगासाठी हितावह तीच करावी हे टाटांचे कार्यतत्त्व होते. आज टाटा समूहाची 'ग्लोबल बेवरेजेस' जगातील दुसरी मोठी चहा कंपनी आहे. २००८ मध्ये जेव्हा फॉर्ड कंपनी मोठ्या आर्थिक संकटात सापडली. तेव्हा त्या संकटात सापडलेल्या फोर्ड उद्योग समूहाला त्यांच्या 'जॅग्वार' आणि 'लँड रोवर' या दोन ब्रँडसना २.३ अब्ज अमेरिकी डॉलर्स देऊन विकत घेऊन टाटांनी एक प्रकारे मदतच केली होती.

**टाटा समूहाला बनविले विश्वासार्ह ब्रँड**

रतन टाटा हे त्यांच्या पूर्वीच्या, त्यांच्या काळातील व आता त्यांच्यानंतरही एक विश्वासार्ह उद्योजक म्हणून अजरामर राहातील. २०१९-२० मध्ये जेव्हा कोरोनाची मोठी महामारी आली, तेव्हा रतन टाटांनी सुरुवातीला टाटा ट्रस्टकडून ५०० कोटी रु. व नंतर टाटा समूहाकडून १००० कोटी रु.ची आर्थिक मदत दिली. स्वतःचा जीव धोक्यात घालून कोरोनाबाधितांची सेवा व उपचार करणाऱ्या डॉक्टर्स व आरोग्यसेवकांसाठी त्यांनी आपली

**तक्ता क्र. १ : टाटा समूहाच्या विविध कंपन्यांचा आर्थिक आढावा**

| अ.क्र. | कंपनीचे नाव | बाजार भांडवल (कोटी₹) | PE गुणोत्तर (TTM) | ROE (%) |
|---|---|---|---|---|
| १ | टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड | ₹ १२,८३,१०१ | २८.७३ | ४७.२६% |
| २ | टायटन कंपनी लिमिटेड | ₹ २,९३,८२१ | ९१.३१ | ३०.९७% |
| ३ | टाटा मोटर्स लिमिटेड | ₹ २,१७,८६० | २०.५१ | ५.२४% |
| ४ | टाटा स्टील लिमिटेड | ₹ १,५५,६४० | ९५.५२ | ७.४८% |
| ५ | टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड | ₹ ८४,३३१ | ६६.६७ | ८.५८% |
| ६ | टाटा पॉवर कंपनी लिमिटेड | ₹ ८२,०७२ | २३.३५ | १४.८७% |
| ७ | ट्रेंट लिमिटेड | ₹ ७३,८६३ | १५१.६० | १५.८८% |
| ८ | द इडयन हॉटेल्स कंपनी लिमिटेड | ₹ ५९,६४२ | ५६.५३ | -१२.९१% |
| ९ | टाटा एल्क्सी लिमिटेड | ₹ ४६,३९० | ६१.१० | ४०.९७% |
| १० | टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड | ₹ ५०,९४६ | ३१.१८ | १४४.४८% |
| ११ | व्होल्टास लिमिटेड | ₹ २८,१४६ | १८१.१८ | २.४९% |
| १२ | टाटा केमिकल्स लिमिटेड | ₹ २५,२७३.१ | १२.३५ | ७.२२% |
| १३ | टाटा टेली सर्व्हिसेस (महाराष्ट्र) लिमिटेड | ₹ २६,६२८ | ११.७९ | १२.९१% |
| १४ | तेजस नेटवर्क्स लिमिटेड | ₹ १४,८५९ | ० | १.६४% |
| १५ | टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड | ₹ १६,७५२ | ५४.२६ | १.२८% |
| १६ | रिल्स इंडिया लिमिटेड | ₹ ४,२६८.५९ | ४८.८० | ५.३७% |
| १७ | टाटा कॉफी लिमिटेड | ₹ ४,९१७.६६ | १८.५४ | १९.४% |
| १८ | टिनप्लेट कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड | ₹ ४,१६८.९१ | ४४.६९ | ११.७४% |
| १९ | टाटा स्टील लाँग प्रॉडक्ट्स लिमिटेड | ₹ ३,६५१.३ | २.९१ | १२९.७१% |
| २० | टाटा मेटलिक्स लिमिटेड | ₹ ३,०२६.०७ | २६.६० | ५.१९% |
| २१ | ओरिएंटल हॉटेल्स लिमिटेड | ₹ १,७९७.४२ | ३७.४२ | ११.३४% |
| २२ | नेल्को लिमिटेड | ₹ १,७८५.७७ | ८१.०२ | २०.५१% |
| २३ | ऑटोमोटिव्ह स्टॅम्पिंग्स अँड असेंब्लीज | ₹ ६४५.०५ | ५६.५३ | ०% |
| २४ | ऑटोमोबाईल कॉर्पोरेशन ऑफ गोवा लिमिटेड | ₹ ९५८.११ | ३२.३० | १५.३६% |
| २५ | बनारस हॉटेल्स लिमिटेड | ₹ ८२५.५१ | २८.४५ | २६.३३% |
| २६ | आर्टसन इंजिनिअरिंग लिमिटेड | ₹ ५८९.९८ | ० | ०% |
| २७ | टीआरएफ लिमिटेड | ₹ २९६.८४ | ३.७९ | ०% |
| २८ | टायो रोल्स लिमिटेड | ₹ ९१.७३ | ० | ०% |

स्त्रोत:ट्रेड ब्रेनस्, रतन टाटा सक्सेस स्टोरीस्.

आलिशान हॉटेल्स खुली करणारे ते पहिले उद्योगपती होते. आजही भारतातील असंख्य ट्रक चालक आपल्या ट्रकच्या मागे 'ओके टाटा' लिहितात. जेणेकरून हे कळावे की, हा ट्रक टाटांनी बनविलेला आहे म्हणून तो विश्वासार्ह आहे. टाटांनी जागतिक स्तरावरही आपली ही विश्वासार्हता निर्माण केली आहे. आज टाटा उद्योग समूह जॅग्वार व लँड रॉवर सारख्या जगविख्यात कारचे उत्पादन करीत आहे. तर आजघडीला टाटा कन्सल्टन्सी म्हणजेच टीसीएस ही एक जगविख्यात सॉफ्टवेअर सर्व्हिसेस देणारी कंपनी आहे.

त्यांनी अस्ताव्यस्त अशा टाटा उद्योगांना एकसंघ व एकत्रित केले. या उद्योगसमूहातील कंपन्यांकडून त्यांनी स्वामित्वमूल्य आकारण्यास सुरुवात केली. त्यांच्या या धोरणाला प्रारंभी विरोध झाला. मात्र टाटा आपल्या निर्णयावर ठाम राहिले. त्यांच्या या निर्णयामागे टाटा न्यासासाठी निधी उभा करणे हा हेतू नव्हता, तर या निधीतून त्यांनी टाटा समूहातील कंपन्यांमध्ये टाटांची गुंतवणूक व मालकी वाढवित नेली. कारण त्याआधी परिस्थिती अशी होती की, टाटा उद्योग समूहात खुद्द टाटांपेक्षा बिर्लाचीच मालकी जास्त होती. रतन टाटांनी त्यात बदल घडवून टाटा उद्योग समूहाला एकसंघ बनविण्याचे काम केले. परिणामी, रतन टाटांच्या नेतृत्वातील टाटा उद्योगसमूह हा एक वैश्विक असा बलाढ्य बहुराष्ट्रीय उद्योग म्हणून स्थापित झाला. आज अमेरिकन सैनिक वापरत असलेली ॲपॅचे नावाची हॅलिकॉप्टर्स, किंवा जगभरातील अब्जावधी लोक आपल्या दिवसाची सुरुवात ज्या चहाने करतात तो चहा, कोट्यावधी कामगारांना मिळणारे पगार, जगातील असंख्य शहरांतील वाहतूक दळणवळण, इतर सोयी-सुविधांचे नियमन करणारी टीसीएस, आज संपूर्ण जगातील मानवजातीच्या जगण्याचे असे एकही क्षेत्र नाही की, ज्यास टाटा या नावाचा स्पर्श झाला नसेल. त्यातूनच 'टाटा म्हणजे दर्जा, टाटा म्हणजे विश्वास', असं एक समीकरणच भारतीय माणसाच्या मनात तयार झाले आहे.

**पाय जमिनीवर असलेले उत्तुंग व्यक्तिमत्त्व**

इंडियन एअरलाइन्सच्या कामगारांचा एक सर्व्हे १९९२ साली करण्यात आला होता. त्यात त्यांना मुंबई ते दिल्ली या हवाई प्रवासादरम्यान त्यांना सर्वाधिक आवडलेल्या प्रवाशांविषयी विचारण्यात आले तेव्हा बहुतांश कर्मचाऱ्यांनी रतन टाटा यांचेच नाव घेतले. कारण ते अति-महत्त्वाच्या व्यक्तीमध्ये असूनही कधीही स्वतःसोबत सुरक्षारक्षक, स्वीय सहायक इ. ची गर्दी वा कोंडाळा करत नसत. स्वतःची बॅग, फाईल्स, स्वतः वागवत व शांतपणे आपले काम करत असत. त्यांना लागणारी सेवा जरी उपलब्ध नसली तरी त्यांनी कधी नाराजी दर्शविली नाही. एवढे त्यांचे वागणे साधे होते. रतन टाटांनी जेव्हा जेआरडीनंतर टाटा उद्योग समूहाची अध्यक्ष म्हणून धुरा सांभाळली तेव्हा सुरुवातीला त्यांनी जेआरडी ज्या ऑफिसमध्ये बसून काम करत असत तिथे न बसता स्वतःसाठी एक छोटीशी व अगदी साधी खोली तयार करून घेतली व तिथे बसून ते काम करू लागले. कामाच्या वेळेप्रसंगी रतन टाटांशी एखादा कनिष्ठ अधिकारी जर बोलत असेल आणि त्याचवेळी जर एखादा वरिष्ठ अधिकारीही त्यांच्याकडे आला तर ते त्यांना प्रतिक्षा करायला लावत. मात्र त्या कनिष्ठ अधिकाऱ्याला दिलेली वेळ टाळत नसत.

**सर रतन टाटा ट्रस्ट आणि सहयोगी ट्रस्ट्स**

१८६८ मध्ये जमशेटजी टाटा यांनी स्थापन केलेला, टाटा समूह हा एक जागतिक उपक्रम आहे, ज्याचे मुख्यालय भारतात आहे, ज्यामध्ये दहा वर्टिकलमध्ये ३० कंपन्यांचा समावेश आहे. हा समूह सहा खंडांतील १०० हून अधिक देशांमध्ये कार्यरत आहे. टाटा सन्स ही मुख्य गुंतवणूक होल्डिंग कंपनी आणि टाटा कंपन्यांची प्रवर्तक आहे. टाटा सन्सचे ६६% भाग भांडवल टाटा ट्रस्टकडे आहे, यांत मुख्यतः सर रतन टाटा ट्रस्ट,

नवजबाई रतन टाटा ट्रस्ट, टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्ट, बाई हिराबाई जे.एन.टाटा नवसारी धर्मादाय संस्था, आणि सार्वजनिक सेवा ट्रस्ट यांचा समावेश आहे. जे शिक्षण, आरोग्य, उपजीविका निर्मिती आणि कला आणि संस्कृतीला समर्थन देतात. प्रत्येक टाटा कंपनी किंवा एंटरप्राइझ त्यांच्या स्वतःच्या संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली स्वतंत्रपणे कार्य करते.

**तक्ता क्र. २ : अनुदान वितरणाची तपशीलवार माहिती २०२३-२४.**

| अनुदान प्रकार | ₹ (दशलक्षात) | यूएस$ (दशलक्षात) |
|---|---|---|
| संस्थात्मक अनुदान | ५,२२९.९२ | ६३.०१ |
| वैयक्तिक अनुदान | ५२४.७७ | ६.३२ |
| **एकूण** | **५,७५४.६९** | **६९.३३** |

स्त्रोत : सर रतन टाटा ट्रस्ट, वार्षिक अहवाल २०२३-२४.

तक्ता क्र. २ मध्ये असे दिसून येते की, ट्रस्टने वर्षभरात केलेल्या एकूण अनुदान वितरणाची रक्कम ₹. ५,७५४.६९ दशलक्ष (US$ ६९.३३ दशलक्ष) होते. यामधील वर्षभरात सर्व कार्यक्रम अनुदानांवर₹ ५,१७७.२५ दशलक्ष (US$ ६२.३८ दशलक्ष) चे वितरण करण्यात आले. एंडॉवमेंट अनुदान ₹ ५२.२४ दशलक्ष (US$ ०.६२ दशलक्ष) आणि लहान अनुदान ०.४३ दशलक्ष (US$ ०.०१ दशलक्ष) पर्यंत पोहोचले. व्यक्तींना एकूण वाटप ₹.५२४.७७ दशलक्ष (US$ ६.३२ दशलक्ष) इतके होते.

तक्ता क्र. ३  व आकृती क्र. १ मध्ये असे दिसून येते की, ट्रस्टने वर्षभरात थेट अंमलबजावणीमधील प्रकल्पांसाठी केलेल्या एकूण संस्थात्मक अनुदानामध्ये सर्वाधिक वितरण; आरोग्यसेवा (४०.९) व शिक्षण (२६.९) यांसाठी केले आहे.

**वैयक्तिक अनुदान कार्यक्रम** (IGP)

ट्रस्टने सुरुवातीपासूनच वैयक्तिक अनुदान कार्यक्रम (IGP) ला प्राधान्य दिले असल्याचे दिसून येते. यामध्ये गरजूंना मदत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या कार्यक्रमात सर्वसमावेशक, पद्धतशीर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सेवा नसलेल्या समुदायातील व्यक्तींना ओळखण्यासाठी न्याय्य आणि मानवीय दृष्टिकोन सुनिश्चित केला जातो. या कार्यक्रमात वैद्यकीय आणि शैक्षणिक अनुदानांचा समावेश आहे.

तक्ता क्र. ४ (वैयक्तिक अनुदान वितरण) मध्ये वैद्यकीय (४०७.०९ दशलक्ष) आणि शैक्षणिक (११६.५९ दशलक्ष) वैयक्तिक अनुदान कार्यक्रमातून वितरित केल्याचे आढळते.

**समारोप**


टाटांनी आपल्या या देशाला व समाजाला एवढे दिले आहे की, त्याची परतफेड फक्त त्यांच्या ऋणात राहूनच होऊ शकते. व्यापारी आणि उद्योजक यांच्यात एक मूलभूत फरक असतो. मागणी आणि पुरवठा यांच्यातील दरी सांधत व्यापारी आपला नफा कमावतो. नफा मिळाला की, व्यापाऱ्याचे काम संपते. उद्योजकांचे मात्र तसे नसते. ते पैसे गुंतवतात, निर्मिती करतात, जोखीम पत्करतात, नवनव्या क्षितिजांचा शोध घेतात. टाटांनीही पोलादनिर्मिती, कापडनिर्मिती, वीजनिर्मिती, रेशीमउद्योग, विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण, मूलभूत संशोधन व हॉटेल व्यवसाय अशा कितीतरी क्षेत्रात मोठी कामगिरी करून दाखविली. टाटांनी जे उभे केले ते सर्वच सर्वोत्तम आणि काळाच्या पुढचे ठरले. त्यांच्या प्रत्येक निर्मितीमागे प्रामाणिकपणा, सचोटी आणि दर्जा यांचा आग्रह असतो. 'उद्योगधंदे हे फक्त नफा कमावण्यासाठी चालवायचे

**तक्ता क्र. ३ : संस्थात्मक अनुदान वितरण / प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रकल्प खर्च (विषयवार): आर्थिक वर्ष २०२३-२४***

| विषयवार क्षेत्र | ₹ (दशलक्ष) | यूएस$ (दशलक्ष) | वाटा (%) |
|---|---|---|---|
| आरोग्यसेवा | २,१३८.१२ | २५.७६ | ४०.९ |
| पाणी | २७१.२९ | ३.२७ | ५.२ |
| ऊर्जा | १६.५५ | ०.२० | ०.३ |
| ग्रामीण उन्नती | ९०६.७६ | १०.९२ | १७.३ |
| शहरी गरिबी निर्मूलन | ६.२६ | ०.०८ | ०.१ |
| शिक्षण | १,४०६.३७ | १६.९४ | २६.९ |
| कला, हस्तकला आणि संस्कृती | ५९.५५ | ०.७२ | १.१ |
| संस्था | ४२१.६४ | ५.०८ | ८.१ |
| नवोपक्रम | ३.३८ | ०.०४ | ०.१ |
| **एकूण** | **५,२२९.९२** | **६३.०१** | **१००** |

स्त्रोत : सर रतन टाटा ट्रस्ट, वार्षिक अहवाल २०२३-२४.

**आकृती १ : अनुदान वितरण आणि थेट अंमलबजावणी प्रकल्प आर्थिक वर्ष २०२३-२४.**




नाहीत तर सर्वोत्तम सेवा देऊनच नफा कमवायचा' हे त्यांचे तत्त्व आहे.

रतन टाटांच्या जाण्याने या सर्वच गोष्टींची कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. मात्र भविष्याच्या पटलावर जमशेटजी, जेआरडी आणि रतन टाटा यांचा वसा आणि वारसा त्यांचा टाटा उद्योगसमूह पुढे नेईलच, यात शंका नाही.

**तक्ता क्र. ४ : वैयक्तिक अनुदान वितरण आर्थिक वर्ष २०२३-२४.**

| अनुदान प्रकार | ₹ (दशलक्षात) | यूएस $ (दशलक्षात) | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अनुदान | ४०७.०९ | ४.९१ | ७८% |
| शैक्षणिक अनुदान | ११६.५९ | १.४० | २२% |
| गरिबी निवारण | १.०९ | ०.०१ | - |
| **एकूण** | **५२४.७७** | **६.३२** | **१००%** |

स्त्रोत: सर रतन टाटा ट्रस्ट, वार्षिक अहवाल २०२३-२४

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. "26th Robert S. Hatfield Fellow in Economic Education - Announcement" Mega Icons Season 2 Episode 2". Disney+ Hotstar.

२. "Carnegie Medal of Philanthropy, 2007".

३. "Majumdar, Shyamal (21 January 2015). "40 Years Ago... and Now: Ratan Tata increased dare quotient of Tata group". Business Standard.

४. "QUAD Spring 2010". Issuu. 12th March 2018.

५. "Ratan Tata '59: The Cornell Story". Cornell University.

६. "Ratan Tata goes back to school". The Times of India. 31 March 2009.

७. "Ratan Tata in critical condition at Mumbai Hospital, says report". The Times of India. 9 October 2024.

८. "Ratan Tata no more; Business Titan dead at 86". Deccan Herald. 9 October 2024.

९. "Ratan Tata rode the tiger economy and now he drives Jaguar". 4 October 2012.

१०. "Ratan Tata, '62, Becomes Cornell University's Biggest International Donor - C-Suite Spotlight". 2 December 2020.

११. 'Ratan Tata, Whose Indian Business Empire Went Global, Dies at 86". The New York Times. 9 October 2024.

१२. "Ratan Tata". 12 September 2018. Langley.

१३. Tata Trusts, (2024), Nurturing Human Potential, Annual Report 2023-24.

१४. "Tata : Carnegie Medal of Philanthropy, 2007".

१५. "The business model and other details". The Times of India. 17 August 2022.

१६. "Times: Ratan Tata". The Times of India. 14 April 2011.

१७. रतन टाटा: पाय जमिनीवर असलेल्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा जीवन प्रवास कसा होता? - रेहानफजल-बीबीसी हिंदी-१०ऑक्टोबर २०२४.

१८. रतन टाटा म्हणजे विश्वास-आनंद महिंद्रा, उद्योजक-सामना-१० नोव्हेंबर २०२४.

१९. जीवन त्यांना कळले हो : गिरीश कुबेर-संपादकीय-दै.लोकसत्ता-११ नोव्हेंबर २०२४


◆

# अर्थशास्त्राचे २०२४ चे नोबेल पारितोषिक: काही राष्ट्रे इतरांपेक्षा मागे का आहेत?

**किशोर बी. मेंढे** †
**निलोफर एस. शेख** ††

**प्रस्तावना**

२०२४ च्या अर्थशास्त्राचे नोबेल पुरस्कार डॅरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन यांना त्यांच्या संस्थात्मक रचनेच्या दीर्घकालीन परिणामावर केलेल्या संशोधनासाठी देण्यात आले. वसाहतवाद्यांनी त्यांच्या स्वत:च्या फायद्यासाठी त्यांना अनुकूल असे कायदे केले, तर काही देशात गुलामगिरीची अनिष्ट प्रथादेखील रुजविली. अशा संमिश्र शोषक आर्थिक इतिहासाचे ओझे मात्र गुलामगिरीत असणाऱ्या देशांवर पडले. त्यांच्या अभ्यासासाठी २०२४ चा अर्थशास्त्रातील नोबेल या अर्थतज्ज्ञांना देण्यात आला. या संशोधनाने समावेशक संस्थांच्या महत्त्वाला अधोरेखित केलेले आहे. या शास्त्रज्ञांनी संस्था कशा तयार होतात आणि त्यांचा राष्ट्राच्या समृद्धीवर कसा परिणाम होतो याचे महत्त्व पटवून दिलेले आहे. एखादा देश कसा समृद्धीच्या दिशेने वाटचाल करतो, तर काही देशांना आर्थिक संकटांचा सामना का करावा लागतो याची कारणे त्यांनी आपल्या संशोधनातून स्पष्ट केलेली आहेत. राजकीय तसेच आर्थिक संस्थांच्या परस्परसंबंधांचे विश्लेषण करून नोबेल विजेत्यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचा दृष्टिकोन प्रदान केलेला आहे.

२०२४ वर्षीचे नोबेल पारितोषिक डॅरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन यांना त्यांनी केलेल्या आर्थिक तत्त्वज्ञान, सामाजिक आणि आर्थिक संरचनेवर महत्त्वपूर्ण योगादानाकरिता प्राप्त झाले आहे. या पारितोषिकाने समाजाच्या आर्थिक व्यवस्थेतील काही विशेष मुद्द्यांवर चर्चा घडवून आणली आहे, ज्यामुळे जागतिक आर्थिक धोरणांवर परिणाम होऊ शकतो. या तिघांनी संस्था कशा तयार होतात आणि लोकांच्या आनंदावर त्याचा कसा प्रभाव पडतो याबाबत संशोधन केलेले आहे. २०२४ च्या नोबेल पारितोषिक प्राप्तकर्त्यांनी आर्थिक असमानता, गरिबी निर्मूलन आणि आर्थिक समता यांसारख्या महत्त्वाच्या समस्यांवर संशोधन केले आहे. या संशोधनाने आधुनिक काळात आर्थिक धोरणांसाठी प्रभावी साधने प्रदान केली आहेत.

† संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर अर्थशास्त्र अधि विभाग, रा. तु. म. नागपूर, विद्यापीठ, नागपूर.
आजीव सदस्य क्रमांक: १९४५ भ्रमणध्वनी : ९१५८१८८४१९ ई-मेल: kbmendhe1986@gmail.com
†† संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर अर्थशास्त्र अधि विभाग, रा. तु. म. नागपूर, विद्यापीठ, नागपूर.
आजीव सदस्य क्रमांक: २०६३ भ्रमणध्वनी : ८९९९३०५४०६ ई-मेल: sknilu664@gmail.com

ज्यामुळे जगभरातील सरकारे, संस्थान आणि धोरणकर्त्यांना उपयुक्त दृष्टिकोन मिळाला आहे. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक २०२४ ने जगभरातील देशांच्या विकासाचे, नोबेल पारितोषिक विजेत्यांचे योगदान, समतोलाचे आणि धोरणात्मक साधनांचे नव्या दृष्टिकोनातून पुनर्मूल्यांकन करण्यास मार्गदर्शन केले आहे. त्यांनी जगभरातील गरिबी, आर्थिक असमानता आणि संस्थात्मक सुधारणांवर प्रकाश टाकला आहे. तिन्ही अर्थतज्ज्ञांचे काम धोरण निर्मितीसाठी आणि आर्थिक धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन देते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये २०२४ च्या अर्थशास्त्र नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या परिचय, विजेत्यांनी केलेल्या संशोधनातील मुख्य मुद्दे, आर्थिक विकास व वसाहतवाद, युरोपियन वसाहतवादाचे प्रमुख उद्देश, डॅरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए.रॉबिन्सन यांच्या संशोधनाची मुख्य वैशिष्ट्ये, लोकशाही व आर्थिक विकास, संशोधनाची वर्तमानकालीन व भविष्यकालीन उपयुक्तता तसेच समाज, सरकार आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर पडणारे प्रभाव यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**२०२४ च्या अर्थशास्त्र नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या परिचय:**

१) डॅरेन एसमोगलू यांचा जन्म तुर्की येथील इस्तबूल येथे ३ सप्टेंबर १९६७ मध्ये झाला. १९९२ मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनोमिक्स V. M पॉलिटिकल सायन्समधून पीएच.डी. प्राप्त केली. २०१९ मध्ये MIT येथे इन्स्टिट्यूट प्रोफेसर म्हणून नियुक्त केले गेले. २००५ मध्ये जॉन बेट्स क्लाक पदक आणि २०२४ मध्ये त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले. डॅरेन एसमोगलू प्रतिष्ठित अर्थशास्त्रज्ञ असून, त्यांचा संशोधन कार्यक्षेत्र आर्थिक विकास, तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि संस्थात्मक संरचना यांवर आधारित आहे. एसमोगलू यांचे संशोधन मुख्यतः आर्थिक विकास आणि संस्थात्मक आर्थिक रचना यांवर केंद्रित आहे. त्यांच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे आर्थिक असमानता कमी करण्यासाठी संस्था आणि धोरणांचा प्रभाव, तसेच तंत्रज्ञानाचा श्रमिकांच्या उत्पन्नावर होणारा परिणाम आहे. त्यांच्या कार्यामुळे जागतिक आर्थिक धोरणे आणि सामाजिक न्यायासाठी उपयुक्त ठरलेल्या उपाययोजना उभ्या राहिल्या आहेत. डॅरेन एसमोगलू यांचे कार्य आधुनिक काळातील बाजारातील असमानता, रोजगाराचे भवितव्य आणि सामाजिक-आर्थिक समतोल साधण्यासाठी महत्त्वाचे मानले जाते.

२) सायमन जॉन्सन यांचा जन्म १६ जानेवारी १९९३ मध्ये शेफिल्ड, लंडन येथे झाला. सायमन जॉन्सन हे इंग्लिश-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ असून सध्या स्कूल ऑफ मॅनेजमेंट येथे प्राध्यापक आहेत. त्यांनी जागतिक आर्थिक व्यवस्थांवर प्रभाव टाकणाऱ्या धोरणांवरही काम केले आहे. त्यांच्या संशोधनाने आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या धोरणांसाठी मार्गदर्शन पुरवले आहे. सायमन जान्सन यांच्या संशोधनामुळे जागतिक अर्थव्यवस्था आणि राजकीय अर्थशास्त्रातील महत्त्वाचे मुद्दे प्रकाशात आले. त्यांना २०२४ मध्ये डॅरेन एसमोगलू आणि जेम्स रॉबिन्सन यांच्यासह अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. त्यांच्या संशोधनातील प्रमुख तत्त्व ज्यात 'संस्थांची निर्मिती आणि ती समाजाच्या समृद्धीवर कसा परिणाम करते', यावर त्यांनी महत्त्वपूर्ण अभ्यास केलेला आहे.

३) जेम्स ऍलन रॉबिन्सन यांचा जन्म १९६० मध्ये झाला. त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (LSE) मधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी अनेक वर्षे हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्य केले. सध्या युनिव्हर्सिटी ऑफ शिकागोमध्ये पिअर्सन इन्स्टिट्यूट फॉर द स्टडी अँड रिझोल्यूशन ऑफ ग्लोबल कॉन्फ्लिक्ट्सचे संचालक आणि प्राध्यापक आहेत. जेम्स रॉबिन्सनच्या संशोधनाचा मुख्य विषय हा राजकीय

अर्थशास्त्र, आर्थिक विकास आणि विषमतेच्या ऐतिहासिक मुळांवर आहे. त्यांनी आपल्या संशोधनात समाजाच्या यशस्वितेसाठी संस्थांचे महत्त्व विशद केले आहे. 'व्हाय नेशन्स फेल: द ओरिजिन्स ऑफ पॉवर, प्रॉस्पेरिटी, अँड पॉवर्टी' (२०१२) या पुस्तकाचे सहलेखन त्यांनी डॅरेन एसमोगलूसोबत केलेले आहे. हे पुस्तक श्रीमंत आणि गरीब देशांमधील तफावत स्पष्ट करते आणि राजकीय व आर्थिक संस्थांच्या भूमिकेवर भर देते. तसेच 'द नॅरो करिडॉर : स्टेट्स, सोसायटीज अँड द फेट ऑफ लिबर्टी' (२०१९) या प्रसिद्ध पुस्तकाचे देखील सहलेखन त्यांनी डॅरेन एसमोगलूसोबत केलेले आहे. या पुस्तकात स्वातंत्र्य व स्थैर्य टिकवण्यासाठी समाज व राज्यातील परस्परसंबंध स्पष्ट करण्यात आले आहेत.

राजकीय आणि आर्थिक संस्था ह्या आजच्या जगात उत्पन्न असमानतेचे मूलभूत कारण आहे, असे निरीक्षण या अर्थतज्ज्ञांनी आपल्या अभ्यासातून जगासमोर आणले आहे. परंतु विकासाच्या दृष्टीने राजकीय आणि सामाजिक संस्थांचा अभ्यास हा विषय अर्थशास्त्रात नवीन नाही १९१९ मध्ये वॉल्टन हेमिल्टन यांनी या विषयात संशोधन करून संस्थात्मक अर्थशास्त्राचा पाया रचला. डग्लस नॉर्थ यांनी देखील १९८१ मध्ये समाजाच्या संस्थात्मक विश्लेषणाचा आणि दीर्घकालीन विकासासाठी संस्थांचे महत्त्वपूर्ण योगदान याबद्दल माहिती दिली, तसेच गुन्नार मिर्डल, जॉन केनेथ गालब्रेथ, रॉबर्ट फ्रँक अशा बरेचशा नावाजलेल्या अर्थशास्त्रज्ञांनी संस्थात्मक अर्थशास्त्रावर महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. परंतु २०२४ च्या नोबल पारितोषिक विजेत्यांनी या क्षेत्रात एक आगळावेगळा दृष्टिकोन दिलेला असून त्यात त्यांनी राजकीय प्रणाली आणि आर्थिक वाढ याच्यातील व्यापक अनुभवजन्य संबंध स्पष्ट केला आहे. त्यांचा २००१ साली प्रकाशित झालेला 'द कॉलोनियल ओरिजिन्स ऑफ कम्पॅरिटीव्ह डेव्हलपमेंट अँड इम्पेरिकल इन्वेस्टीगेशन' नावाचा पेपर प्रसिद्ध झाला. त्यामध्ये त्यांनी संस्थांचे वर्गीकरण करून या संस्था एखाद्या राष्ट्राच्या विकासासाठी किंवा अधोगतीसाठी कशा कारणीभूत असतात यावर संशोधन केल्याचे आढळून येते. तसेच २००२च्या 'रिव्हर्स ऑफ फॉर्च्यून जिओग्राफी अँड इन्स्टिट्यूशन इन द मेकिंग ऑफ द मॉडर्न वर्ल्ड इन्कम डिस्ट्रीब्यूशन' या लेखात त्यांनी प्रायोगिक पुराव्याद्वारे विविध देशांमधील उत्पन्नात निर्माण होणारी असमानता ही कशा पद्धतीने भौगोलिक परिस्थिती व सांस्कृतिक घटकांमुळे घडून येत नाही, तर बहुलवादी राजकीय संघटनाच याचे मुख्य व कारणीभूत ठरणारे घटक आहे हे दाखवून दिले. तसेच Why Nation Fails - 2012 या पुस्तकातही त्यांनी जगातील विविध देशांचे उदाहरणे देऊन राजकीय अधिकार, सरकारी जबाबदारी, मजबूत केंद्र सरकार, सार्वजनिक सेवा प्रदान करणाऱ्या योजना, कायदे, सुव्यवस्था, खाजगी मालमत्तेचे हक्क आणि करार हे विकासाचे मुख्य स्तंभ आहेत आणि वसाहतकालीन युगात निर्माण झालेल्या शोषणकारी व प्रेरक संस्था याचे व्यापक उदाहरणात्मक व प्रयोगात्मक अध्ययन त्यांनी स्पष्ट केल्याचे दिसून येते. इथेच त्यांच्या कामाची यशोगाथा संपत नाही, तर २०२२ साली प्रकाशित 'पॉवर अँड प्रोग्रेस - अवर थाउजंड इयर्स स्ट्रगल ओवर टेक्नॉलॉजी अँड प्रोस्पेरिटी' या पुस्तकात राजकीय संस्था आणि आर्थिक वाढ यांच्यातील संबंध त्यांनी स्पष्ट केला आहे.

### आर्थिक विकास व वसाहतवाद

जगातील अनेक देशांमध्ये वसाहती स्थापन झाल्या आणि त्यामुळे काही देशांना त्याचा फायदा तर काही देशांना नुकसान भोगावे लागले. या वसाहतकालीन समाजरचनेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक व राजकीय संस्थांतून विधायक तसेच विध्वंसक अशा समाजघटकांची निर्मिती झाली आणि याचे परिणाम आर्थिक विकासावर होताना दिसले. कोणत्याही देशाच्या

अर्थव्यवस्थेत व समाजरचनेत केंद्राची भूमिका बजावणाऱ्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संस्था काळानुसार कशा विकसित होत गेल्या व त्यातून आर्थिक प्रगतीमध्ये निर्माण होणारी तफावत व विषमतेची दरी याचा सखोल अभ्यास जगासमोर मांडण्याचे काम डॅरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन या तीन अर्थतज्ज्ञांनी केले. प्रस्तुत लेखात सर्वात प्रथम वसाहतवाद म्हणजे काय याविषयी थोडक्यात जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

वसाहतवाद (Colonialism) ही १५व्या शतकापासून सुरू झालेली युरोपियन साम्राज्यांची प्रक्रिया आहे, ज्यामध्ये त्यांनी जगभरातील अनेक प्रदेशांवर सत्ता मिळवून त्या भागांचा आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय शोषणासाठी उपयोग केला. या प्रक्रियेमुळे वसाहतींमध्ये आर्थिक विषमता आणि जागतिक असमानता निर्माण झाली. १५व्या शतकापासून २०व्या शतकापर्यंत युरोपियन देशांनी आफ्रिका, आशिया, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया खंडांवर वसाहती निर्माण केल्या. हा वसाहतवाद मुख्यतः राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रभुत्वासाठी प्रेरित होता.

**युरोपियन वसाहतवादाचे प्रमुख उद्देश:**

नवीन व्यापारमार्ग शोधणे आणि संपत्ती जमा करणे, मौल्यवान खनिजे, कच्चा माल आणि गुलामांचा व्यापार करणे हा होता. वसाहतवादाचे काही चांगले परिणामही झाल्याचे दिसते. जसे, आर्थिक विकासाला पूरक ठरणाऱ्या रेल्वे, दळणवळणाची साधने, आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण, कौशल्य यांचा प्रसार. त्यामुळे देशाचा विविधांगी विकास होण्यास मदत झाली. परंतु युरोपियन वसाहतवादाने एकीकडे औद्योगिक आणि आधुनिकतेचा प्रसार तर केला, दुसरीकडे अनेक देशांना सामाजिक आणि आर्थिक शोषणाला सामोरे जावे लागले. वसाहतवाद हा जागतिक असमानतेसाठी मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. त्याच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामांमुळे आजही विकसनशील देशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वसाहतवादाने निर्माण केलेली असमानता दूर करण्यासाठी विकासाच्या सर्वसमावेशक उपाययोजना आणि ऐतिहासिक शोषणाची भरपाई करून देणारे धोरण आवश्यक आहे. वसाहतवाद, आर्थिक विकास आणि जागतिक विषमता या प्रवासाच्या माध्यमातून जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासावर झालेल्या चांगले-वाईट परिणामांची चर्चा त्यांनी आपल्या संशोधनातून घडवून आणलेली आहे.

**डॅरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन यांच्या संशोधनाची मुख्य वैशिष्ट्ये**

**१. संस्थात्मक प्रकार**

a) **समावेशक संस्था (Inclusive Institutions)**

समावेशक संस्था या आर्थिक आणि राजकीय प्रक्रियेत लोकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करून व्यक्तींच्या अधिकारांचे संरक्षण करतात, मालकी हक्कांना प्रोत्साहन देऊन आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीस चालना देतात. ज्यामुळे आर्थिक विकास साध्य करता येतो.

उदा.: उत्तरी अमेरिका, जिथे स्वायत्त आणि समृद्ध संस्था तयार झालेल्या आहेत.

b) **शोषणकारी संस्था (Extractive Institutions)**

शोषणकारी संस्था या राजकीय आणि आर्थिक अधिकार एका छोट्या गटाच्या हातात केंद्रित करतात. ज्यामुळे आर्थिक विकास संथ राहून त्याचा प्रतिकूल परिणाम हा आर्थिक विकासावर होतो व त्याची परिणती ही आर्थिक विषमतेत वाढ होण्यास होते.

उदा.: दक्षिण अमेरिका आणि आफ्रिका, जिथे वसाहतवाद्यांनी स्थानिक संसाधनांवर केंद्रीकरण केले.

**२. औपनिवेशिक वारसा आणि त्याचा परिणाम**

अर्थशास्त्राचे २०२४चे नोबेल पारितोषिक

विजेत्यांनी आपल्या संशोधनातून सिद्ध केले की, वसाहतवादाच्या काळातील 'सेटलर मॉर्टेलिटी' (Settler Mortality) किंवा वसाहतवादी स्थायिकांच्या मृत्युदराने त्या ठिकाणी तयार होणाऱ्या संस्थांच्या स्वरूपावर प्रभाव टाकला. ज्या ठिकाणी हवामान व आरोग्याच्या दृष्टीने पोषक परिस्थिती होती, तिथे अधिक स्थिर आणि समावेशक संस्था तयार झाल्या, तर हवामान व आरोग्याच्या दृष्टीने पोषक नसणाऱ्या वातावरणात मात्र अस्थिर आणि केंद्रीकृत संस्था तयार झाल्याचे त्यांनी आपल्या संशोधनातून स्पष्ट केलेले आहे. उच्च मृत्युदर असलेल्या ठिकाणी (उदा. मलेरियाग्रस्त भाग), वसाहतवाद्यांनी शोषणकारी संस्था निर्माण केल्या, ज्याचा परिणाम आजही त्या ठिकाणच्या आर्थिक व्यवस्थेत दिसून येतो.

### ३. सत्तेचे केंद्रीकरण आणि त्याचा आर्थिक प्रभाव :

त्यांनी दाखवले की, सत्तेचे केंद्रीकरण आणि संसाधनांच्या वितरणातील असमानता हे गरीब देशांच्या स्थिरतेस अडथळा निर्माण करतात. त्यांच्या संशोधनाने विविध देशांतील आर्थिक असमानतेची मुळे शोधण्यासाठी एक नवीन चौकट उपलब्ध केली.

### लोकशाही व आर्थिक विकास

राष्ट्राचा सर्वांगीण आर्थिक विकास व्हावा या हेतूने लोकशाही अधिक सुदृढ असावी असे मत त्यांनी आपल्या महत्त्वपूर्ण संशोधनातून जगासमोर मांडले. लोकशाही व्यवस्था कायद्याचे शासन (Rule of Law) आणि समान अधिकार (Equal Right) सुनिश्चित करून आर्थिक विकासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करतात. त्यांच्या 'Democracy Does Cause Growth' या संशोधनामध्ये त्यांनी दाखवले की लोकशाहीमध्ये आर्थिक विकासाचे प्रमाण जास्त असते. त्यांचे संशोधन मुख्यत: संस्थात्मक पायाभूत संरचनेच्या (Institutional Framework) आणि लोकशाही व्यवस्थेच्या आर्थिक समृद्धीशी संबंध स्पष्ट करते. त्यांच्या संशोधनातून असे दिसून आले की, संस्थात्मक रचना आणि लोकशाही व्यवस्थेचा आर्थिक समृद्धीशी घट्ट संबंध आहे.

आर्थिक विकासाला चालना देणारे घटक, ज्या अनुकूल आर्थिक वातावरणात आर्थिक विकास साधला जातो. या सर्व घटकांना वृद्धिंगत करण्याचे काम लोकशाही व्यवस्थेत केल्या जाते. तसेच समावेशक संस्था (Inclusive Institutions) वैयक्तिक संपत्तीचे रक्षण, बाजारपेठेतील अनुकूल स्पर्धेला चालना देणे आणि नवकल्पनांसाठी पोषक वातावरण निर्माण करतात.

### लोकशाहीतून सर्वसमावेशक संस्थांचा उगम

लोकशाही व्यवस्थेमध्ये कायद्याचे पालन आणि सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करून दिल्या जातात.समावेशक संस्था वैयक्तिक संपत्तीचे रक्षण करतात, बाजारपेठेतील स्पर्धेला चालना देतात आणि नवकल्पनांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करतात. हे सर्व आर्थिक विकासाला चालना देणारे घटक ठरतात. लोकशाही व्यवस्थेमुळे राजकीय स्थिरता निर्माण होते, जी आर्थिक गुंतवणूक वाढवण्यासाठी महत्त्वाची ठरते. अशा स्थिरतेमुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढतो. लोकशाहीमध्ये लोकांना त्यांचे हक्क मिळतात, ज्यामुळे सामाजिक असमानता कमी होते आणि आर्थिक विकास सर्वसमावेशक होतो. त्यांच्या 'Democracy Does Cause Growth' या संशोधनात असे दर्शवले गेले आहे की, लोकशाही व्यवस्थेत नव्याने उदयास येणाऱ्या उद्योगांसाठी श्रमिकांना अधिक चांगले पर्याय उपलब्ध होतात. त्यांचे संशोधन असे दाखवते की, दीर्घकालीन आर्थिक वाढीसाठी लोकशाही व्यवस्थेमध्ये संस्थात्मक सुधारणांची शक्यता अधिक असते. त्यांनी ऐतिहासिक विश्लेषणातून हे सिद्ध केले की, जे देश लोकशाहीचा अवलंब करतात त्यांच्यात दीर्घकाळ टिकणाऱ्या आर्थिक

सुधारणांची अधिक शक्यता असते. शोषक संस्था जिथे सत्ताधारी वर्ग संसाधनांचे शोषण करतो, अशा व्यवस्थांमध्ये आर्थिक असमानता वाढते आणि दीर्घकालीन विकासावर विपरीत परिणाम होतो. लोकशाही व्यवस्थेमुळे संस्थात्मक सुधारणा सोपी होते आणि लोकांच्या सहभागातून विकासाला चालना मिळते. लोकशाही व्यवस्थेच्या संरक्षणासाठी कायद्यांचे पालन व लोकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे.

**दोन शहरांची गोष्ट**

डॅरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन या तिघांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राजकीय आणि सामाजिक संस्थांचा सहभाग आणि भूमिका या क्षेत्रात मूलभूत संशोधन केले असून, विविध देशांच्या प्रगतीमध्ये या संस्था किती महत्त्वाच्या आहेत हे पटवून देण्याकरिता पाश्चात्त्य युरोप, अमेरिका, आफ्रिका, दक्षिण आशिया, दक्षिण अमेरिका, पूर्वयुरोप अशा जगभरातील विविध देशांविषयी चर्चा आणि ५०० वर्षांहून अधिक काळातील विविध ऐतिहासिक उदाहरणाचा आढावा त्यांनी आपल्या 'Why Nations Fail' या पुस्तकात मांडला आहे . गरिबी व विषमतेची कारणे तसेच वसाहतवाद व सरंजामशाहीचा इतिहास समजून सांगण्याचा प्रयत्न त्यांनी यात केला आहे.

'व्हाय नेशन्स फेल' या पुस्तकात काही देश श्रीमंत तर काही गरीब का असतात? या प्रश्नावर विश्लेषणात्मक चर्चा केल्याची दिसून येते. तसेच समावेशक व शोषक संस्थांमधील फरक स्पष्ट केला आहे. 'शोषण करणाऱ्या संस्था' (Extractive Institutions) आणि 'समावेशक संस्था' (Inclusive Institutions) असलेल्या समाजांतील ऐतिहासिक उदाहरणे दिली आहेत. शोषण करणाऱ्या संस्था समाजातील आर्थिक आणि राजकीय उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी फक्त विशिष्ट गटांना परवानगी देतात. या संस्था राजकीय अस्थिरता, आर्थिक स्थिरता गमावणे आणि अखेरीस राज्याच्या पतनाला कारणीभूत ठरतात. समावेशक संस्था, दुसरीकडे, समाजातील सर्व सदस्यांना आर्थिक आणि राजकीय उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या संधी देतात. ज्यामुळे लोकशाही, नावीन्य आणि दीर्घकालीन समृद्धीचा विकास होतो. समावेशक संस्था आर्थिक समृद्धीचा मार्ग मोकळा करतात, तर शोषण करणाऱ्या संस्था दारिद्र्याला कारणीभूत ठरतात. त्यांनी आपल्या पुस्तकात वेगवेगळ्या देशांचे उदाहरण घेऊन या संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. जसे, नोगालेस, ॲरिझोना (अमेरिका) आणि नोगालेस, सोनोर (मेक्सिको) यामध्ये विभागले गेले आहे. ही दोन्ही शहरे एकमेकांच्या शेजारी आहेत आणि त्यांचा इतिहास, संस्कृती, आणि भौगोलिक परिस्थिती सारखी आहे. तरीही अमेरिका मेक्सिकोपेक्षा खूपच अधिक श्रीमंत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे समावेशक आणि शोषण करणाऱ्या संस्था ज्या आर्थिक विकासाचे खरे मुख्य घटक आहेत. विशेषतः दीर्घकालीन आर्थिक समृद्धीसाठी समावेशक आर्थिक संस्था (Inclusive Economic Institutions) आवश्यक आहेत. या संस्थांमध्ये मालमत्ता हक्क, स्पर्धेसाठी समान संधी आणि नव्या व्यवसायांच्या प्रोत्साहनाचा समावेश होतो. जेव्हा अशा संस्था अस्तित्वात असतात, तेव्हा लोक आपले कौशल्य आणि शिक्षण यामध्ये गुंतवणूक करतात. कारण त्यांना माहीत असते की, त्यांना आपल्या गुंतवणुकीतून नफा मिळण्याची संधी मिळेल. शोषण करणाऱ्या संस्थांमुळे समृद्धीला अडथळा येतो. यामध्ये एक छोटासा गट व्यापक लोकसंख्येला वगळून सत्ता आणि संसाधनांवर नियंत्रण ठेवतो. अशा संस्था मूलतः वाढविरोधी असतात. कारण त्या नवकल्पनांना दडपतात, गुंतवणुकीला प्रोत्साहित करतात आणि आर्थिक संधींचा विस्तार रोखतात. 'शोषण करणाऱ्या संस्था दीर्घकाळ टिकू शकतात; परंतु अखेरीस त्या गरिबी, रोगराई, आणि अकाली मृत्यू निर्माण करून स्वतःच्या नाशाचे

बीज पेरतात. याच्या उलट, समावेशक संस्था त्या संस्थांना आर्थिक क्रियाकलापांमध्ये मोठ्या लोकसंख्येला सहभागी होण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्यांचा आणि प्रतिभेचा उपयोग करण्यासाठी सक्षम करतात आणि व्यक्तींना त्यांना हवे असलेले निर्णय घेण्याची मुभा देतात.'

एखाद्या संकटाला समाज कशा प्रकारे प्रतिसाद देतो, त्यावरून त्या समाजाचा समावेशक किंवा शोषण करणाऱ्या राजकीय आणि आर्थिक संस्थांकडे जाणारा मार्ग निश्चित होतो. उदाहरणार्थ - इंग्लंडमध्ये, महामारीमुळे झालेल्या मजुरांच्या कमतरतेमुळे मजुरीत वाढ झाली आणि कामगार वर्गासाठी आर्थिक संधी उपलब्ध झाल्या. यामुळे अधिक समावेशक संस्था स्थापन होऊन इंग्लंडने दीर्घकालीन समृद्धी साध्य केली. त्याउलट, फ्रान्समध्ये उच्चभ्रू वर्गाने पुन्हा शोषण करणाऱ्या सामंती प्रथांना लागू करून संसाधने आणि श्रमिकांवर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला, ज्यामुळे दोन्ही देशांमध्ये आर्थिक विकासाच्या मार्गांत दीर्घकालीन फरक पडला. त्यांनी संस्थात्मक प्रवाहाची चर्चा अनेक ऐतिहासिक उदाहरणांद्वारे केली आहे. जसे की, रोमचे पतन, अटलांटिक व्यापारादरम्यान इंग्लंड आणि फ्रान्समधील फरक आणि युरोपमध्ये उदयास आलेले सरंजामशाही (फ्यूडलिझम) देश गरिबीपासून मुक्त होऊ शकतो. जर त्यांच्याकडे समावेशक संस्थांच्या विकासाला चालना देणारी बहुलवादी राजकीय कार्यप्रणाली सक्षम असेल, तर देश केवळ तेव्हाच आर्थिक प्रगती टिकवू शकतो. जेव्हा त्यांच्या आर्थिक संस्था योग्य असतात आणि बहुलवादी राजकीय प्रणाली समावेशक संस्था आणि नावीन्यपूर्ण बदलांना प्रोत्साहन देते.

समावेशी आर्थिक संस्था दीर्घकालीन समृद्धीसाठी आधार निर्माण करतात; पण त्या आपोआप उभ्या राहात नाहीत. तर राजकीय शक्तीचा वापर करून समावेशी आर्थिक संस्थां निर्माण करून आणि टिकवून ठेवणे आवश्यक आहे. 'झिम्बाब्वेचे आर्थिक संकट हे केवळ वाईट आर्थिक धोरणे किंवा खराब आर्थिक भाग्याचा प्रश्न नाही; यामागे त्याच्या राजकीय संस्थांचा आणि त्यांच्यातील प्रेरणांची प्रकृति आहे.' उल्लेखनीय म्हणजे, 'Why Nation Fail' या पुस्तकाने इतिहासाच्या असंख्य उदाहरणांची लक्षणीयता दाखवली आहे. प्राचीन रोमपासून आधुनिक साऊथ आफ्रिकेपर्यंत, ते कसे राजकीय संस्था आर्थिक संस्था आणि धोरणांवर प्रभाव टाकतात हे स्पष्ट करण्यात आले आहे.

**आर्थिक विकासात संस्थात्मक रचना व तिच्या कार्ययंत्रणेची भूमिका**

आर्थिक विकासात सामाजिक संस्था व राजकीय संस्थांचे महत्त्व नोबल पारितोषिक विजेत्यांनी आपल्या संशोधनातून दाखवून दिले आहे. वसाहतवादाच्या गुलामगिरीला बळी पडणाऱ्या देशांना या राजकीय व सामाजिक संस्थांनी कशा प्रकारे वाचा फोडली याची प्रचिती वेळोवेळी त्यांच्या या संयुक्त लेखनातून वाचकाला आल्याशिवाय राहात नाही. संशोधकांचे राजकीय अर्थशास्त्र, संस्थात्मक अर्थशास्त्र आणि आर्थिक विकास या क्षेत्रातील योगदान खूप प्रभावशाली असून, या क्षेत्रात रुची ठेवणाऱ्या भावी संशोधकांना नवी दिशा प्रदान करणारे आहे .

संस्थात्मक अर्थशास्त्र, आर्थिक विचारांचा इतिहास, आर्थिक विषमता, संस्कृती व समृद्धीचे पतन यासारख्या अर्थशास्त्रातील विविध शाखांमध्ये आजपर्यंत बरेच संशोधन झाले असून, डॅरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन यांनी या क्षेत्रात वसाहतवादाचा इतिहास आणि त्यातून निर्माण होणारा आर्थिक विकास आणि जागतिक विषमतेची दरी व याला कारणीभूत ठरणारी समाजरचनेतील राजकीय व सामाजिक संस्था यावर चर्चात्मक संशोधन करून एक आगळावेगळा दृष्टिकोन निर्माण केला आहे, जे आर्थिक विकासात तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी बहुउपयोगी ठरणारे

आहे. त्यांनी हे दाखवून दिले आहे की, कुठल्याही देशाच्या आर्थिक विकासाकरिता केवळ त्या देशाची भौगोलिक परिस्थिती व साधनसंपन्नताच महत्त्वाची नसते, तर त्या देशाची संस्थात्मक रचना व त्याची कार्ययंत्रणाही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांनी आपल्या संशोधनात साम्यवादी उत्तर कोरिया व भांडवलवादी दक्षिण कोरिया यांच्यातील विभाजनानंतर दोन्ही देशात निर्माण झालेली विषमता यांसारखे अनेक देशांचे सुसंगत उदाहरण घेऊन आंतरराष्ट्रीय विषमतेचे स्पष्टीकरण देणारे सिद्धांत स्पष्ट केले आहे. ज्यामुळे त्यांच्या या संशोधनाची उपयुक्तता अधिकच वाढती आहे. त्यांच्या या संशोधनाच्या ऐतिहासिक प्रवासात जगातील विविध देश वेगवेगळी का विकसित झाली? काहींनी समृद्धीची उंची गाठली, तर काही आर्थिक पतनाच्या आहारी गेल्या. अशा स्वरूपाचा एक तुलनात्मक अभ्यास हा खरोखरच प्रशंसनीय स्वरूपात त्यांनी जगासमोर मांडला व ते नोबल पारितोषिकाचे खरे मानकरी ठरले.

**भारत आणि वसाहतवाद**

पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि नंतर ब्रिटिश म्हणजेच इंग्रजांनी स्थापन केलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर वसाहतवादी धोरण राबविले. त्यातून झालेला आर्थिक विकास हा शोषणात्मक स्वरूपाचा असून, भारतीय शेतकऱ्यांपासून तर हस्तकला व कलाकुसरीचे उद्योग करणाऱ्या पारंपरिक नावाजलेल्या उद्योजकांपर्यंतचे शोषण या वसाहतवादामुळे झाल्याचे पडसाद इतिहासातून वेळोवेळी जाणवते. इंग्रजांच्या वसाहतवादामुळे शिक्षणाचा प्रसार, रेल्वे, वाहतूक, पोस्ट यंत्रणा, दळणवळणाचा विस्तार, आधुनिक बँका इत्यादींचा विकास झाला. भारताला झालेला फायदा हा वसाहतीच्या काळात उद्ध्वस्त झालेल्या लघु व कुटीर उद्योगांसमोर खूप लहान आहे. उद्योगांना पुनर्जीवित करण्यासाठी भारतात सार्वजनिक आणि आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागली. तरीदेखील जातीभेद, वर्गभेद, भ्रष्टाचार, गरिबी यांसारख्या समस्यांमुळे भारताच्या आर्थिक संस्थांची पायाभरणी कमकुवत ठरली व भारताचा आर्थिक विकास मंद झाला.

ब्रिटिश प्रशासनाने आधुनिक संसदीय लोकशाहीचा पाया घातला. ज्यामुळे राजकीय यंत्रणा सक्षम झाली व बहुलवादी राजकीय कार्य प्रशासन विकसित झाले, तरीदेखील भारताचा आर्थिक विकास हा इतर विकसित राष्ट्रांपेक्षा मागे राहिल्याचे दिसून येते. यंदाच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांनी मांडलेल्या त्यांच्या सिद्धांताचे प्रतिबिंब भारताच्या आर्थिक प्रगतीत दिसून येत नाही. हा विरोधाभास भारता इतकाच मर्यादित नाही, तर चीनच्या बाबतीतही दिसून येतो. एकाच नैसर्गिक सीमेवर असणाऱ्या चीनने वाढती लोकसंख्या असून देखील साम्यवादाच्या जोरावर वसाहतवादाच्या शोषणकारी धोरणाला पराजित केले आणि आपल्या आर्थिक विकासाचे ध्येय साध्य केल्याचे दिसून येते.

**समारोप**

आर्थिक प्रगती साधण्याकरिता जगातील विविध देशांची चढाओढ आणि त्यात राजकीय संस्था व सामाजिक संस्थेची कामगिरी याचा परस्परसंबंध या तीन अर्थतज्ज्ञांनी अगदी समर्पक उदाहरणे देऊन जगासमोर मांडला आहे. 'व्हाय नेशन्स फेल' हे पुस्तक वाचताना प्रत्येक देशाला जणू आपण कशा पद्धतीने वसाहतवादाला बळी पडलो आणि दीर्घकाळ विकासापासून वंचित राहिलो याची नक्कीच प्रचिती येईल. त्यांनी आपल्या पुस्तकात विविध देशांची जी जिवंत उदाहरणे घेऊन संस्थात्मक अर्थशास्त्राचे महत्त्व पटवून दिले व आपल्या संशोधनाची ऐतिहासिक पद्धत जगाच्या आर्थिक विकासाच्या इतिहासावर एक नवे तंत्र विकसित करण्यास कशी योग्य आहे हे सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या या चर्चात्मक अभ्यासातून भविष्यात नव्या प्रेरणा निर्माण होतील, भावी अभ्यासकांना त्याचा नक्कीच फायदा होऊन देशाच्या विकासासाठी निर्णायक

भूमिका निभवणारे घटक म्हणजे राजकीय, आर्थिक व सामाजिक संस्था व त्यातही समावेशी संस्था ज्या राष्ट्राला समृद्धीकडे नेतात, तर शोषणात्मक म्हणजे संग्राहक संस्था ज्या आर्थिक पतनाला कारणीभूत ठरतात यांचे स्पष्टीकरण समकालीन उदाहरणे घेऊन लेखकाने अगदी योग्य प्रकारे केले आहे.

वसाहतवादामुळे भारतासारख्या देशात 'ड्रेन ऑफ वेल्थ' निर्माण झाला तर इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती आणि ग्लोरियस क्रांती होऊन त्या देशाने आर्थिक समृद्धीचा शिखर गाठला. यामुळे जगभरात विकसित आणि विकसनशील देशांमधील आर्थिक अंतराचे प्रचंड प्रमाण वाढल्याचे दिसून येते व ही जागतिक आर्थिक विषमतेची दरी भरून काढणे किती महत्त्वाचे आहे हे या तीन अर्थतज्ज्ञांनी आपल्या संयुक्त लेखनातून वेळोवेळी जगाला पटवून दिले आहे. जगाचा आर्थिक इतिहास आणि त्याचा भविष्यावर झालेला दूरगामी परिणाम आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, याची प्रचिती त्यांच्या  या संशोधन कार्यातून येते. नोबेल पारितोषिक विजेते म्हणून यांनी आपली कामगिरी येथे सिद्ध केल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) Daron Acemoglu, Simon Johnson, James Robinson, The Role of Institutions in Economics Development (Journal of Economic Perspective, 2005).

२) Diamond, J., Guns, Germs and Steel New York: W. W. Norton and CO., 1997

३) Institutions as the Fundamental Cause of Long-Run Growth-Handbook of Economic Growth, Volume 1A (2004)

४) North, D. C., Structure and Change in Economic History New York: Norton. 1981

५) Sachs. J., The End of Poverty: Economic Possibilities for Our Time, New York: Penguin, 2006.

६) डॅरेन एसमोगलु आणि जेम्स रॉबिन्सन लोकशाहीच्या उगमाच्या आर्थिक आणि राजकीय कारणांचा तपशीलवार अभ्यास, प्रकाशन: Cambridge University Press, 2006.

७) डॅरेन एसमोगलु आणि जेम्स रॉबिन्सन, Why Nations Fail: The Origins of Power, Prosperity, and Poverty: समावेशक आणि शोषणात्मक संस्थांचा प्रभाव, Crown Business, 2012.

८) डॅरेन एसमोगलु आणि सायमन जान्सन तंत्रज्ञानाचा विकास आणि आर्थिक समृद्धी यामधील संबंधाचा अभ्यास Power and Progress: Our Thousand-Year Struggle Over Technology and Prosperity: Public Affairs, 2023.

९) अपर्णा कुलकर्णी, वसाहतवाद, विकास आणि विषमतेच्या इतिहासातून भविष्याकडे-लोकसत्ता दैनिक, २० ऑक्टो. २०२४.


◆

स्थिर सरकार असलेल्या प्रगत अर्थव्यवस्था ज्या त्यांच्या स्वत:च्या चलनात कर्ज घेतात, संकट न करता अत्यंत उच्च पातळीवरील कर्ज उचलण्यास सक्षम असतात.

**- पॉल क्रुगमन**

# डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान

**सुरज रामचंद्र चिगरे** †
**रोहिदास अर्जुन अभंगे** ††

**प्रस्तावना**

भारताच्या आर्थिक वाढीला वेग देणारे महत्त्वपूर्ण घटक म्हणजे शाश्वत विकास, समावेशकता आणि धोरणात्मक दृष्टिकोन. १९९१ मध्ये मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली सुरू केलेल्या आर्थिक सुधारणा आणि धोरणांनी भारतीय अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडवून आणला. या सुधारणा विशेषतः मुक्त व्यापार, औद्योगिक व वित्तीय क्षेत्रात नवे परिवर्तन आणि खाजगीकरण यावर लक्ष केंद्रित करत होत्या. त्याचवेळी, या धोरणांनी भारतातील गरीब आणि वंचित वर्गासाठी आर्थिक संधी उघडण्यावर विशेष लक्ष दिले, ज्यामुळे आर्थिक समावेशनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

मनमोहन सिंग यांच्या आर्थिक धोरणांनी, विशेषतः वित्तीय समावेशनाच्या क्षेत्रात, देशात एक नवा पर्व सुरू केला. सरकारने ग्रामीण भागातील नागरिकांसाठी बँकिंग सेवा आणि वित्तीय साधनांची उपलब्धता सुनिश्चित केली. या सुधारणांनी भारतातील शहरी आणि ग्रामीण भागामध्ये असलेले वित्तीय अंतर कमी केले आणि सामान्य जनतेला औपचारिक वित्तीय सेवा घेण्याची संधी दिली. तथापि, वित्तीय समावेशनाची संकल्पना केवळ सरकारी धोरणांपर्यंत मर्यादित नाही. या धोरणांना समर्थन देणारी तंत्रज्ञानाच्या वाढीविषयी चर्चादेखील महत्त्वाची ठरली आहे. डिजिटल तंत्रज्ञान आणि फिनटेक क्षेत्राच्या विकासामुळे वित्तीय सेवांची उपलब्धता अजून सहज आणि वाजवी बनली आहे. सरकारच्या योजनेने व फिनटेक कंपन्यांच्या इनोव्हेशनमुळे, गरीब आणि वंचित वर्गाला मुख्यधारेत आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

सामाजिक समावेशन, आर्थिक समावेशन आणि आर्थिक साक्षरतेच्या क्षेत्रात झालेल्या या प्रगतीने भारताच्या अर्थव्यवस्थेच्या संतुलित वाढीस महत्त्वाची दिशा दिली आहे. आर्थिक धोरणे आणि तंत्रज्ञानाने एकत्र येऊन आर्थिक समावेशनाच्या दृष्टिकोनातून भारताला एक नवीन दिशा दिली आहे.

**अतिमहत्त्वाचे शब्द :**

मनमोहन सिंग, वित्तीय समावेशन, आर्थिक

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र.२०९२ भ्रमणध्वनी:९५९५२२११४४ ई-मेल: surajchigare1144@gmail.com
†† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र.२०९३ भ्रमणध्वनी:८६०५९७४२५५ ई-मेल:rohidasabhange@gmail.com

सुधारणा, प्राथमिकता क्षेत्र कर्ज, शून्य शिल्लक खाती, ग्रामीण बँकिंग, आर्थिक उदारीकरण, सूक्ष्म वित्तीय संस्था, वित्तीय साक्षरता इत्यादी.

**डॉ. मनमोहन सिंग यांचा जीवनपरिचय**

भारताचे १४ वे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत व अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रति असलेला व्यासंगी व शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे त्यांच्याकडे आदराने बघितले जाते. पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. डॉ. सिंग यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व पंजाब विद्यापीठापासून इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठापर्यंत विस्तारलेले आहे. १९५७ साली त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९६२ साली डॉ. सिंग यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी. फील. संपादन केली. त्यांचे 'इंडियाज एक्स्पोर्ट ट्रेंड्स ॲन्ड प्रोस्पेक्ट्स फोर सेल्फ ससटेन्ड ग्रोथ' हे पुस्तक भारताच्या अंतस्थ व्यापारी धोरणाची समीक्षा करणारे आहे.

पंजाब विद्यापीठ व प्रथितयश दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून काम करत असताना डॉ. सिंग यांची शैक्षणिक ओळख अधिक समृद्ध झाली. या काळात युएनसीटीएडी सचिवालयात त्यांनी काही काळ काम पहिले होते. त्यातूनच त्यांची १९८७ आणि १९९० या काळात जीनिव्हा येथील साऊथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. डॉ. सिंग यांनी १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली व त्यांचा सरकारमध्ये प्रवेश झाला. त्यातूनच १९७२ साली त्यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. डॉ. सिंग यांनी अर्थमंत्रालयात भूषविलेल्या अनेक महत्त्वाच्या पदांमध्ये अर्थमंत्रालयाचे सचिवपद, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद आदी पदांचा समावेश होतो. स्वतंत्र भारतच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानल्या जाणाऱ्या १९९१-१९९६ या पाच वर्षांच्या काळात डॉ. सिंग यांनी भारताचे अर्थमंत्रीपद भूषविले. भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष धोरण तयार करण्यात सिंग यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. हा काळ डॉ. सिंग यांच्या नावाशी घट्ट जोडला गेला आहे.

त्यांच्या कारकिर्दीत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांपैकी भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण पुरस्कार (१९८७), भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्मशताब्दी सन्मान (१९९५), अर्थमंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवार्ड (१९९३ व १९९४), केंब्रिज विद्यापीठाचा ॲडम स्मिथ पुरस्कार (१९५६), केंब्रिमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल राईट पुरस्कार असे काही विशेष पुरस्कार आहेत. याशिवाय जपान निहोन कायझाई शिम्बून सारख्या अनेक संस्थांनी डॉ. सिंग यांना सन्मानित केले आहे. केंब्रिज व ऑक्सफोर्ड सारख्या अनेक विद्यापीठांकडूनही डॉ. सिंग यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ. सिंग यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संघटनांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांनी १९९३ मध्ये सायप्रस येथे राष्ट्रकुल प्रमुखांच्या बैठकीत आणि व्हिएन्ना येथे मानवाधिकारावरील जागतिक परिषदेत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले.

डॉ. सिंग यांनी १९९१ पासून राज्यसभा या वरिष्ठ सभागृहात खासदारपद भूषविले आहे. १९९८-२००४

च्या दरम्यान त्यांनी राज्यसभेत विरोधी पक्ष नेत्याची भूमिकाही पार पाडली आहे. २२ मे २००४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकानंतर डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली व २२ मे २००९ रोजी त्यांनी दुसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. पंतप्रधान म्हणून त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात, त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला सर्वसमावेशक बनवण्यासाठी अनेक धोरणात्मक पावले उचलली. त्यांनी गरिबांसाठी सरकारी योजनांमध्ये सुधारणा केली. जसे की, 'मनरेगा' (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना), 'राष्ट्रीय आरोग्य सुरक्षा योजना' इत्यादी. पंतप्रधानपदावर असताना, त्यांचे सरकार आर्थिक समावेशकता, गरिबी निर्मूलन आणि सामाजिक संरक्षण यावर लक्ष केंद्रित करत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने आणखी एक शतकाचा वर्धमान विकास पाहिला. २०१४ मध्ये पंतप्रधान पदाची मुदत संपल्यानंतर, त्यांनी भारतीय राजकारणात एक मार्गदर्शक भूमिका निभावली.

मनमोहन सिंग यांचे पंतप्रधानपद २०१४ मध्ये समाप्त झाले; परंतु त्यांच्या धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील अनेक सुधारणा दीर्घकाळ टिकल्या. त्यांना एक प्रगल्भ अर्थशास्त्रज्ञ आणि प्रामाणिक नेता म्हणून ओळखले जात आहे.

**मनमोहन सिंग यांच्या काळातील वित्तीय समावेशन धोरणे**

डॉ. मनमोहन सिंग यांचा विशेष जोर समाजातील गरीब आणि उपेक्षित गटांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचवण्यावर होता. १९९१च्या आर्थिक उदारीकरणानंतर, त्यांनी भारतातील वित्तीय समावेशन वाढवण्यासाठी विविध धोरणात्मक उपाययोजना केल्या. यामुळे बँकिंग सेवा ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांपर्यंत पोहोचल्या आणि देशातील अनेक घटक औपचारिक वित्तीय प्रणालीचा भाग बनले. त्यांची धोरणे पुढील प्रमुख मुद्द्यांवर आधारित होती.

**१. प्राथमिकता क्षेत्र कर्जधोरण**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिकता क्षेत्र कर्जधोरण भारताच्या ग्रामीण भागाचा आर्थिक विकास आणि उपेक्षित घटकांचे सक्षमीकरण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरले. या धोरणांतर्गत बँकांना कृषी, लघुउद्योग, शिक्षण, गृहनिर्माण, समाजकल्याण आणि दुर्गम भागातील प्रकल्पांसाठी कर्ज देणे बंधनकारक करण्यात आले. यामुळे देशातील दुर्बल घटकांना औपचारिक बँकिंग प्रणालीशी जोडण्याचा प्रयत्न झाला. कृषी क्षेत्राला वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी धोरणात्मक योजना राबवण्यात आल्या. शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक साधनसामग्री, बियाणे आणि सिंचनासाठी सुलभ दरात कर्ज देण्यात आले.

**२. शून्य शिल्लक खाती**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात वित्तीय समावेशन वाढवण्यासाठी गरीब आणि अल्पउत्पन्न गटातील लोकांना बँकिंग प्रणालीचा भाग बनवण्याच्या उद्देशाने शून्य शिल्लक खाती सुरू करण्यात आली. या धोरणामुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना बँकिंग सुविधा सहज उपलब्ध झाल्या. यासाठी बँकांनी कमी दस्तऐवज आणि सोप्या प्रक्रियेसह खाते उघडण्याची संधी दिली. शून्य शिल्लक खाती ही अशी बँक खाती होती. ज्यात कोणत्याही प्रकारचे मिनिमम बॅलन्स ठेवण्याची अट नव्हती. गरीब आणि अल्पउत्पन्न असलेल्या लोकांना बचत करण्याची सवय लावणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. या खात्यांद्वारे गरीब लोकांना बचत, कर्ज, विमा आणि पेन्शनसारख्या वित्तीय सेवांमध्ये सहभाग घेता आला.

**३. सूक्ष्म वित्तीय संस्था**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात गरिबांसाठी वित्तीय समावेशन वाढवण्यासाठी सूक्ष्म वित्तीय संस्थांना (MFIs) प्रोत्साहन देण्यात आले. ग्रामीण आणि

आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकसंख्येसाठी या संस्थांनी लहान कर्जे आणि वित्तीय सहाय्य उपलब्ध करून दिले. विशेषतः ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयं-सहायता गटांचे (Self-Help Groups - SHGs) जाळे मजबूत करण्यात आले. सूक्ष्म वित्तीय संस्थांद्वारे शेतकरी, लघुउद्योजक आणि महिलांना छोट्या रकमांचे कर्ज उपलब्ध झाले. कमी व्याजदरावर दिल्या जाणाऱ्या या कर्जांमुळे गरीब लोकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल मिळाले. यातून अनेक महिलांनी किरकोळ व्यापार, हस्तकला, कुक्कुटपालन आणि इतर लघु उद्योग सुरू केले. यामुळे महिलांचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण झाले.

### ४. ग्रामीण बँकिंगचा विस्तार

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात ग्रामीण भारताला औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यासाठी ग्रामीण बँकिंगच्या विस्तारावर विशेष भर देण्यात आला. दुर्गम भागातील लोकसंख्येला वित्तीय सेवांचा लाभ मिळावा आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा, यासाठी व्यापक धोरणे राबवण्यात आली. ग्रामीण भागात बँक शाखा उघडणे, मोबाइल बँकिंग आणि एटीएम सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला गेला. राष्ट्रीय बँकांसोबत प्रादेशिक ग्रामीण बँकांची (Regional Rural Banks - RRBs) भूमिका वाढवली गेली. या बँकांद्वारे शेतकरी, लघु उद्योजक आणि गरीब कुटुंबांना कर्ज उपलब्ध करून दिले गेले. तसेच यामुळे दुर्गम भागातील लोकांना शेतीसाठी, लघुउद्योगांसाठी आणि वैयक्तिक गरजांसाठी वित्तीय सहाय्य मिळाले.

### ५. स्वयंरोजगाराला चालना

डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी विविध धोरणे राबवली. ज्यामुळे ग्रामीण आणि उपेक्षित भागातील लोकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळाली. त्यांचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करणे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देणे होता. या धोरणांतर्गत, सरकारने रोजगार निर्माण करण्यासाठी विविध योजनांची सुरुवात केली. राष्ट्रीय स्वयंरोजगार कार्यक्रम (NREP) आणि स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) या योजनांद्वारे लोकांना तांत्रिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले गेले. यामुळे युवकांना रोजगारनिर्मितीच्या नवनवीन मार्गांची माहिती मिळाली आणि त्यांनी विविध उद्योगांमध्ये आपले करियर सुरू केले. महिलांसाठी विशेष कर्ज योजना राबवण्यात आल्या, ज्या त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या.

### ६. तंत्रज्ञानावर आधारित बँकिंग

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात तंत्रज्ञानावर आधारित बँकिंग (Technology-Driven Banking) क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडले. डिजिटल बँकिंगला प्रोत्साहन देऊन बँकिंग क्षेत्र अधिक सुलभ, सुरक्षित आणि वेळेच्यादृष्टीने कार्यक्षम बनवले गेले. यामुळे ग्रामीण भागातील लोकांसाठी बँकिंग सेवा सहज उपलब्ध झाली. RTGS, NEFT, IMPS यांसारख्या डिजिटल पेमेंट प्रणालींच्या प्रचारामुळे, बँकांच्या क्लिष्ट प्रक्रियांमध्ये लवचिकता आली आणि रिअल टाइममध्ये पैसे ट्रान्सफर करणे शक्य झाले. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार अधिक प्रभावीपणे होत गेले. मोबाइल बँकिंग आणि ऑनलाइन बँकिंगसुविधादेखील ग्रामीण आणि दुर्गम भागात पोहोचवण्यात आल्या. यामुळे लोकांनी आपल्या स्मार्टफोनद्वारे बँकिंग सेवा घेतल्या, ज्यामुळे बँक शाखांपर्यंत जाऊन वेळ घालवण्याची गरज कमी झाली.

### ७. कृषी कर्ज सुधारण

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात कृषी कर्ज सुधारण हे वित्तीय समावेशनाच्या धोरणातील एक महत्त्वाचे पाऊल ठरले. भारतातील कृषी क्षेत्राला आर्थिकदृष्ट्या सशक्त बनवण्यासाठी विविध कर्ज

योजनांचा विस्तार केला गेला. या योजनांद्वारे शेतकऱ्यांना कमी व्याजदरावर कर्ज उपलब्ध करून दिले गेले. जे त्यांना शेतीसाठी आवश्यक साधनसामग्री, बियाणे आणि इतर संसाधने खरेदी करण्यात मदत करणारे ठरले. कृषी कर्ज सुधारणेसाठी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) आणि कृषी बँका यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. त्यांना शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी प्रोत्साहित केले गेले. तसेच शेतकऱ्यांना सुलभप्रक्रियेतून कर्ज मिळवता आले. शेतकऱ्यांना कर्ज मिळवण्यासाठी कागदपत्रांची जास्त आवश्यकता नव्हती.

**८. पोस्ट ऑफिस बचत बँकांचा समावेश**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात पोस्ट ऑफिस बचत बँकांचा समावेश औपचारिक वित्तीय प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणावर केला गेला. भारतातील दुर्गम आणि ग्रामीण भागांतील लोकांना बँकिंग सेवांची उपलब्धता वाढवण्यासाठी पोस्ट ऑफिस बचत बँकांनाही मुख्य बँकिंग प्रणालीचा एक भाग बनवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यामुळे देशभरातील लाखो लोकांना वित्तीय सेवांचा लाभ मिळवण्याची संधी मिळाली. पोस्ट ऑफिस बचत बँकांचे नेटवर्क भारतातील सर्वात मोठ्या वितरक नेटवर्कपैकी एक आहे. ज्यामुळे बँकिंग सेवा विशेषतः ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर पोहोचवता आल्या. पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून लोकांना बचत खात्यांमध्ये गुंतवणूक करण्याची, कर्ज घेण्याची आणि अन्य वित्तीय सेवांचा लाभ घेण्याची सुविधा मिळाली.

**९. वित्तीय साक्षरता आणि जनजागृती**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात वित्तीय साक्षरता आणि जनजागृतीवर विशेष भर देण्यात आला. कारण आर्थिक समावेशनाच्या यशस्वितेसाठी लोकांना बँकिंग आणि वित्तीय सेवांचे महत्त्व समजून घेणे अत्यंत आवश्यक होते. यामुळे देशभरात बँकिंग सेवांचा वापर वाढवण्यासाठी जागरुकता निर्माण करण्यासाठी अनेक उपाययोजना राबवण्यात आल्या. सरकारने विविध मोहिमा आणि कार्यक्रमांचे आयोजन केले. ज्यामध्ये शाळा, महाविद्यालये आणि ग्रामीण भागातील ग्रामसभांमध्ये वित्तीय साक्षरता प्रशिक्षण दिले गेले. यामुळे लोकांना बचत, कर्ज, विमा, गुंतवणूक आणि इतर वित्तीय उत्पादनांच्या महत्त्वाची माहिती मिळाली.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या या सर्व धोरणांमुळे भारतात वित्तीय समावेशनाची एक मजबूत पायाभूत रचना तयार झाली, ज्यामुळे आर्थिक न्याय सुनिश्चित होऊन समाजातील विविध गटांना आर्थिक विकासाचा मार्ग खुला झाला. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली, वित्तीय समावेशनाला प्राधान्य देणारी धोरणे राबवण्यात आली. १९९१ च्या आर्थिक उदारीकरणाच्या पृष्ठभूमीवर, गरीब आणि उपेक्षित घटकांना औपचारिक वित्तीय सेवांशी जोडण्याचा विशेष प्रयत्न करण्यात आला. प्राथमिकता क्षेत्र कर्जधोरणाद्वारे कृषी, लघुउद्योग आणि दुर्गम भागांसाठी कर्ज वितरण अनिवार्य केले. मनमोहन सिंग यांच्या धोरणांनी उपेक्षित घटकांना औपचारिक अर्थव्यवस्थेशी जोडले, आर्थिक न्याय दिला आणि भारतातील वित्तीय समावेशनाला नवी दिशा दिली.

**डॉ. मनमोहन सिंग आणि भारतातील आर्थिक सुधारणा**

**१. महागाईविरोधी उपाय:**

डॉ. मनमोहन सिंग यांना चिंता होती की अतिमहागाईचा परिणाम नेहमीच संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो आणि त्याचे परिणाम गरिबांना भोगावे लागतात. म्हणूनच जेव्हा त्यांनी भारताचे अर्थमंत्री म्हणून पदभार स्वीकारला, तेव्हा महागाईचे व्यवस्थापन हे त्यांचे प्राथमिक प्राधान्य बनले. त्यांना चलनविषयक धोरणाच्या बारकाव्यांमध्ये तसेच राजकोषीय धोरणाशी असलेल्या संबंधांमध्ये चांगली माहिती होती. रिझर्व्ह बँकेतील त्यांच्या पूर्वीच्या कौशल्यामुळे त्यांना १९९१ आणि त्यानंतर महागाईविरोधी राजकोषीय धोरणे तयार करण्यात मदत झाली. १९७०च्या दशकाच्या सुरुवातीला, जेव्हा

महागाईचा दर सलग दोन वर्षे २०% पेक्षा जास्त होता, तेव्हा महागाई नियंत्रित करण्यासाठी उपाययोजनांचे पॅकेज विकसित करण्यात डॉ. मनमोहन सिंग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तथापि, १९८२ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर, किंमत स्थिरता आणि चलनविषयक धोरणाच्या अंमलबजावणीबद्दल डॉ. मनमोहन सिंग यांचे दृष्टिकोन स्पष्ट होऊ लागले. प्रो. सुखमोय चक्रवर्ती यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी चलनव्यवस्थेच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली. डॉ. मनमोहन सिंग यांनी असे निदर्शनास आणून दिले की, गरिबांना महागाईचा विशेषतः मोठा फटका बसतो. कारण त्यांच्याकडे महागाईचे प्रतिबंधक उपाय नाहीत. म्हणूनच ते महागाई नियंत्रण हा सर्वात प्रभावी गरिबीविरोधी उपाय मानतात. (२०११-१२ यूपीए सरकार 'लोकांना अहवाल'). अर्थमंत्री म्हणून त्यांनी हे स्पष्ट केले की, चलन धोरणाचे प्राथमिक ध्येय महागाई नियंत्रणात ठेवणे असावे. त्यांनी त्याला केंद्रीय बँकेचा धर्म म्हटले. त्यांचा असा विश्वास होता की, चलन धोरणाने किंमत स्थिरतेची योग्य पातळी सुनिश्चित करून विकासात सर्वात मोठे योगदान दिले पाहिजे.

**२. स्थूल आर्थिक स्थिरता**

डॉ. मनमोहन सिंग हे १९९१ आणि नंतरच्या काळात त्यांनी राबवलेल्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांसाठी आर्थिक प्रगतीच्या इतिहासात ओळखले जातील. कारण त्यांनी एका झटक्यात भारतीय अर्थव्यवस्थेला अत्यंत केंद्रीकृत अर्थव्यवस्थेतून बाजार अर्थव्यवस्थेत प्रभावीपणे बदलले. त्यांना खात्री होती की, जर स्थूल आर्थिक स्थिरता राखली गेली तरच ती यशस्वी होऊ शकते. स्थूल आर्थिक धोरणाचे प्राथमिक ध्येय म्हणजे स्थूल आर्थिक स्थिरता राखणे. त्यांनी असेही जोर दिला की, भारताच्या समष्टी आर्थिक धोरणाचे प्राथमिक कार्य म्हणजे सरकारची राजकोषीय तूट तसेच गैरवित्तीय सार्वजनिक क्षेत्राची (NFPS) तूट कमी करणे, अशा प्रकारे की सुधारणा कार्यक्रमाला प्रभावीपणे पाठिंबा मिळेल. राजकोषीय तूट पैसे छापून किंवा स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही स्रोतांकडून पैसे उधार घेऊन वसूल केली जाऊ शकते. जर व्याजदर जीडीपी वाढीच्या दरापेक्षा जास्त असेल, तर राजकोषीय तूट वित्तपुरवठा करणे टिकाऊ नसते. या परिस्थितीत महागाई कराव्यतिरिक्त कोणतीही प्राथमिक तूट कर्जाच्या सापळ्यात अडकते.

**३. करसुधारणा**

डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ मध्ये त्यांच्या पहिल्या अर्थसंकल्पीय भाषणात असा युक्तिवाद केला की, 'जीडीपीच्या टक्केवारी आणि एकूण करप्राप्तीच्या टक्केवारी म्हणून प्रत्यक्ष करांमधून मिळणारे उत्पन्न कालांतराने सातत्याने कमी होत आहे'. आपली अर्थसंकल्पीय व्यवस्था पुन्हा संतुलित करण्यासाठी आणि समता पुनर्संचयित करण्यासाठी ही प्रवृत्ती उलटली पाहिजे. ज्यांच्याकडे आर्थिक साधन आहे त्यांनी विकासासाठी योगदान दिले पाहिजे. या कारणास्तव प्रत्यक्ष करांना प्राधान्य दिले पाहिजे. यासाठी योग्य वेळी दर वाढवणे आणि कर अनुपालन सुधारणे आवश्यक आहे. त्याचवेळी, प्रणाली तर्कसंगत केली जात आहे, जी कराचा कमाल सीमांत दर कमी करते, प्रक्रिया सुलभ करते, सवलतींची संख्या कमी करते आणि उत्पन्नाच्या विविध स्तरांवर सरासरी उत्पन्न कर दर अधिक योग्य पातळीवर आणते, हे आवश्यक आहे. या दिशेने डॉ. मनमोहन सिंग यांनी उत्पादकता वाढवण्यासाठी, समाजाला अधिक समतावादी बनवण्यासाठी आणि विकास अधिक समावेशक करण्यासाठी विस्तृत श्रेणीतील कर सुधारणा सादर केल्या.

**४. स्पष्ट अनुदाने**

डॉ. मनमोहन सिंग यांनी असा युक्तिवाद केला की, अनुदाने योग्य लक्ष्य गटांना वितरित केली पाहिजेत.

जास्त अनुदाने देशाच्या आर्थिक हितासाठी हानिकारक होती. १९९१ मध्ये सुधारणा कार्यक्रम सुरू झाला तेव्हा रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले आणि त्याच वेळी निर्यात अनुदाने रद्द करण्यात आली. १९९५-९६ मध्ये जीडीपीच्या ०.५ आणि ०.६% वाटा असलेले अन्न आणि खत अनुदाने उर्वरित स्पष्ट अनुदानांपैकी सर्वात जास्त आहेत. (आय.जे. अहलुवालिया, २०११). अन्न अनुदानाचे तर्क गरिबी निर्मूलन आहे, तरीही ते कमी लक्ष्यित अनुदानांसाठी प्रसिद्ध आहेत, त्यापैकी बहुतेक गरीब नसलेल्या लोकांकडे जातात. हे देखील सर्वज्ञात आहे की, अनुदानाचा एक महत्त्वपूर्ण भाग अप्रभावी आणि भ्रष्ट फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एफसीआय) साठी पैसे देण्यासाठी वापरला जातो. फूड स्टॅम्पची सुरुवात हा एक नाट्यमय उपाय असेल. यामुळे एफसीआयला लक्षणीयरीत्या कमी करता येईल, ज्यामुळे सार्वजनिक वितरण आणि सरकारी स्टोअरची गरज दूर होईल.

### ५. शेअर बाजार सुधारणा

१९९० च्या दशकातील एक उल्लेखनीय कामगिरी, जी थेट सिंग यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमाशी संबंधित आहे, ती म्हणजे शेअर बाजारांचा जलद विस्तार आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर त्यांचा वाढता प्रभाव. जरी भारतात बराच काळ शेअर बाजार असला तरी, स्वातंत्र्यानंतर आणि १९८० पर्यंत त्याची वाढ कमी होत गेली आणि प्रवाहित होत गेली, परंतु ती सामान्यतः माफक होती. १९८० मध्ये भारतीय शेअर बाजारांचे एकूण बाजार मूल्य जीडीपीच्या टक्केवारीत अंदाजे ५% होते. १९८० च्या दशकात लागू केलेल्या उदारीकरण उपायांनंतर, १९९० पर्यंत हे प्रमाण १३% पर्यंत वाढले. डॉ. मनमोहन सिंग यांच्या उदारीकरणाच्या वेगवान गतीमुळे शेअर बाजारातील वाढ प्रचंड झाली आहे. १९९३ च्या अखेरीस एकूण बाजार भांडवलीकरण जीडीपीच्या ६०% पेक्षा जास्त झाले (आर्थिक सर्वेक्षण, अर्थमंत्रालय, भारत सरकार). १९८० ते १९९३ दरम्यान म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांची संख्या २ वरून ४० दशलक्ष झाली, जी अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे (५१ दशलक्ष). भारतीय शेअर बाजार सध्या सूचीबद्ध व्यवसायांच्या बाबतीत जगातील सर्वात मोठा आहे, जो अमेरिकेलाही मागे टाकतो.

### ६. बाह्यक्षेत्र आणि व्यापार सुधारणा

शुल्काच्या क्षेत्रात व्यापार सुधारणांच्याबाबतीत डॉ. मनमोहन सिंग यांची सर्वात मोठी कामगिरी. १९९०-९१ मध्ये सरासरी शुल्क १२५% होते, तर १९९३-९४ मध्ये ही टक्केवारी ७१ टक्क्यांपर्यंत घसरली. शुल्क रद्द करणे आणि इतर अडथळे रद्द केल्याने निर्यातीत लक्षणीय वाढ झाली. सुधारणांपूर्वी, सर्व आयात एकतर परवाना आवश्यकतांच्या अधीन होती किंवा पूर्णपणे प्रतिबंधित होती. फक्त काही सरकारी संस्था धान्य, पेट्रोल, खनिज धातू, धातू आणि खते यांसह मोठ्या प्रमाणात उत्पादने आयात करू शकत होत्या. सिंग यांनी परिमाणात्मक मर्यादा शुल्काने बदलल्या आणि हळूहळू संरक्षणात्मक शुल्क पातळी कमी केली.

### ७. व्यापार आणि गुंतवणूक सुधारणा

चलन दरात बदल होऊन ही प्रक्रिया सुरू झाली. जुलै १९९१ मध्ये, रुपयाचे २२%ने अवमूल्यन झाले. एक्झिम स्क्रिप योजनेने निर्यातदारांना त्यांच्या निर्यात महसुलाच्या ३०% इतके मुक्तपणे व्यापार करण्यायोग्य आयात अधिकार देऊन एक प्रकारचा दुहेरी विनिमय दर निर्माण केला. फेब्रुवारी १९९२ मध्ये उदारीकृत विनिमय दर व्यवस्थापन प्रणाली (LERMS) लागू करण्यात आली, ज्यामुळे रुपयाची आंशिक परिवर्तनीयता निर्माण झाली, ज्यामुळे परकीय चलन नफ्यातील ६०% बाजार दराने हस्तांतरित करणे शक्य झाले. मार्च १९९३ मध्ये बहुतेक चालू खात्याच्या व्यवहारांसाठी रुपया परिवर्तनीय घोषित करण्यात आला. ऑगस्ट १९९४

मध्ये या यादीत अदृश्य वस्तू जोडण्यात आल्या, ज्यामुळे रुपयाची चालू खात्याची परिवर्तनीयता १००% झाली. करसुधारणा समिती (TRC) च्या सुरुवातीच्या अहवालानुसार, आयातभारित सरासरी दर पातळी १९८९-९० मध्ये ८७ टक्क्यांवरून १९९५-९६ मध्ये ४५% आणि १९९८-९९ मध्ये २५% पर्यंत कमी करावी. विविध प्रमाणात, हे प्रस्ताव एक्झिम धोरण १९९२-९७ अंतर्गत अंमलात आणण्यात आले.

**८.एलपीजी मॉडेल**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक सुधारणांच्या कल्पना एलपीजी मॉडेलमध्ये समाविष्ट होत्या. एलपीजी हे उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाचे संक्षिप्त रूप आहे. डॉ. मनमोहन सिंग यांचे खाजगीकरणाचे स्वप्न सरकार आणि सार्वजनिक क्षेत्राच्या खर्चावर सर्व संसाधनांचे संपूर्ण खाजगीकरण सूचित करत नाही. एलपीजी विकास मॉडेल खाजगी क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित करते. ते आपल्या विकासाला गती देण्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय थेट गुंतवणुकीची कल्पना करते. पूर्वी वापरल्या जाणाऱ्या आयात प्रतिस्थापन दृष्टिकोनाऐवजी निर्यात-नेतृत्वाखालील विकास धोरण अवलंबण्याचा त्यांचा हेतू आहे. ते भारताच्या सामाजिक क्षेत्राच्या विकासावरमूलभूत ध्येय म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेला 'जागतिकीकरण' क्षेत्रात आणणे आणि त्याला एक नवीन बाजार-केंद्रित जोर देणे.

**तक्ता क्र. १ : २००४ ते २०१४ पर्यंतच्या आर्थिक कामगिरीचे प्रतिबिंबित**

| वर्ष | GDP (%) | प्रतिभांडवल($) | बेरोजगारीचा दर (%) | महागाई दर (%) |
|---|---|---|---|---|
| २००४ | ७.५९ | ५०३२५ | ५.६७ | ३.२ |
| २००५ | ९.०४ | ५३४७८ | ५.६ | ४ |
| २००६ | ९.५३ | ५६९६४ | ५.४५ | ६.८ |
| २००७ | १० | ६०४६६ | ५.३२ | ५ |
| २००८ | ६.०९ | ६१४६८ | ५.२८ | १२.४ |
| २००९ | ५.८८ | ६५३९४ | ५.५७ | १२ |
| २०१० | १०.०९ | ६९९९४ | ५.६४ | ५.४ |
| २०११ | ७.९ | ७१६०९ | ५.६४ | ४ |
| २०१२ | ४.९ | ७४५९९ | ५.६५ | ५.२ |
| २०१३ | ५.९ | ७८३४८ | ५.६७ | ३.९ |
| २०१४ | ६.४ | ८३०९४ | ५.६१ | २ |

स्रोत : Ministry of Statistics and Programme Implementation (MoSPI) in India.

**डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक कामगिरीचे प्रतिबिंबित**

तक्ता क्र. १. मधील माहिती २००४ ते २०१४ पर्यंतच्या आर्थिक कामगिरीचे प्रतिबिंबित करते. ज्यामध्ये GDP, दरडोई GDP, बेरोजगारी दर आणि महागाई दर ट्रेंड दिसून येतात. २००४ ते २००७ पर्यंत, अर्थव्यवस्था स्थिरपणे वाढत आहे. GDP ७.५९ वरून १० पर्यंत वाढला आहे आणि GDP दरडोई ५०,३२५ वरून ६०,४६६ पर्यंत वाढला आहे. बेरोजगारी ५%च्या आसपास स्थिर आहे, तर महागाई ३.२% आणि ६.८% दरम्यान चढ-उतार होते. तथापि, २००८ मध्ये, जागतिक

आर्थिक संकटामुळे दरडोई GDP मध्ये ६१,४६८ पर्यंत वाढ होऊनही, GDP मध्ये झपाट्याने घट होऊन ६.०९ पर्यंत पोहोचला आहे. बेरोजगारी किंचित वाढते आणि चलनवाढ १२.४% वर पोहोचते. २००९ मध्ये, अर्थव्यवस्था ५.८८ पर्यंत किंचित GDP मध्ये घट आणि १२% च्या उच्च चलनवाढ दरासह संघर्ष करत आहे. २०१० पासून, पुनर्प्राप्ती सुरू होते आणि २०१० मध्ये जीडीपी वाढ १०.०९ पर्यंत पोहोचते. जरी महागाई लक्षणीयरीत्या कमी झाली आणि २०१४ पर्यंत ती २% पर्यंत खाली आली. बेरोजगारी तुलनेने स्थिर राहाते, सुमारे ५.६% चढ-उतार होते. २०१४ पर्यंत, दरडोई जीडीपी ८३,०९४ पर्यंत वाढतो आणि चलनवाढ स्थिर होते, ज्यामुळे अधिक अनुकूल आर्थिक वातावरण दिसून येते. मंद पुनर्प्राप्ती असूनही, अर्थव्यवस्था लवचिकता दर्शवते. कालावधीच्या अखेरीस सकारात्मक वाढ होते.

**सूचना**

डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या जीवनात आणि पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाच्या सूचना दिल्या, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील सुधारणा आणि विकास घडले. त्यांची काही प्रमुख सूचना पुढीलप्रमाणे:

१. **आर्थिक उदारीकरण**

१९९१ मध्ये, डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत उदारीकरणाची प्रक्रिया सुरू केली. त्यांनी परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले, व्यापारावर असलेल्या बंदी कमी केल्या, आणि उद्योग क्षेत्रातील सरकारी नियंत्रण कमी केले. यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक स्पर्धेसाठी तयार झाली.

२. **खाजगीकरण आणि सार्वजनिक क्षेत्रातील सुधारणा**

त्यांची एक महत्त्वाची सूचना खाजगीकरणाला चालना देण्याची होती. त्यांनी सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण सुरू केले आणि त्याचा उद्देश सार्वजनिक क्षेत्रातील अनुत्पादक तत्त्वांना कमी करणे आणि अधिक कार्यक्षम व स्पर्धात्मक बनवणे होता.

३. **समावेशक विकास**

डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाजातील सर्व घटकांचा समावेश सुनिश्चित करण्याचा आग्रह धरला. त्यांच्या धोरणांमध्ये ग्रामीण भागासाठी रोजगार निर्माण करणे, गरिबांसाठी विविध योजना सुरू करणे आणि सामाजिक सुरक्षा व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे यांचा समावेश होता. उदाहरणार्थ, त्यांनी 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' (मनरेगा) सुरू केली.

४. **शासनातील पारदर्शिता आणि जबाबदारी**

डॉ. मनमोहन सिंग यांची एक महत्त्वाची सूचना म्हणजे शासनाच्या कामकाजात पारदर्शिता आणणे आणि प्रत्येक सरकारी निर्णयासाठी जबाबदारी ठरवणे. यामुळे भ्रष्टाचार कमी होण्याची शक्यता वाढली.

५. **शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात सुधारणा**

त्यांनी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील सुधारणा प्रोत्साहित केल्या. विविध योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून गरीब आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी उच्च गुणवत्ता असलेल्या आरोग्य सेवा आणि शिक्षण सुविधा उपलब्ध करणे, हे त्यांचे उद्दिष्ट होते.

डॉ. मनमोहन सिंग यांनी दिलेल्या या सूचना भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आणि सामाजिक समावेशासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या. त्यांचा दृष्टिकोन आजही भारताच्या अर्थव्यवस्थेच्या धोरणांमध्ये दिसून येतो.

**सारांश**

डॉ. मनमोहन सिंग यांचे नेतृत्व भारतीय

अर्थव्यवस्थेच्या स्थिरतेसाठी महत्त्वपूर्ण ठरले. त्यांचे धोरण समाजाच्या प्रत्येक घटकाला समाविष्ट करणारे होते आणि त्यांच्या दूरदर्शी निर्णयांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेने दीर्घकालीन वाढ साधली. त्यांचे कार्य आजही भारतीय आर्थिक धोरणांवर प्रभाव टाकते आणि त्यांचा वारसा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात दिसून येतो. मनमोहन सिंग यांच्या धोरणांचा प्रभाव आजही भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसून येतो. त्यांच्या नेतृत्वाने भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक स्पर्धेची तयारी केली, समावेशी विकास साधला आणि देशातील सामाजिक व आर्थिक असमतोल कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली. त्यांच्या दूरदर्शी धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक सुदृढ आणि स्थिर बनली आणि आजही त्यांच्या नेतृत्वाच्या कार्यांचा परिणाम आपल्या देशाच्या आर्थिक यशावर ठळकपणे दिसतो.

**संदर्भ**


१. कापसे, M. (२०२१), मनमोहन सिंग आणि भारतातील आर्थिक समावेशक धोरण, आर्थिक सुधारणा मासिक, ८(४), २२-३४.

२. कुमार, S. (२०२१), भारतीय अर्थव्यवस्थेची संतुलित वाढः मनमोहन सिंग यांचे नेतृत्व, राष्ट्रीय अर्थशास्त्र जर्नल, १५(४), ८९-१०४.

३. देशमुख, R. (२०१९). मनमोहन सिंग यांचे आर्थिक समावेशक धोरणे आणि त्यांचा प्रभाव, आर्थिक सुधारणा मासिक, १०(२), ५६-६८.

४. पाटील, R. (२०१५), भारतीय अर्थव्यवस्थेतील सुधारणा आणि विकास (२रा आवृत्ती), मुंबईः प्रकाशन गृह.

५. शर्मा, A. (२०१९), भारताची आर्थिक सुधारणाः १९९१ पासूनचा प्रवास, दिल्लीः आय.जे. प्रकाशन.

६. शिंदे, S. (२०१७), मनमोहन सिंग यांच्या आर्थिक धोरणांचे परिणाम, आर्थिक विकास आणि सामाजिक समावेश, १२ (३), ४५-६७.

७. Rangarajan, C. (Chairman), (2008), Report of the Committee on Financial Inclusion (Vol. 1), Reserve Bank of India.


◆

---

कष्ट ही अशी प्रेरक शक्ती आहे, जी माणसाची क्षमता तपासते आणि त्याला विकासाच्या मार्गावर नेते.

**- अनामिक**

---

आपल्या पैशाचा वापर आपल्या लाभाला आणि नशिबाला प्रभावित करतो, अर्थशास्त्रामध्ये पैसा, श्रम संपत्ती प्रभावित करतो.

**- तोबा विटा**

# किमान आधारभूत किमती व शेतमजुरांच्या मजुरी दरातील वाढीचा तुलनात्मक अभ्यास

**रेवप्पा सिद्धप्पा कोळी** †
**युवराज रेवणसिद्ध सोलापूरे** ††

**प्रस्तावना**

भारत कृषी उत्पादनामध्ये अग्रेसर राष्ट्र असून तांदूळ, गहू आणि कापूस पिकांच्या उत्पादनामध्ये भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. सन २०२३-२४ मध्ये भारतात ३२८.८ दशलक्ष टन कृषिमालाचे उत्पादन झाले असून, देशाच्या एकूण निर्यातीत कृषी उत्पादनाचा ७ टक्क्यांपेक्षा जास्त वाटा आहे. स्थूल देशांतर्गत उत्पन्नामध्ये कृषिक्षेत्राचा वाटा १८.२% आहे. तसेच देशातील एकूण लोकसंख्येपैकी ४२.३% लोकसंख्या कृषिक्षेत्रावर अवलंबून आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेतमालाच्या किमतीवर शेतमालाचे उत्पादन, शेतकऱ्यांचे उत्पन्न, औद्योगिक उत्पादन, सामान्य वर्गाचे राहणीमान अवलंबून असते. शेतमालाच्या किमती वाजवीपेक्षा जास्त असल्यास सामान्य वर्गाच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होणार नाहीत किंवा त्यांच्या राहणीमानाचा दर्जा खालावेल. याउलट किमती वाजवीपेक्षा कमी असतील तर शेतकऱ्यांचा नफा कमी होऊन उत्पादनवाढीची प्रेरणा राहाणार नाही, याचा परिणाम म्हणून शेतमालाच्या उत्पादनात घट होईल. या सर्व घटकांमुळे शेतमालाच्या किमती वाजवी असाव्यात, मर्यादेपेक्षा जास्त नसाव्यात किंवा मर्यादेपेक्षा कमीही नसाव्यात.

भारतीय शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व, कृषी व्यवसायाचे हंगामी स्वरूप, मागणी आणि पुरवठ्यातील असंतुलन, कृषी आदानांच्या किमतीतील चढउतार तसेच कृषी बाजारपेठांच्या स्वरूपामुळे कृषिमालाच्या किंमतीमध्ये अनिश्चितता आढळते. औद्योगिक क्षेत्राच्या तुलनेने शेतमालाच्या किमतीत जास्त चढउतार होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची शाश्वती नसते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील अनिश्चितता दूर करण्यासाठी शेतमालाच्या किमतीचे स्थिरीकरण करणे अत्यावश्यक ठरते. सन १९४५ मध्ये नेमलेल्या दुष्काळ चौकशी समितीने असे मत मांडले की, 'शेतमालाच्या किमतीत स्थिरता असल्यास अनेक सुधारणा शक्य होतात. अन्यथा, शेतमालाच्या किमतीतील चढ-उतारांमुळे संपूर्ण

† संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र), सामाजिक शास्त्रे संकुल, पु. अ. हो. सो. विद्यापीठ, सोलापूर
आजीव सभासद क्र. २०३७, भ्रमणध्वनी : ८४३२१३६५६५, ई-मेल : rkoli2105@gmail.com
†† संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र), सामाजिक शास्त्रे संकुल, पु. अ. हो. सो. विद्यापीठ, सोलापूर,
आजीव सभासद क्र. २०२८, भ्रमणध्वनी : ८८८८७२६६३७, ई-मेल : solapureyuvraj01@gmail.com

अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण होते.' सन १९६४ मध्ये श्री.एल.के.झा यांच्या अध्यक्षतेखाली अन्नधान्यांच्या किमतींचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार सन १९६५ मध्ये 'कृषिमूल्य आयोगाची' स्थापना करण्यात आली. मार्च, १९८५ मध्ये या आयोगाच्या कार्याची व्याप्ती वाढवून त्याचे नामकरण 'कृषी खर्च व मूल्य आयोग' असे करण्यात आले.

भारतातील उत्पादित शेतमालांच्या किमतीबाबत सरकारला सल्ला देण्याचे कार्य कृषी खर्च व मूल्य आयोग करते. हंगामाच्या काळात कृषिमालाच्या पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे शेतमालाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात घट होते. शेतमालाच्या किमतीत होणाऱ्या घटीला थांबविण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी कृषी खर्च व मूल्य आयोग उत्पादन खर्चाचा आधार घेऊन सरकारला किमान आधारभूत किमतीची शिफारस करते. केंद्र सरकार या शिफारशींचा विचार करून पिकांच्या लागवडीअगोदर किमान आधारभूत किंमत जाहीर करते. जेव्हा बाजारात शेतमालाच्या किमती आधारभूत किमतीपेक्षा कमी होतात, तेव्हा किमान आधारभूत किमतीने सरकार नाफेडमार्फत कृषी मालाची खरेदी करते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. किमान आधारभूत किंमत निश्चितीच्या पद्धतींचा अभ्यास करणे.

२. किमान आधारभूत किमतींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. किमान आधारभूत किमती आणि शेतमजुरांच्या वेतनातील वाढीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. किमान आधारभूत किमतीसाठी कृषी खर्च व मूल्य आयोगाने प्रकाशित केलेल्या सन २००५-०६ ते २०२४-२५ पर्यंतच्या वार्षिक अहवालाचा आधार घेतला आहे. तसेच कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग, संचालनालयाने शेतमजुरांच्या वेतनासाठी प्रकाशित केलेल्या सन २००५-०६ ते २०२२-२३ पर्यंतच्या वार्षिक अहवालाचा आधार घेतला आहे. संकलित केलेल्या दुय्यम आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी वृद्धिदर, टक्केवारी, सरासरी इत्यादी सांख्यिकीय साधनांचा उपयोग केला आहे.

**किमान आधारभूत किंमत निश्चितीच्या पद्धती :**

पीक पेरणीपूर्व मशागतीपासून ते कृषिमालाची विक्री होईपर्यंत झालेल्या उत्पादन खर्चाचा विचार करून कृषी खर्च व मूल्य आयोग त्या पिकाची किमान आधारभूत किंमत निश्चित करते. किमान आधारभूत किंमत निश्चितीच्या एकूण तीन पद्धती आहेत.

१. $A_2$ : या पद्धतीत कृषी उत्पादनांकरिता शेतकऱ्यांकडून विविध आदानांसाठी केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष / मौद्रिक खर्चाचा समावेश केला जातो. उदा. बी-बियाणे, मजुरी, इंधन, कीटकनाशके, खते, औषधे, वेतन इत्यादीवर झालेला खर्च.

२. $A_2$ + FL : या पद्धतीत $A_2$ + कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या श्रमाचा प्रचलित वेतनदरानुसार समावेश केला जातो.

३. $C_2$ : या पद्धतीत $A_2$ + FL + शेतीमध्ये गुंतवणूक केलेल्या भांडवलावरील व्याज अधिक शेतकऱ्यांनी शेतजमिनीसाठी दिलेला खंड किंवा स्वतःच्या शेतजमिनीला मिळणाऱ्या खंडाचा समावेश केला जातो.

कृषी खर्च व मूल्य आयोग $A_2$ + FL आणि $C_2$ या दोन्ही पद्धतीने उत्पादन खर्चाचा समावेश करून केंद्र शासनास कृषी उत्पादनांच्या किमान आधारभूत किमतीची शिफारस करते, केंद्र शासनाच्या 'आर्थिक कामकाजविषयक कॅबिनेट समिती' (CCEA) या शिफारशींचा अभ्यास करून किमान आधारभूत किमती

जाहीर करते.

**किमान आधारभूत किमतींचा तुलनात्मक अभ्यास:**

सध्या केंद्र शासन एकूण २५ पिकांसाठी किमान आधारभूत किमती जाहीर करते, त्यापैकी महाराष्ट्रात जास्त उत्पादन घेतल्या जाणाऱ्या तांदूळ, गहू, ज्वारी, कापूस, तूर, हरभरा आणि भुईमूग या सात (०७) पिकांची संशोधनासाठी निवड केली आहे. निवड केलेल्या पिकांच्या आधारभूत किमतीतील प्रगती तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेली आहे.

तक्ता क्र.१ वरून असे दिसून येते की, सन २००५-०६ मध्ये ज्वारी आणि तांदूळ या पिकांची किमान आधारभूत किंमत अनुक्रमे ५२५ व ६०० रु. प्रतिक्विंटल इतकी होती. यामध्ये सन २०२४-२५ पर्यंत सातत्याने वाढ होऊन अनुक्रमे ३,४२१ व २,३२० रु. प्रतिक्विंटल इतकी झाली. सन २००५-०६ हे आधारभूत वर्ष धरल्यास सन २०२४-२५ पर्यंत ज्वारी आणि तांदूळ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत अनुक्रमे ५५१.६२ व २८६.६७ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

सन २००५-०६ मध्ये गहू व हरभरा या पिकांची किमान आधारभूत किंमत अनुक्रमे ६५० व १,४३५ रु. प्रतिक्विंटल इतकी होती. यामध्ये सन २०२३-२४ पर्यंत सातत्याने वाढ होऊन अनुक्रमे २,२७५ व ५,४४० रु. प्रतिक्विंटल इतकी झाली. सन २००५-०६ हे आधारभूत वर्ष धरल्यास सन २०२३-२४ पर्यंत गहू व हरभरा पिकांच्या किमान आधारभूत किमतीत अनुक्रमे २५०.०० व २७९.०९ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

सन २००५-०६ मध्ये तूर, कापूस आणि भुईमूग या पिकांची किमान आधारभूत किंमत अनुक्रमे १,४०० रु., १,७६० रु. व १,५२० रु.प्रतिक्विंटल इतकी होती. यामध्ये सन २०२४-२५ पर्यंत सातत्याने वाढ होऊन अनुक्रमे ७,५५० रु., ७,१२१ रु. व ६,७८३ रु.प्रतिक्विंटल इतकी झाली. सन २००५-०६ हे आधारभूत वर्ष धरल्यास सन २०२४-२५ पर्यंत तूर, कापूस आणि भुईमूग पिकांच्या किमान आधारभूत किमतीत अनुक्रमे ४३९.२९, ३०४.६० व ३४६.२५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

नमुना निवड केलेल्या पिकांच्या किमान आधारभूत किमतीची तुलना करता ज्वारीच्या किमतीत सर्वात जास्त वाढ ५५१.६२ टक्क्यांनी तर गव्हाच्या किमतीत सर्वात कमी २५० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

एकंदरीत सर्वच पिकांच्या किमान आधारभूत किमतीत सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येत असले, तरी प्रत्येक पिकाच्या किमान आधारभूत किमतीतील वाढीच्या प्रमाणात भिन्नता आढळते.

**शेतमजुरांच्या मजुरी दरातील वाढीचे तुलनात्मक अभ्यास :**

भारतीय कृषिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो. भारतातील कृषी उत्पादनात शेतमजुरांना अतिशय महत्त्व आहे. शेतातील पेरणी, नांगरणी, कापणी, कीटकनाशके फवारणे, तण काढणे इत्यादी कामांसाठी पुरुष व स्त्री कामगारांची आवश्यकता असते. शेतीच्या एकूण खर्चामध्ये किमान ४०% खर्च हा शेतमजुरांच्या वेतनावर होत असतो. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या  राज्यातील पुरुष व स्त्री शेतमजुरांच्या मजुरीदराची भारतातील सरासरी मजुरी दराशी तुलनात्मक वर्गीकरण करून विश्लेषण केले आहे. पुरुष व स्त्री शेतमजुरांचे प्रतिदिन मजुरी दरातील प्रगतीची माहिती तक्ता क्र. २ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. २, आलेख क्र. १ आणि २ वरून असे दिसून येते की, सन २००५-०६ मध्ये कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि भारतातील पुरुष शेतमजुरांची सरासरी प्रतिदिन मजुरी अनुक्रमे ६७.८९ रु., ६१.७० रु. आणि ८३.५६ रुपये इतकी होती, यामध्ये सन २०२२-२३ पर्यंत अनुक्रमे ५९९.८१, ७३०.२६ आणि ३७२.१४

## तक्ता क्र. १ : किमान आधारभूत किंमत

(रु. प्रतिक्विंटल)

| सन / पीक | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ | २०२०-२१ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | ६०० | १०३० | १४५० | १८८८ | २०६० | २२०३ | २३२० |
| वृद्धिदर | | ७१.६७ | १४१.६७ | २१४.६७ | २४३.३३ | २६७.१७ | २८६.६७ |
| ज्वारी | ५२५ | ९०० | १५९० | २६४० | २९९० | ३२२५ | ३४२१ |
| वृद्धिदर | | ७१.४३ | २०२.८६ | ४०२.८६ | ४६९.५२ | ५१४.२९ | ५५१.६२ |
| गहू | ६५० | ११२० | १५२५ | १९७५ | २१२५ | २२७५ | उ. ना. |
| वृद्धिदर | | ७२.३१ | १३४.६२ | २०३.८५ | २२६.९२ | २५०.०० | -- |
| हरभरा | १४३५ | २१०० | ३५०० | ५१०० | ५३३५ | ५४४० | उ. ना. |
| वृद्धिदर | | ४६.३४ | १४३.९० | २५५.४० | २७१.७८ | २७९.०९ | -- |
| तूर | १४०० | ३००० | ४६२५ | ६००० | ६६०० | ७००० | ७५५० |
| वृद्धिदर | | ११४.२९ | २३०.३६ | ३२८.५७ | ३७१.४३ | ४००.०० | ४३९.२९ |
| कापूस | १७६० | २५०० | ३८०० | ५५१५ | ६०८० | ६६२० | ७१२१ |
| वृद्धिदर | | ४२.०५ | ११५.९१ | २१३.३५ | २४५.४५ | २७६.१४ | ३०४.६० |
| भुईमूग | १५२० | २३०० | ४०३० | ५२७५ | ५८५० | ६३७७ | ६७८३ |
| वृद्धिदर | | ५१.३२ | १६५.१३ | २४७.०४ | २८४.८७ | ३१९.५४ | ३४६.२५ |

संदर्भ: कृषी खर्च व मूल्य आयोगाने सन २००५-०६ ते २०२४-२५ पर्यंत प्रकाशित केलेले वार्षिक अहवाल

टीप: सन २००५-०६ हे आधारभूत वर्ष गृहीत धरून वृद्धिदर काढले आहे. उ. ना. उपलब्ध नाही.

टक्क्यांनी वाढ होऊन अनुक्रमे ४७५.१० रु., ५१२.२७ रु. आणि ३९४.५२ रुपये इतकी झाली. सन २००५-०६ मध्ये महाराष्ट्रातील पुरुष शेतमजुरांची सरासरी प्रतिदिन मजुरी ५१.१९ रुपये इतकी होती. यामध्ये सन २०२१-२२ पर्यंत अनुक्रमे ६७९.१६ टक्क्यांनी वाढ होऊन ३९८.८५ रुपये इतकी झाली.

सन २००५-०६ मध्ये भारताच्या (सरासरी) पुरुष शेतमजुरांची सरासरी मजुरीचे दर तिन्ही राज्यांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. सन २००५-०६ ते २०२२-२३ पर्यंत भारताच्या (सरासरी) पुरुष शेतमजुरांच्या मजुरीदरात ३७२.१४ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते, तर महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या तिन्ही राज्याच्या पुरुष शेतमजुरांच्या मजुरीदरात अनुक्रमे ६७९.१६, ५९९.८१ आणि ७३०.२६ टक्क्यांनी वाढ झाल्यामुळे सन २०२२-२३ मध्ये तिन्ही राज्यातील पुरुष शेतमजुरांची मजुरीदर भारताच्या (सरासरी) पुरुषांच्या मजुरीदरापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

सन २००५-०६ मध्ये कर्नाटक आणि आंध्रप्रदेशातील स्त्री शेतमजुरांची सरासरी प्रतिदिन मजुरी अनुक्रमे ६०.१५ रु. आणि ४४.१२ रुपये इतकी होती. यामध्ये सन २०२२-२३ पर्यंत अनुक्रमे ३९६.८७ आणि ७२०.६० टक्क्यांनी वाढ होऊन अनुक्रमे २९८.८७ रु. आणि ३६२.०५ रुपये इतकी झाली. सन २००५-०६ मध्ये महाराष्ट्रातील स्त्री शेतमजुरांची सरासरी प्रतिदिन

### तक्ता क्र. २ : शेतमजुरांची प्रतिदिन मजुरी

(रक्कम रुपयांत)

| तपशील (सन) | | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | पुरुष | ५१.१९ | १००.०० | ११३.०० | ३१४.७८ | ३९८.८५ | उ.ना. |
| | वृद्धिदर | | ९५.३५ | १२०.७५ | ५१४.९२ | ६७९.१६ | -- |
| | स्त्री | ४०.४२ | ८०.०० | ८०.०० | २३१.३३ | २५८.७० | उ.ना. |
| | वृद्धिदर | | ९७.९२ | ९७.९२ | ४७२.३२ | ५४०.०३ | -- |
| कर्नाटक | पुरुष | ६७.८९ | १३०.३५ | २७२.०० | ३५६.६७ | ३७३.७४ | ४७५.१० |
| | वृद्धिदर | | ९२.०० | ३००.६५ | ४२५.३६ | ४५०.५१ | ५९९.८१ |
| | स्त्री | ६०.१५ | १२५.३४ | २४५.०० | २५५.६६ | २७०.१७ | २९८.८७ |
| | वृद्धिदर | | १०८.३८ | ३०७.३२ | ३२५.०४ | ३४९.१६ | ३९६.८७ |
| आंध्रप्रदेश | पुरुष | ६१.७० | १६२.०१ | २९५.०० | ४४१.१८ | ४७९.३१ | ५१२.२७ |
| | वृद्धिदर | | १६२.५८ | ३७८.१२ | ६१५.०४ | ६७६.८४ | ७३०.२६ |
| | स्त्री | ४४.१२ | १२३.७२ | २००.०० | ३११.६७ | ३४५.४६ | ३६२.०५ |
| | वृद्धिदर | | १८०.४२ | ३५३.३१ | ६०६.४१ | ६८३.०० | ७२०.६० |
| भारत (सरासरी) | पुरुष | ८३.५६ | १४७.९१ | २८१.०० | ३४१.८७ | ३६३.४६ | ३९४.५२ |
| | वृद्धिदर | | ७७.०१ | २३६.२९ | ३०९.१३ | ३३४.९७ | ३७२.१४ |
| | स्त्री | ७९.१९ | ११५.०२ | २१८.०० | २८२.४१ | ३०३.२९ | ३२८.५१ |
| | वृद्धिदर | | ४५.२५ | १७५.२९ | २५६.६२ | २८२.९९ | ३१४.८४ |


स्रोत : Annual report on Agricultural wages in India, 2005-06 to 2022-23

मजुरी ४०.४२ रुपये इतकी होती. यामध्ये सन २०२१-२२ पर्यंत अनुक्रमे ५४०.०३ टक्क्यांनी वाढ होऊन २५८.७० रुपये इतकी झाली.


सन २००५-०६ मध्ये भारताच्या स्त्री शेतमजुरांची सरासरी मजुरीचे दर ७९.१९ रुपये इतके होते, हे मजुरीचे दर तिन्ही राज्यांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. सन २००५-०६ ते २०२२-२३ पर्यंत भारताच्या स्त्री शेतमजुरांच्या सरासरी मजुरीदरात ३१४.८४ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते, तर महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या तिन्ही राज्यांच्या स्त्री मजुरीदरात अनुक्रमे ५४०.०३, ३९६.८७ आणि ७२०.६० टक्क्यांनी वाढ झाल्यामुळे सन २०२२-२३ मध्ये तिन्ही राज्यांतील स्त्री शेतमजुरांची मजुरीचे दर भारताच्या (सरासरी) स्त्रियांच्या मजुरीदरापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

एकंदरीत निवड केलेल्या राज्यातील तसेच भारतातील पुरुष व स्त्री शेतमजुरांच्या मजुरीदरात सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येत असले, तरी स्त्री शेतमजुरांपेक्षा पुरुष शेतमजुरांच्या मजुरी दरातील वाढ अधिक प्रमाणात झाल्याचे दिसून येते. भारताच्या पुरुष व स्त्री (सरासरी) मजुरीदरापेक्षा महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्याच्या मजुरी दरातील वाढ मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते, त्यामुळे भारतातील स्त्री

आलेख क्र. १ : पुरुष शेतमजुरांची प्रतिदिन मजुरी(रक्कम रुपयांत)




आलेख क्र. २ : स्त्री शेतमजुरांची प्रतिदिन मजुरी (रक्कम रुपयांत)



व पुरुष शेतमजुरांचे सरासरी मजुरीदर तिन्ही राज्यांपेक्षा कमी असल्यामुळे या राज्यातील शेतकऱ्यांचे किमान आधारभूत किमतीतील गृहीत मजुरी खर्चापेक्षा जास्त मजुरी खर्च होत असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. सन २००६ मध्ये डॉ.एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय शेतकरी आयोगाने सादर केलेल्या अहवालात $S_2$ खर्चाच्या दीडपट दराने किमान आधारभूत किमती निश्चित कराव्यात अशी शिफारस केली होती; परंतु केंद्र शासन $A_2$ किंवा $A_2$ + FL खर्चाच्या दीडपट दराने किमान आधारभूत किमती निश्चित केल्याचे दिसून येते.

२. सर्वच पिकांच्या किमान आधारभूत किमतीत सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येत असले, तरी प्रत्येक पिकाच्या किमान आधारभूत किमतीतील वाढीच्या प्रमाणात भिन्नता आढळते.

३. सन २००५-०६ ते २०२२-२३ पर्यंत भारताच्या पुरुष व स्त्री शेतमजुरांच्या सरासरी मजुरीदरापेक्षा महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्यातील मजुरी दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सन २०२२-२३ मध्ये भारताच्या पुरुष व स्त्री शेतमजुरांचे सरासरी मजुरीदर तिन्ही राज्यांपेक्षा कमी असल्यामुळे या राज्यातील शेतकऱ्यांचे किमान आधारभूत किमतीतील गृहीत मजुरी खर्चापेक्षा जास्त मजुरी खर्च होत असल्याचे दिसून येते.

४. सन २००५-०६ ते २०२२-२३ पर्यंत महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्यातील तसेच भारतातील पुरुष व स्त्री शेतमजुरांच्या मजुरीदरात सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येत असले, तरी स्त्री शेतमजुरांपेक्षा पुरुष शेतमजुरांच्या मजुरीदरात अधिक प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

५. प्रत्येक गाव, जिल्हा आणि राज्यांनुसार तसेच हंगामानुसार स्त्री व पुरुष शेतमजुरीच्या दरात भिन्नता आढळते; परंतु कृषी खर्च व मूल्य आयोगाने देशातील सरासरी वेतनमूल्यानुसार वेतन खर्चाची निश्चिती केल्याचे दिसून येते.

**शिफारशी :**

१. डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या शिफारशी स्वीकारून $C_2$ खर्चाच्या दीडपट दराने किमान आधारभूत किमती निश्चित कराव्यात.

२. कृषी उत्पादन खर्चात श्रमिक वेतनावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असतो, यासाठी साध्या किंमत निर्देशांकाचा वापर करून उत्पादन खर्चाची निश्चिती न करता भारांकित किंमत निर्देशांकांचा वापर करावा.

३. प्रत्येक राज्यातील करांचे दर, वेतन दर तसेच इतर कृषी आदानांच्या किरकोळ किमती विचारात घेऊन किमान आधारभूत किमती निश्चित कराव्यात.

४. सध्या २५ पिकांसाठी किमान आधारभूत किमती घोषित केल्या जातात. यामध्ये वाढ करून फळबाग पिकांचा समावेश करावा. ज्यामुळे पर्यावरण संतुलन, जैव विविधता, मातीची सुपीकता, भूजल पातळीत वाढ आणि जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

५. डेव्हिड रिकार्डोच्या सिद्धांतानुसार, चांगल्याप्रतिच्या जमिनीत कनिष्ठप्रतिच्या जमिनीपेक्षा जास्त उत्पादन प्राप्त होते. यामुळे चांगल्याप्रतिच्या जमिनीस भेदजन्य खंड प्राप्त होतो. ही असमानता कमी करण्यासाठी कनिष्ठप्रतिच्या जमिनीतील कृषी उत्पादनाला अतिरिक्त / वाढीव किमान आधारभूत किमती द्याव्यात.

**समारोप :**

सर्वप्रथम सन १९६६-६७ मध्ये गहू पिकासाठी प्रतिक्विंटल ५४ रुपयांप्रमाणे किमान आधारभूत किंमत

घोषित करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील अनिश्चितता कमी करण्यासाठी, पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी, कृषी मालाची मागणी व पुरवठ्यात संतुलन साधण्यासाठी, शेतमालाच्या किमतीत होणाऱ्या चढउतारापासून संरक्षण करण्यासाठी तसेच उपभोक्त्यांचे हित संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकार किमान आधारभूत किमतीचे धोरण राबवत असते. किमान आधारभूत किंमत धोरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनेक अनुकूल परिणाम होत असले, तरी या योजनेची अंमलबजावणी करण्यात काही अडचणी आहेत. किमान आधारभूत किमतीचे धोरण मर्यादित पिकांसाठी लागू, आधारभूत किमतीची घोषणा करण्यास होणारा विलंब, श्रमिकांच्या वेतनातील भिन्नता, राज्यनिहाय करपातळीत विविधता, वाहतूक खर्चाचा समावेश नसणे, उत्पादन खर्चातील भिन्नता यांसारख्या अनेक अडचणीसुद्धा आहेत. शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, दीर्घकालीन अन्नसुरक्षा, शेतकऱ्यांचे कल्याण, जैवविविधतेचे संरक्षण, प्रादेशिक समानता निर्माण करण्यासाठी किमान आधारभूत किंमत धोरणामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. या सुधारणा केल्यास कृषिक्षेत्राची पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती होईल.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१. Datt Gaurav and Mahajan, Indian Economy, S. Chand and co. Ltd, Delhi, (2016).

२. Mukesh Kumar, Sharma and Keshav Kumar, Minimum Support Price for Agricultural Commodities in India: A Review, The Pharma Innovation Journal,(2021), SP - 10(8): Page no. 12-16.

३. Puri V. K., Misra and Garg, Indian Economy, Himalaya Publishing house, Mumbai, (2023).

४. Reddy Vijaychandra, A study on comparative estimation of crops cost of cultivation over minimum support price - A review on methodological approach, Multilogic in Science Journal, vol. IX, issue XXXII, (January 2020), Page no. 432-436.

५. कविमंडन विजय, कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, (२०१२).

६. कोळंबे रंजन, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे, (जानेवारी २०२०).

७. पुरोहित वसुधा, कृषी अर्थशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, (२०१६).

८. डॉ. नीता वाणी, कृषी अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, (२०१५).


## संकेत स्थळे :


९. Economic survey of India, 2023-24
https://www.ibef.org/economy economic - survey-2023-24page no. 16-18.

१०. Annual report on Agricultural wages in India, 2005-06 to 2022-23.
https://desagri.gov.in/wp-content/uploads/2024/09/Final-Publication-2022-23.pdf
https://desagri.gov.in/document-report-category/agriculture-wages-in-india

११. Commission for Agricultural Costs & Prices (CACP) Annual Report on Minium Support Price (2005-06 to 2024-25).
https://cacp.da.gov.in
ViewContents.aspx?Input=1&PageId=36&KeyId=0


◆

# विकसनशील देशांच्या कृषिक्षेत्रावर होणारा हवामान बदलाचा आर्थिक प्रभाव आणि अनुकूलन धोरणे

**रोहन रविराज बावडेकर** †
**नम्रता नरेश पाटील** ††

**प्रस्तावना**

हवामान बदल हा सध्या जगभरातील सर्वात महत्त्वाचा पर्यावरणीय व आर्थिक विषय आहे. विकसनशील देश, जे मोठ्या प्रमाणावर कृषिक्षेत्रावर अवलंबून आहेत, त्यांना या बदलाचा फार मोठा फटका बसतो. या देशांमध्ये शेती हा रोजगाराचा व अन्नसुरक्षेचा मुख्य आधार आहे. तापमानवाढ, अनियमित पर्जन्यमान, आणि नैसर्गिक आपत्तींच्या वाढत्या प्रमाणामुळे या देशांच्या कृषी उत्पादनावर आणि अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत. अझरबैजानची राजधानी बाकू येथे झालेल्या कॉन्फरन्स ऑफ पार्टिज (COP 29) मध्ये विकसित देशांच्या ऐतिहासिक उत्सर्जनामुळे विकसनशील देशांना हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी १ ट्रिलियन डॉलर्सची आर्थिक मदत करण्याबाबत सहमती साधता आली नाही. परंतु हा मुद्दा नफा-केंद्रित व्यावसायिक गटांकडून किंवा विविध विकसित देशांच्या वाढ केंद्रित आणि लोकप्रियतावादी सरकारांकडून गांभीर्याने स्वीकारला जाणार नाही. हा केवळ आर्थिक प्रश्न नाही, तर अनेक देशांमध्ये हवामान बदलामुळे विविध क्षेत्रांवर परिणाम होत आहे. वारंवार होणारी चक्रीवादळे, दुष्काळ, महापूर आणि उष्णतेच्या लाटांमुळे केवळ आर्थिक क्षेत्रांवरच परिणाम होत नाही, तर मानवी आरोग्याच्या दृष्टीनेही हानी पोहोचत आहे. अरबी क्षेत्र हे विकसनशील देशांचा एक समूह आहे, जो आधीच हवामान बदलाच्या विपरीत परिणामांचा सामना करत आहे. हवामान बदलामुळे अनेक विकसनशील देशांमध्ये कृषी उत्पादनक्षमतेवर विनाशकारी परिणाम होतो. कृषिक्षेत्र हे सर्व क्षेत्रांचे आधारस्थान आहे.

परंतु कृषिक्षेत्राचा ऱ्हास केवळ अन्नसुरक्षेवर परिणाम करणार नाही, तर तो विकसनशील देशांच्या एकूण आर्थिक विकासाच्या शक्यतांवरही नकारात्मक परिणाम करेल. मग प्रश्न उभा राहातो, कृषीच का? हवामान बदल हा विकसनशील देशांमधील कृषिक्षेत्रासाठी मोठा धोका आहे. कारण त्यांची मोठी लोकसंख्या शेतीसारख्या हवामानावर अवलंबून असलेल्या उपजीविकेच्या

† संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, नेहरू सामाजिक विज्ञान विभाग पुणे.
आजीव सभासद क्रमांक- २०७८, भ्रमणध्वनी- ८४५४०९०६२८, ई-मेल- bavadekarrohan1@gmail.com.
†† संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र), बाबुरावजी घोलप कॉलेज, सांगवी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
आजीव सभासद क्रमांक- २०८१, भ्रमणध्वनी- ८२०८८६४४४७, ई-मेल- namyp30@gmail.com

कार्यावर अवलंबून आहे. हवामान बदलाचे परिणाम - पर्जन्यमानाच्या स्वरूपातील बदल, तापमानातील चढउतार, आणि तीव्र हवामानाच्या घटनांचा वाढलेला प्रसार - सूचित करतात की अल्पकालीन पीक अपयश होण्याची शक्यता आहे आणि दीर्घकालीन कृषी उत्पादनक्षमता कमी होईल. यापैकी अनेक परिणाम विषम आहेत, म्हणजेच ते नवीन परिस्थितींशी जुळवून घेण्याच्या क्षमतेत विकसनशील देशांवर विकसित देशांपेक्षा जास्त परिणाम करतात. भारतात सेवाक्षेत्राचे जीडीपी मध्ये मोठे योगदान असले, तरीही अजून ५०% हून अधिक लोकसंख्या कृषिक्षेत्राशी संबंधित आहे, ज्यामुळे त्यांच्या उपजीविकेवर थेट परिणाम होतो.

एकंदरीत, COP २९ मध्ये आर्थिक मदतीवर केलेल्या निर्णयांचा अभाव आणि हवामान बदलाच्या बहुआयामी परिणामांमुळे त्वरित जागतिक कृतीची आवश्यकता स्पष्ट झाली आहे. विकसनशील देशांमधील कृषिक्षेत्र हे विशेषत: असुरक्षित आहे, आणि यासाठी केवळ आर्थिक सहाय्यच नव्हे, तर तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि क्षमता निर्माण करण्यातही लक्ष देणे आवश्यक आहे. जेणेकरून या प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेची शाश्वतता आणि लोकांचा विकास सुनिश्चित होईल.

**हवामान घटकांची परिवर्तनशीलता आणि त्याचे परिणाम**

कृषीवर परिणाम करणारे सर्वात महत्त्वाचे हवामान घटक म्हणजे तापमानातील बदल, पर्जन्याचे प्रमाण तसेच तीव्र घटनांची वारंवारता आणि तीव्रता. हे हवामान घटक कधीही स्थिर राहात नाहीत. कारण हे प्रामुख्याने हवामानावर अवलंबून असतात आणि मानवी नियंत्रणाबाहेर असतात. त्याची परिवर्तनशीलता आणि अनिश्चितता नेहमी अंदाजे बदलाच्या काही घटकांच्या अंतर्गत स्वीकारली जाते. परंतु हे सर्व कृषी समुदायासाठी अधिक अनपेक्षित आणि धोकादायक बनले आहे. IPCC च्या सहाव्या मूल्यांकन अहवाल २०२१ नुसार, जागतिक तापमान पुढील दशकात १.५ अंश सेल्सियसच्या पातळीवर पोहोचण्याची शक्यता आहे. ज्यामुळे इतर घटकांवर अधिक गुणात्मक परिणाम होतील. हा अहवाल असा देखील सांगतो की, यामुळे उष्ण दिवसांची संख्या वाढेल; जलचक्रावर परिणाम होऊन त्याचे तीव्र पर्जन्यमानात रूपांतर होईल. हे बदल पीक उत्पादन, पीक गुणवत्ता, प्राण्यांचे आरोग्य आणि उत्पादकता, तसेच कृषी प्रणालींच्या एकूण टिकाऊपणावर परिणाम करू शकतात. उदाहरणार्थ, तापमानातील वाढीमुळे पिकांच्या वाढीच्या कालावधीमध्ये घट येते, पर्जन्याचे स्वरूप बदलल्यामुळे सिंचनासाठी पाण्याच्या उपलब्धतेमध्ये व्यत्यय येऊ शकतो आणि दुष्काळ, महापूर, उष्णतेच्या लाटांसारख्या अत्याधुनिक हवामान घटनांमुळे पीक आणि जनावरे नष्ट होऊ शकतात.

हवामान बदलाचा कृषीवरील परिणाम केवळ पीक उत्पादनापुरता मर्यादित नाही, तर तो शेतकऱ्यांच्या आणि ग्रामीण समुदायांच्या उपजीविकेवरही परिणाम करतो. हवामानिक घटकांवर झालेल्या परिणामांची स्पष्टता अनेक संशोधक आणि अभ्यासांद्वारे सिद्ध झाली आहे. तसेच IPCC अहवालांमध्येही यावर जोर दिला आहे. परंतु कृषी उत्पादनक्षमतेवरील आणि त्याच्या आर्थिक मूल्यावरील परिणाम विविध देशांमध्ये वेगळे असू शकतात. भौगोलिक स्थिती, किनारपट्टीपासून पठार क्षेत्रापर्यंतचा अंतर हे हवामान घटकांतील बदलाच्या प्रभावावर मोठा फरक पाडतात. प्रश्न फक्त हा आहे की, हवामान घटकांच्या बदलामुळे कृषी उत्पादनक्षमता वाढत असली तरी, त्याची दीर्घकालीन टिकाव क्षमता हे कृषी शास्त्रज्ञांसाठी एक मोठे आव्हान आहे. त्यामुळे, आपण विविध विकसनशील देशांमधील कृषी उत्पादकतेवर हवामान बदलाचे विविध परिणाम आणि ते कोणत्या अनुकूलन धोरणांवर काम करत आहेत, याचा अभ्यास करणार आहोत. काही विकसनशील देशांचे आणि त्यांच्या कृषीवरील प्रभावांचे अध्ययन करण्यापूर्वी, भारत

सरकारच्या २०१८च्या आर्थिक सर्वेक्षणात विशेषतः चेतावणी दिली होती की, हवामान बदलामुळे भारताला ९ ते १० बिलियन डॉलर्सचा तोटा होईल.

**हवामान बदलामुळे विकसनशील देशांच्या कृषिक्षेत्रावर होणारे आर्थिक परिणाम**

विकसनशील देशांचे कृषिक्षेत्रदेखील हवामान बदलासाठी अत्यंत संवेदनशील मानले जाते. कमी उत्पादकता आणि पीक अपयशामुळे मुख्य पिकांसाठी उत्पादनात ३०% पर्यंत घट होण्याची शक्यता आहे. आफ्रिकेतील अर्ध-शुष्क प्रदेश, उदाहरणार्थ, अन्नाचा तुटवडा आणि पावसावर आधारित शेती करणाऱ्या कृषीदार गरिबांचे जीवनमान कमी होण्याचा सामना करत आहेत. हवामान बदलाचा कृषीवर होणारा परिणाम अन्नसुरक्षेची भेद्यता वाढवत असला, तरी तो विकसनशील देशांच्या ग्रामीण लोकसंख्येमध्ये स्थलांतर आणि मृत्युदर वाढवू शकतो. हवामान बदल हा विकसनशील देशांमधील कृषी उत्पादन क्षमतेसाठी सर्वात मोठ्या धोक्यांपैकी एक आहे, ज्याचा विनाशकारी आर्थिक परिणाम होतो. वार्षिक पर्जन्यमानातील अस्थिरता, सरासरी तापमान, उष्णतेच्या लाटा, तण, कीटक किंवा जिवाणूंचे बदल, वातावरणातील CO2 किंवा ओझोन पातळीत जागतिक बदल आणि समुद्रसपाटीच्या पातळीत होणारे चढउतार यामुळे जमिनीवर आणि तिच्या शेतीवर विविध प्रकारे परिणाम होतो. विकसनशील देश औद्योगिक देशांच्या तुलनेत हवामान बदलात खूप कमी योगदान देतात. परंतु त्याचे परिणाम सर्वाधिक भोगतात. प्रतिव्यक्ती विचार केला असता, संयुक्त राज्य अमेरिका चीनपेक्षा सातपट अधिक आणि आफ्रिकेपेक्षा सोळा पट अधिक हरितगृह वायू उत्सर्जन करते. त्यांचे किमान योगदान असूनही ही राष्ट्रे हवामान बदलाच्या परिणामांमुळे असुरक्षित आहेत.

आपल्या शेजारील देश श्रीलंकेचा विचार केला तर, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या संशोधकांनी हवामानातील बदलांचा शेती उत्पादनावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी एक सर्वेक्षण केले आहे, ज्यामध्ये भातशेतीवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशांमध्ये बहुतेक शेतकऱ्यांकडे २ हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे, ही एक मोठी समानता आहे. या अभ्यासामध्ये असे दिसून आले की, दुष्काळ, पूर आणि वाढते तापमान अशा हवामानातील तीव्र बदलांमुळे पिकांचे नुकसान होत आहे. कमी शिक्षण व जागरूकता असलेल्या शेतकऱ्यांना अनुकूलनाची रणनीती म्हणून बदलत्या पीक पद्धती स्वीकारण्यासाठी तयार करणे अवघड आहे. याचा परिणाम केवळ उत्पादनावरच नाही, तर या शेतकऱ्यांच्या उत्पन्नावरही होईल आणि अन्नसुरक्षेच्या समस्याही निर्माण होऊ शकतात.

उदाहरण ब्राझील हे एक उभरत्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आहे, जिथे संशोधनाने असे स्पष्ट केले आहे की, हवामान बदलामुळे तांदूळ उत्पादनावर परिणाम होत आहे. ही तांदळाबाबतची एक सामान्य निरीक्षणे आहेत; परंतु शेती ब्राझीलच्या GDP मध्ये सुमारे २३% योगदान देते आणि देशाच्या निर्यातीमध्ये मोठा वाटा आहे. ब्राझीलमधील बहुसंख्य लोकसंख्या शेती व पशुपालन क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे कुरण शेती ब्राझीलच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. लापोला इ. (Lapola et al.) यांनी 'स्पॅटियल असेसमेंट मॉडेल' (Spatial Assessment Model) च्या माध्यमातून भाकीत केले आहे की, कुरण शेतीची उत्पादकता कमी होईल आणि त्यामुळे पशुपालन व शेतीमध्ये बदल होईल. असद इ. (Assad et al., 2016a) यांनी ब्राझीलमधील प्रमुख कृषिमालासाठी भविष्यातील हवामान जोखीमाचा पद्धतशीर अभ्यास केला. त्यांच्या संशोधनानुसार, दक्षिण ब्राझीलमध्ये सोयाबीन उत्पादनासाठी योग्य क्षेत्रामध्ये ६५.७% घट

होईल, ज्यामुळे मुख्य उत्पादन क्षेत्रे ॲमेझॉनच्या दक्षिणपूर्व भागात हलवली जातील. मका उत्पादनासाठी योग्य क्षेत्रावर हवामान बदलाचा अधिक तीव्र परिणाम होईल, ज्यामुळे २०५० पर्यंत दुसऱ्या हंगामातील मका उत्पादनात ८४.९% घट होईल. हवामान बदलांचे परिणाम, जसे की तापमान वाढ, दुष्काळ, पूर, यामुळे पीक उत्पादन घटेल आणि कीड व रोगांचा धोका वाढेल, ज्यामुळे अन्न उत्पादन आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

दोन्ही देशांमध्ये भारतासोबत क्षेत्रीय साम्य आहे, त्यामुळे जागतिक स्तरावर एकत्र उपाय शोधणे उपयुक्त ठरू शकते. परंतु विकसनशील देशांच्या परिस्थितीला अधिक स्पष्ट करण्यासाठी, हवामान बदलाच्या परिणामांवर आधारित आणखी दोन अर्थव्यवस्थांचा विचार करूया. उदाहरणार्थ, चीन आणि पाकिस्तानसारख्या देशांना उच्च आर्थिक महत्त्व आहे. परंतु शेतीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्यामुळे, ते देखील हवामान बदलामुळे शेती उत्पादकता आणि अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या ताणाचा सामना करत आहेत. हवामानातील अडथळ्यांमुळे शेती उत्पादनात होणारी घट जीडीपी कमी करू शकते आणि या देशांमध्ये अन्नसुरक्षेच्या संकटाला देखील कारणीभूत ठरू शकते.

पाकिस्तानसारखे विकसनशील देश हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांसाठी अत्यंत संवेदनशील असतात. सामान्यतः विकसनशील देशांमध्ये आढळणारी संपत्तीची कमतरता आणि संसाधनांची टंचाई त्यांना विकसित देशांपेक्षा जास्त धोका निर्माण करते. कारण विकसित देशांकडे जास्त अनुकूलनक्षमता असते. उदाहरणार्थ, पाकिस्तानात १९९८ ते २०१७ दरम्यान, सुमारे ८०% जिल्ह्यांना हवामान बदलाचा फटका बसला, ज्यामुळे अर्थव्यवस्थेला १७.१ अब्ज डॉलरचा तोटा झाला. या परिणामांमध्ये गहू आणि तांदळाच्या उत्पादनात घट झाली आहे, ज्यामुळे २०५० पर्यंत १९.५ अब्ज डॉलरचा तोटा होऊ शकतो. हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तींच्या वारंवारतेत आणि तीव्रतेत वाढ झाल्यामुळे, पाकिस्तानने विविध अनिश्चित आर्थिक चढ-उतारांचा सामना केला आहे.

चीनमध्येसुद्धा तीच परिस्थिती आहे. जिथे तांदूळ, गहू आणि मका यांसारख्या प्रमुख धान्य पिकांवर तापमानवाढ आणि वाढत्या तीव्र दुष्काळ व पुरामुळे परिणाम होणार आहे. पिकांच्या उत्पादनक्षमतेवर होणाऱ्या या परिणामांमुळे मोठा आर्थिक तोटा होऊ शकतो. चीनमधील कृषिक्षेत्र देशाच्या जीडीपी मध्ये १५% योगदान देते आणि एकूण कार्यबलापैकी २६% लोकांना रोजगार देते, त्यामुळे हवामान बदलाचे परिणाम व्यापक पातळीवर आणि कौटुंबिक स्तरावर जाणवतील. म्हणूनच, श्रमप्रधान देश असल्यामुळे कृषिक्षेत्रातील नुकसानीचा परिणाम औद्योगिक क्षेत्रावर होईल. तसेच, बेरोजगारी वाढल्यामुळे कामगार शेतीकडे स्थलांतरित होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे छुपी बेरोजगारी (disguised unemployment) वाढू शकते.

जर आपण या चार देशांकडे पाहिले, तर विशेषतः त्यापैकी तीन देश भारताचे शेजारी आणि प्रमुख व्यापार भागीदार आहेत. थेट आर्थिक परिणामांव्यतिरिक्त, हवामान बदलामुळे अन्नसुरक्षेचा अभाव आणि उपासमारीसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात, ज्यामुळे या विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये कुपोषण आणि आरोग्यविषयक समस्या उद्‌भवू शकतात. विकसनशील देशांच्या कृषिक्षेत्रावर हवामान बदलामुळे होणाऱ्या आर्थिक परिणामांना सामोरे जाण्यासाठी, धोरणकर्ते आणि संशोधकांनी अनुकूलन धोरणांच्या महत्त्वावर भर दिला आहे. या धोरणांमध्ये पेरणीच्या वेळापत्रकात बदल करणे, सिंचनासाठी पूरक उपाययोजना करणे, संरक्षणात्मक शेती पद्धती अंमलात आणणे आणि पिके व बियाणे साठवणुकीसाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे यांचा समावेश होऊ शकतो. याशिवाय,

कमी आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांमधील लहान शेतकऱ्यांनी हवामान-प्रतिरोधक पिकांच्या जाती स्वीकारल्यास कृषी उत्पादनावर होणाऱ्या हवामान बदलाच्या परिणामांवर मात करण्यास मदत होऊ शकते. कृषिक्षेत्रात माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाचा समावेश हवामान बदलाच्या अनुकूलनासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकते. हवामानाचा नमुना, पिकांचे व्यवस्थापन आणि बाजारातील परिस्थिती याबाबत शेतकऱ्यांना वेळेवर व अचूक माहिती पुरवून, हे तंत्रज्ञान लहान शेतकऱ्यांना सुजाण निर्णय घेण्यास मदत करू शकते, ज्यामुळे त्यांची हवामान बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढू शकते. शेवटी, विकसनशील देशांच्या कृषिक्षेत्रावर हवामान बदलामुळे होणाऱ्या आर्थिक परिणामांना सामोरे जाण्यासाठी सर्वसमावेशक आणि लक्ष्यित अनुकूलन धोरणांची गरज लक्षात येते.

**तक्ता क्र. १ : हवामान बदलाचा शेतीवरील परीणाम**

| देश | उत्पन्न घट (%) | पाणी ताण (%) | आर्थिक नुकसान अब्ज डॉलर्स | प्रमुख पिकांवरील प्रभाव | नैसर्गिक आपत्ती (पूर, दुष्काळ इ.) | उपाययोजना |
|---|---|---|---|---|---|---|
| भारत | १५ | ३० | ५० | गहू, तांदूळ, डाळी, कापूस | पूर, दुष्काळ | जलसंपत्ती व्यवस्थापन, दुष्काळ प्रतिरोधक पिके, सौर ऊर्जा वापर |
| चीन | १० | २५ | ४० | गहू , मका, सोयाबीन | वाळवंटीकरण, पूर | हरित तंत्रज्ञान, जलसंवर्धन, जैवविविधता संरक्षण |
| पाकिस्तान | २० | ३५ | ४५ | गहू, कापूस | पूर, दुष्काळ | डॅम बांधकाम, पूर प्रतिबंधक उपाय, पीक विमा योजना |
| श्रीलंका | १८ | २८ | ४२ | तांदूळ, चहा, नारळ | चक्रीवादळ, अनियमित पाऊस | शाश्वत शेती पद्धती, पाणी व्यवस्थापन, हवामान अनुकूल पीक उत्पादन |

Source: IPCC (Intergovernmental Panel on Climate Change) AR6 Report

IPCC च्या अहवालानुसार हवामान बदलाचा शेतीवरील परिणाम अधिक सखोलपणे अभ्यासण्यासाठी खालील तक्त्यात काही घटक जोडले आहेत. जसे की, पीक उत्पादन घट, पाण्याचा ताण नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव आणि उपाययोजना इत्यादी.

**आव्हाने आणि संधी**

विकसनशील देशांमधील कृषिक्षेत्र हवामान बदलाच्या प्रतिकूल परिणामांना संवेदनशील असल्यामुळे आर्थिक आणि सामाजिक परिणाम उद्‌भवू शकतात. पिकांचे अपयश, पाण्याची टंचाई आणि हवामानाशी

संबंधित इतर परिणाम अन्नसुरक्षेस धोका निर्माण करू शकतात. गरिबी वाढवू शकतात आणि ग्रामीण लोकसंख्येमध्ये स्थलांतर आणि मृत्युदर वाढविण्यात योगदान देऊ शकतात. या आव्हानांना तोंड देण्यासाठी, धोरणकर्ते आणि संशोधकांनी कमी आणि मध्यम उत्पन्न गट देशांतील लहान शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी मदत करणाऱ्या अनुकूलन धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या महत्त्वावर भर दिला आहे. या धोरणांमध्ये हवामान-प्रतिरोधक पिकांच्या जाती स्वीकारणे, सिंचन व संरक्षण शेतीच्या तंत्रज्ञानाचा अवलंब आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी माहिती व संवाद तंत्रज्ञानाचा उपयोग करणे यांचा समावेश होतो. मात्र या अनुकूलन धोरणांची कार्यक्षमता अनेकदा स्थानिक संस्था, सामाजिक-आर्थिक परिस्थिती, तसेच लहान शेतकऱ्यांसाठी संसाधने व सहकार्याची उपलब्धता यामुळे मर्यादित असते. स्थानिक संस्थांची क्षमता मजबूत करणे, विस्तार सेवा उपलब्ध करून देणे, तसेच धोरणकर्ते, संशोधक आणि शेतकरी यांसह विविध भागधारकांमध्ये सहकार्याला प्रोत्साहन देणे, या अडचणींवर मात करण्यात मदत करू शकते. हवामान बदल अनुकूलन धोरणांमध्ये गुंतवणूक करून, विकसनशील देश त्यांच्या कृषिक्षेत्रांवरील हवामान बदलाच्या आर्थिक परिणामांमध्ये केवळ कपात करू शकतात असे नाही, तर त्यांच्या शेतकरी समुदायांची उत्पादकतासुद्धा वाढवू शकतात. यामुळे अन्नसुरक्षा सुधारण्यास आणि शाश्वत विकास साधण्यास महत्त्वपूर्ण योगदान मिळू शकते.

## धोरणे आणि संस्थात्मक संवर्धनाची भूमिका

राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर, हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी कृषिक्षेत्रात प्रभावी उपाययोजना राबवणे गरजेचे आहे. त्यासाठी धोरण आणि संस्थात्मक पाठबळ अत्यंत महत्त्वाचे आहे. धोरणनिर्माते सिंचन सुविधा विकासाला प्रोत्साहन देऊन, कृषी संशोधन आणि तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करून आणि स्थानिक शेतकरी समुदायांच्या प्रतिकारक्षमता वाढवण्यासाठी व्यापार धोरणांमध्ये सुधारणा करू शकतात. याशिवाय, आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे जागतिक हवामान धोरणांची स्थापना करणे, आपत्ती मदत आणि अन्नसुरक्षा पुरवणे, तसेच विकसित आणि विकसनशील देशांदरम्यान ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे आदानप्रदान सुलभ करणे हे हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी योगदान देऊ शकते. स्थानिक परिस्थिती आणि लहान शेतकरी उत्पादकांच्या गरजांनुसार यशस्वी जुळवणूक करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी धोरणनिर्माते, विस्तार अधिकारी, स्वयंसेवी संस्था, संशोधक आणि शेतकरी यांसारख्या अनेक भागधारकांचा सहभाग अत्यावश्यक आहे. स्थानिक संस्थांची क्षमता वाढवून आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी सहकार्यात्मक दृष्टिकोनांना प्रोत्साहन देऊन, विकसनशील देश त्यांच्या कृषिक्षेत्रांची प्रतिकारक्षमता वाढवू शकतात आणि हवामान बदलाच्या आर्थिक परिणामांना कमी करू शकतात.

## निष्कर्ष

विकसनशील देशांच्या कृषिक्षेत्रावर होणारा हवामान बदलाचा आर्थिक परिणाम हे एक तातडीचे जागतिक आव्हान आहे, ज्यासाठी सर्वसमावेशक आणि समन्वयित प्रतिसादाची आवश्यकता आहे. जरी या देशांमधील कृषिक्षेत्र हवामान बदलाच्या प्रतिकूल परिणामांना अत्यंत संवेदनशील असले तरी, लक्ष्यित अनुकूलन धोरणांची अंमलबजावणी केल्याने आर्थिक आणि सामाजिक परिणामांना कमी होण्यास मदत होऊ शकते. धोरणकर्ते, संशोधक आणि इतर भागधारकांनी एकत्र काम करून हवामान-प्रतिरोधक पिकांच्या जातींचा स्वीकार, कमी पाण्यात किंवा दुष्काळप्रवण भागात टिकू शकतील अशी सुधारित बियाणे विकसित करणे, सिंचन व संरक्षण शेतीच्या तंत्रज्ञानाचा अवलंब, शेतकऱ्यांना हवामान बदलाचा प्रभाव, आधुनिक तंत्रज्ञान

व पर्यावरणपूरक शेती पद्धती याबद्दल प्रशिक्षण देणे. हवामानातील अस्थिरतेमुळे होणारे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी प्रभावी पीक विमा योजना सुरू करणे. शेवटी या अनुकूलन धोरणांची यशस्वी अंमलबजावणी संसाधनांची उपलब्धता, स्थानिक संस्थांची क्षमता व विविध भागधारकांचे सहकारी प्रयत्न यावर अवलंबून असेल. धोरणकर्ते, संशोधक, विस्तार अधिकारी, NGO आणि शेतकरी यांसारख्या विविध भागधारकांद्वारे सहकार्य करून, विकसनशील देश त्यांच्या कृषिक्षेत्रांची उत्पादकता वाढवू शकतात आणि बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत शाश्वत आर्थिक विकासाला प्रोत्साहन देऊ शकतात.

**शिफारसी आणि भविष्यातील दिशानिर्देश**

या लेखात सादर केलेल्या विश्लेषणावर आधारित, विकसनशील देशांमधील कृषिक्षेत्राच्या हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेण्यास मदत करण्यासाठी काही मुख्य शिफारशी केल्या जाऊ शकतात:

१. पर्जन्य प्रमाण आणि पाण्याच्या टंचाईशी जुळवून घेण्यासाठी व कृषी उत्पादनाची उत्पादकता सुधारण्यासाठी सिंचन पायाभूत सुविधांच्या आणि जलसंपदा संरक्षण तंत्रज्ञानाच्या विकासात गुंतवणूक करणे.

२. हवामान-प्रतिरोधक पिकांच्या जातींच्या विकास आणि प्रसारास प्रोत्साहन देणे आणि शाश्वत कृषी पद्धतींचा, जसे की संरक्षण शेती, ज्यामुळे लहान शेतकऱ्यांची उत्पादकता आणि अनुकूलन क्षमता वाढू शकेल.

३. स्थानिक संस्थांची आणि विस्तार सेवांची क्षमता मजबूत करणे. जेणेकरून हवामान बदलाची माहिती प्रभावीपणे शेतकऱ्यापर्यंत पोहचवता येईल आणि शेतकऱ्यांना अनुकूलन धोरणांच्या स्वीकारासाठी आवश्यक पाठिंबा पुरवता येईल.

या सूचना अंमलात आणल्यास, विकसनशील देश एक अधिक सहनशील आणि शाश्वत कृषिक्षेत्र निर्माण करण्यासाठी कार्य करू शकतात, जे हवामान बदलामुळे उद्‌भवलेल्या आव्हानांचा सामना करून लोकसंख्येच्या एकूण आर्थिक आणि अन्नसुरक्षेस योगदान देऊ शकतात.

**भविष्यकालीन संशोधन दिशा**

विकसनशील देशांमधील कृषिक्षेत्रावर हवामान बदलाचा आर्थिक परिणाम आणि अनुकूलन धोरणांची कार्यक्षमता अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, पुढील संशोधनासाठी खालील शिफारस करता येतील:

१. स्थानिक किंवा प्रादेशिक पातळीवर यशस्वी अनुकूलन उपक्रमांचा सखोल अभ्यास. दुष्काळ-प्रतिरोधक पिके, सिंचन प्रणाली आणि संरक्षण शेती यांसारख्या विविध अनुकूलन धोरणांची तुलनात्मक विश्लेषणे, त्यांची सापेक्ष कार्यक्षमता आणि खर्च-कार्यक्षमतेचा अभ्यास, ज्यामुळे धोरणकर्त्यांना गुंतवणुकीला प्राधान्य देण्यास मार्गदर्शन होईल.

२. अनुकूलन धोरणांच्या व्यापक स्वीकारासाठी आवश्यक असलेल्या संस्थात्मक आणि धोरणात्मक मदतीचे मूल्यांकन, ज्यात विस्तार सेवा, शेतकरी सहकारी संस्था आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारींचा समावेश आहे.

३. कृषिक्षेत्रातील हवामान बदलाच्या अनुकूलन आणि निवारण धोरणांमधील संभाव्य सहकार्यांवरील तपास, जसे की, ॲग्रोफॉरेस्ट्री प्रणालींचे समाकलन आणि शाश्वत भूमी वापर पद्धतींचा प्रचार. या संशोधन दिशांचा पाठपुरावा करून, शैक्षणिक समुदाय विकसनशील देशांतील कृषिक्षेत्रासाठी हवामान बदलाच्या अनुकूलनासाठी तसेच सर्वसमावेशक आणि प्रभावी धोरणे व कार्यक्रमांच्या विकासास समर्थन देण्यासाठी मौल्यवान माहिती प्रदान करू शकतो.

## संदर्भ ग्रंथ सूची


1. Acevedo, M., Pixley, K., Zinyengere, N., Meng, S., Tufan, H., Cichy, K., Bizikova, L., Isaacs, K., Ghezzi-Kopel, K., & Porciello, J. (2020). A scoping review of adoption of climate-resilient crops by small-scale producers in low- and middle-income countries. Nature Plants, 6(10), 1231-1241. https://doi.org/10.1038/s41477-020-00783-z
2. Agarwal, T., Goel, P. A., Gartaula, H., Rai, M., Bijarniya, D., Rahut, D. B., & Jat, M. (2021). Gendered impacts of climate-smart agriculture on household food security and labor migration: insights from Bihar, India. International Journal of Climate Change Strategies and Management, 14(1), 1-19. https://doi.org/10.1108/ijccsm-01-2020-
3. Ali, S., Liu, Y., Ishaq, M., Shah, T., Abdullah, N., Ilyas, A., & Din, I. (2017). Climate Change and Its Impact on the Yield of Major Food Crops: Evidence from Pakistan. Foods, 6(6), 39. https://doi.org/10.3390/foods6060039
4. Arora, N. K. (2019). Impact of climate change on agriculture production and its sustainable solutions. Environmental Sustainability, 2(2), 95-96. htt{s://doi.org/10.1007/s42398-019-00078w
5. Belay, A., Recha, J. W., Woldeamanuel, T., & Morton, J. F. (2017). Smallholder farmers' adaptation to climate change and determinants of their adaptation decisions in the Central Rift Valley of Ethio{ia. Agriculture & Food Security, 6(1). https://doi.org/10.1186/s40066-017-01001
6. Calzadilla, A., Zhu, T., Rehdanz, K., Tol, R. S., & Ringler, C. (2013). Economywide im{acts of climate change on agriculture in Sub-Saharan Africa. Ecological Economics, 93, 150-165. https://doi.org/10.1016/j.ecolecon.2013.05.006
7. Campbell-Lendrum, D., & Corvalan, C. (2007b). Climate Change and Developing-Country Cities: Implications for environmental health and Equity. Journal of Urban Health, 84(S1), 109-117. https://doi.org/10.1007/s11524-007-9170-x
8. Climate Change 2021: The Physical Science Basis. (2021). https://www.ipcc.ch/report/ar6/wg1/
9. Climate change costs India 10 billion every year. (2023). https://economictimes.indiatimes.com/news/economy/finance/climate-change-costs-india-10-billion-every-year-government/printarticle/60113030.cms
10. Gopalakrishnan, T., Hasan, M., Haque, A., Jayasinghe, S., & Kumar, L. (2019). Sustainability of Coastal Agriculture under Climate Change. Sustainability, 11(24), 7200. https://doi.org/10.3390/su11247200
11. Issahaku, G., Abdul-Rahaman, A., & Amikuzuno, J. (2021). Climate change adaptation strategies, farm performance and poverty reduction among smallholder farming households in Ghana. Climate and Development, 13(8), 736-747. https://doi.org/10.1080/17565529.2020.1860884
12. Janjua, A. A., Aslam, M., Sultana, N., & Batool, Z. (2021). Identification of climate induced optimal rice yield and vulnerable districts rankings of the Punjab, Pakistan. Scientific Reports, 11(1). https://doi.org/10.1038/s41598-021-02691-4
13. Khan, M. A., Tahir, A., Khurshid, N., Husnain, M. I. U., Ahmed, M., & Boughanmi, H. (2020). Economic Effects of Climate Change-Induced Loss of Agricultural Production by 2050: A case study of Pakistan. Sustainability, 12(3), 1216. https://doi.org/10.3390/su12031216

14. Kumar, P., Gupta, S., & Kunwar, N. (2020). Impact of climate change on various agricultural activities in India. International Journal of Chemical Studies, 8(6), 2573-2575. https://doi.org/10.22271/chemi.2020. v8.i6aj.11168
15. Makate, C. (2019). Local institutions and indigenous knowledge in ado{tion and scaling of climate-smart agricultural innovations among sub-Saharan smallholder farmers. International Journal of Climate Change Strategies and Management, 12(2), 270-287. https://doi.org/10.1108/ijccsm-07-2018-0055
16. Ndamani, F., & Watanabe, T. (2017). Determinants of Farmers' Climate Risk Perceptions in Agriculture—A Rural Ghana perspective. Water, 9(3), 210. https://doi.org/10.3390/w9030210
17. Ortiz-Bobea, A. (2021). Climate, agriculture and food. arXiv (Cornell University). https://doi.org/10.48550/arxiv.2105.12044

◆

शेती हा आमच्या सगळ्यांच्या बुद्धीचा प्रयत्न आहे. कारण अखेरीज ती खरी संपत्ती, चांगली नैतिकता आणि आनंदी बनवते.

**- थॉमस जेफर्सन**

---

सर्वात मोठी जोखीम म्हणजे कोणतीही जोखीम न घेणे.

**- मार्क झुकरबर्ग**

---

माणुस म्हणतो, पैसा आला की, मी काही तरी करेन पैसा म्हणतो, तु काही तरी कर मगच मी येईन!

**- अनामिक**

# सामाजिक संरचनांतर्गत आरोग्य व शिक्षणक्षेत्राची वास्तवता आणि आव्हाने

**प्राची मिलिंद साळुंखे** †
**निकिता व्यंकटेश धवन** ††

**प्रास्ताविक:**

'आधारभूत संरचना' म्हणजे संरचनात्मक घटकावयवांचे आंतरजोडणी संच, की जो विकासाच्या संपूर्ण संरचनेच्या मूळ चौकटीला उपबंध करतो. अर्थव्यवस्थेच्या विकासात आणि मानवी समाजाच्या राहणीमान पातळीत सातत्यपूर्ण सुधारणा होण्याच्या अनुषंगाने विविध वस्तू व सेवासुविधा उपलब्ध करणाऱ्या परस्परसंबंधित भौतिक व सामाजिक घटकावयवांचे कायमस्वरूपी अस्तित्व असेही वर्णन आधारभूत संरचनाविषयी केले जाते. अर्थशास्त्रज्ञ व नियोजनकार अशा आधारभूत संरचनेचे प्रामुख्याने भौतिक संरचना आणि सामाजिक संरचना अशा दोन भागात वर्गीकरण करतात. भौतिक संरचना उत्पादनव्यय कमी करण्यास आणि श्रमिक व भांडवलाच्या उत्पादकता वाढीला सहाय्य करतात, तर सामाजिक संरचना मनुष्यबळाची कार्यक्षमता व कार्यकुशलतेत गुणात्मक सुधारणा होण्यास सहाय्य करतात. भारतीय व महाराष्ट्र राज्याच्या समग्र अर्थव्यवस्थेच्या विकासात 'सामाजिक संरचना'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रस्तुत लेखात भारत आणि महाराष्ट्र राज्यातील सामाजिक संरचनेंतर्गत आरोग्य व शिक्षणक्षेत्राची वास्तवता आणि आव्हाने अभ्यासण्यात आली असून, सदर लेख पूर्णपणे दुय्यम आधारसामग्रीवर आधारित आहे.

**उद्दिष्ट्ये :**

सदर लेखात पुढील उद्दिष्ट्ये विचारात घेऊन विवेचन केले आहे.

१. सामाजिक संरचनेची आर्थिक व सामाजिक विकासातील भूमिका अभ्यासणे.
२. भारत व महाराष्ट्र राज्यातील सामाजिक संरचनेंतर्गत शिक्षणक्षेत्राची वास्तवता आणि आव्हाने अभ्यासणे.
३. भारत व महाराष्ट्र राज्यातील सामाजिक संरचनेंतर्गत आरोग्य क्षेत्राची वास्तवता आणि आव्हाने अभ्यासणे.

**सामाजिक संरचनेची भूमिका:**

आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या १९७६ मधील

† संशोधक विद्यार्थिनी, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, पुणे.
आजीव सभासद क्रमांक : २०३४ भ्रमणध्वनी : ८३९०२४००९४ इमेल : prachisalunkhe23@gmail.com
†† संशोधक विद्यार्थिनी, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, पुणे.
आजीव सभासद क्रमांक : २०६१ भ्रमणध्वनी :७६२०९५५३३९ इमेल: nikitadhawan101020@gmail.com

जागतिक रोजगार परिषदेत 'विकासाची व्यूहरचना' म्हणून मूलभूत गरजांची पूर्तता करण्यावर भर दिला गेला आहे. त्या अनुषंगाने व्यक्तिगत, सार्वजनिक व शासन पातळीवर केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक दृष्टीने सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. 'सामाजिक संरचना' हा पायाभूत संरचना क्षेत्राचा एक उपघटक असून, यांत सामाजिक सेवा उपकृत करणाऱ्या संपदेचा समावेश होतो. उदा. विविध शैक्षणिक संस्था, दवाखाने व रुग्णालये, गृहनिर्माण, कायदा व सुव्यवस्था, सुरक्षितता, नागरी व ग्रामीण भागातील सामाजिक सुविधा जसे, स्वच्छ पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे इत्यादी. शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत सामाजिक संरचनामुळे अर्थव्यवस्थेत प्रचंड बाह्यलाभ प्राप्त होतात. अर्थात, यासाठी करावी लागणारी आर्थिक गुंतवणूकही प्रचंड असल्याने अशा गुंतवणुकीची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्रावर येऊन पडते. भारतात अत्यावश्यक सामाजिक संरचना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी केंद्र सरकार आणि संबधित राज्यसरकारांवर सोपविली आहे.

शिक्षण आणि आरोग्य या दोन घटकांचा मानवी संसाधनाच्या गुणात्मकतेवर थेट परिणाम होतो. म्हणून मानवी निर्देशांक तयार करताना साक्षरता दर आणि सरासरी आयुर्मान या दोन घटकांना अतिप्राधान्य दिले आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील मानवी निर्देशांकात फरक असण्याचे मुख्य कारण म्हणजे त्या त्या राष्ट्रांमधील शैक्षणिक आणि आरोग्यविषयक स्थितीतील तफावत होय. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत विकसनशील राष्ट्रांमध्ये ही तफावत अधिक जाणवते. गुणात्मक शिक्षण आणि आरोग्य ही एक आर्थिक गुंतवणूक असून त्यामुळे गुणात्मक मानवी भांडवलाचा साठा वाढतो. शिक्षणातील गुंतवणुकीमुळे श्रमिकांच्या गुणवत्तेत सुधारणा होऊन वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वृद्धिदरात वाढ होते. अर्थव्यवस्थेतील उत्पादकता वाढीसाठी ज्ञान, कौशल्ये आणि प्रेरणा यांच्या माध्यमातून मानवी संसाधन विकास कार्यक्रम निश्चित केला पाहिजे. या कारणास्तव युनोस्कोने एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी किमान १५% खर्च शिक्षणावर करण्याची शिफारस केली आहे. विकसित राष्ट्रांत हा खर्च ५ टक्केपेक्षा अधिक आहे.

**महाराष्ट्रातील सामाजिक संरचना:**

महाराष्ट्र राज्य भारतीय संघराज्यांपैकी एक प्रमुख विकसित राज्य आहे. सद्य:स्थितीत भारतात महाराष्ट्राचा राज्य उत्पन्न, लोकसंख्या आणि भौगोलिक क्षेत्रफळ याबाबतीत अनुक्रमे पहिला, दुसरा आणि तिसरा क्रमांक आहे. त्यांचे प्रमाण अनुक्रमे १३.३, ९.३६ आणि ९.२९ आहे. २०२०-२१ या वर्षात महाराष्ट्राचा राज्य उत्पन्नात कृषी, उद्योग आणि सेवाक्षेत्रातील हिस्सा अनुक्रमे १३.२, २६.८ आणि ६० प्रतिशत इतका होता. २०२३-२४ या वर्षात चालू किंमतींनुसार महाराष्ट्राचे एकूण उत्पन्न व दरडोई उत्पन्न विचारात घेता भारतात महाराष्ट्राचा अनुक्रमे पहिला आणि १२वा क्रमांक होता. देशातील कृषी व औद्योगिक उत्पादन, व्यापार, वाहतूक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती इत्यादी बाबतीत महाराष्ट्र हे देशात आर्थिकदृष्ट्या पुढारलेले राज्य समजले जाते. महाराष्ट्र राज्याला भारताच्या औद्योगिक विकासात अनन्यसाधारण स्थान आहे. महाराष्ट्रातील कारखानदारी बृहन्मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिक या जिल्ह्यांतच एकवटलेली आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कोकण, विदर्भ व मराठवाडा हे विभाग आजही औद्योगिकदृष्ट्या पिछाडीवर आहेत. भौगोलिक अडचणींमुळे कोकणात शेतीचाही विकास होऊ शकला नाही. मुंबई ते पुणे हा पश्चिम महाराष्ट्रातील पट्टा सोडल्यास महाराष्ट्राचे अन्य भाग देशाच्या अन्य राज्यांइतकेच, किंबहुना अधिक प्रमाणात, मागासलेले आहेत. एकीकडे महाराष्ट्राचा आर्थिक विकास होतो आहे तर दुसरीकडे विषमताही वाढत आहे. ही विषमता संपत्तीची आहे, तशी मिळणाऱ्या संधीचीही आहे. उत्पन्नाची आहे तशी शिक्षणातही आणि आरोग्याच्या सुविधांमध्येही आहे.

महाराष्ट्राचा समतोल तसेच समन्यायी विकास झाला असे आपणांस निश्चितच म्हणता येणार नाही.

**सामाजिक संरचनांतर्गत शिक्षणक्षेत्राची वास्तवता व आव्हाने:**

शिक्षण हा प्रत्येक देशाचा विकासाचा एक पायाभूत घटक असून आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतो. प्राचीन काळापासून भारतातील शिक्षणाची गुणवत्ता जागतिक स्तरावर नावाजलेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने सर्वप्रथम मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणा पत्रात शिक्षणाचा अधिकार घोषित केला. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हक्कामुळे २०२० पर्यंत जगातील सुमारे ९०% लोकांनी प्राथमिक शिक्षण तर ६०% लोकांनी माध्यमिक शिक्षण घेतले आहे. जागतिक लोकसंख्येच्या ४०% लोकांनी कोणते ना कोणत्या प्रकारचे शिक्षण घेतले आहे. भारतातील शिक्षणामध्ये होत गेलेली प्रगती आपल्याला भारतातील

**तक्ता क्र. १ : साक्षरता दर (टक्केवारीत)**

| वर्ष | एकूण साक्षरता | | पुरुष साक्षरता | | महिला साक्षरता | | लिंग तफावत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| १९६१ | २८.३० | ३५.०८ | २७.१६ | ४९.२६ | ८.८६ | १९.८० | १८.३० | २९.४६ |
| १९७१ | ३४.४५ | ४५.७७ | ४५.९६ | ५९.४० | २१.९७ | ३१.०० | २३.९९ | २८.०४ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.८७ | ६४.१३ | ७६.५६ | ३९.२९ | ५२.३२ | २४.८४ | २४.२४ |
| २०११ | ७४.०४ | ८२.३४ | ८२.१४ | ८८.३८ | ६५.४६ | ६९.८७ | १६.६८ | १८.५१ |
| २०२३* | ७७.७० | ८४.८० | ८४.७० | ९०.७० | ७०.३० | ७८.०४ | १४.४० | १२.६६ |

स्त्रोत-Census of India2001 and 2011 and *https://www.geeksforgeeks.org.

वाढलेल्या साक्षरता दरावरून स्पष्ट होतो.

तक्ता क्र. १ नुसार, स्वातंत्र्यानंतर भारतीय शिक्षण पद्धतीत प्रगती व बदलाचा सकारात्मक परिणाम म्हणजे १९६१ मध्ये भारताच्या साक्षरता दरात १९६१,१९९१, २०११ आणि २०२३ या वर्षात अनुक्रमे २८.३०, ५२.२१, ७४.०४ व ७७.७० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते. एकूण साक्षरतेसह पुरुष साक्षरता आणि महिला साक्षरतेमध्येसुद्धा वाढ झाली आहे. महाराष्ट्राचा साक्षरता दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्र हे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून २०२३ या वर्षातील एकूण साक्षरता दर ८४.८०%, पुरुष साक्षरता दर ९०.७%, तर महिला साक्षरता दर ७८.०४% आहे. महाराष्ट्रातील साक्षरता दरात होणारी वाढ ही विविध शैक्षणिक योजना व शिक्षणातील समस्या जाऊन घेऊन त्यावर केलेल्या उपाययोजनांची फलश्रुती आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण अहवाल २०२०-२१ नुसार, भारतात उच्चशिक्षण संदर्भात मुलांचे प्रमाण ५१.३%, तर मुलींचे प्रमाण ४८.७% होते. २०१४-२०१५ या वर्षाच्या तुलनेत ही वाढ २१ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. संवर्गनिहाय वर्गीकरण करता २०२०-२१ या वर्षात अनुसूचित जातिविद्यार्थी संख्येत २७.९८%, अनुसूचित जमातीमध्ये ४७% व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येत ३१.६७ टक्क्यांनी वाढ झाली. भारतात एकूण १११३ विद्यापीठे असून, ६७५ विद्यापीठे ही सरकारी, ४४६ विद्यापीठे ही खाजगी संस्थांची आहेत. महिलांसाठी स्वतंत्र १७ विद्यापीठे आहेत, तर ११,२९६ एकल संस्था आहेत. देशात सर्वाधिक विद्यापीठे ही राजस्थान (९२), उत्तर प्रदेश (८४), गुजरात (८३) इतकी आहेत, तर

महाराष्ट्रात (२३) इतकी विद्यापीठे आहेत. उच्च शिक्षणामध्ये देशातील एकूण विद्यार्थीसंख्येच्या १०.९८% विद्यार्थी संख्या महाराष्ट्रात आहे. विद्यार्थीसंख्येच्याबाबतीत, महाराष्ट्र राज्य हे देशात दुसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्रात प्रति एक लाख लोकसंख्येमागे ३४ महाविद्यालये आहेत. महाराष्ट्रात २०२०-२१ या वर्षाच्या तुलनेत २०२१-२२ मध्ये ८ लाखांहून अधिक नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी केली गेली आहे. शालेय शिक्षणात २०२१-२२ या कालावधीत ९५.०७ लाख शिक्षक कार्यरत असून ५१% महिला शिक्षकांचे प्रमाण आहे.

२०२१ मध्ये प्रथम 'असर' या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांमध्ये हे सर्वेक्षण केले गेले. यामध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील शालेय नोंदणीचे प्रमाण २०१८ मध्ये ६०.५% होते ते २०२१ मध्ये ६९.७% पर्यंत वाढले. शाळेतील विद्यार्थांचे प्रमाण वाढणे व गळतीचे प्रमाण कमी होण्यासाठी अनेक योजना राबवण्यात येत आहेत. उदा.: मध्यान्ह भोजन, मोफत पुस्तके, गाडी भाडे अशा अनेक योजना अंमलात आणल्या गेल्या. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणामध्ये २०१८ मध्ये एकूण नोंदणी प्रमाण ९१.५% होते, ते २०२०-२१ मध्ये ९२.६ टक्क्यांपर्यंत वाढले. उच्च माध्यमिकमध्ये हेच प्रमाण २०१८-१९ मध्ये ७१.४% होते, ते २०२०-२१ मध्ये ६८.२ टक्क्यांपर्यंत वाढले.

महाराष्ट्र राज्यातील २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीतील शैक्षणिक स्थिती तक्ता क्र. २ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. २ नुसार,२०१५-१६ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शाळांची संख्या ही ९८,२१९ इतकी होती. त्यात २०२०-२१ या वर्षामध्ये १ लाखांहून अधिक वाढ झाल्याचे दिसून येते. २०१५-१६च्या तुलनेत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या संख्येतही वाढ झाल्याचे दिसून येते. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात मुलींच्या नोंदणीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. उच्च शिक्षणात मुलींच्या नोंदणी प्रमाणात लक्षणीय वाढ होत आहे.

**तक्ता क्र. २ : महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक स्थिती**

| अ. क्र. | प्राचले | प्राथमिक | | माध्यमिक व उच्च माध्यमिक | | उच्च शिक्षण (विद्यापीठ व महाविद्यालये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०२०-२१ | २०१५-१६ | २०२०-२१ | २०१५-१६ | २०२०-२१ |
| १ | एकूण संख्या | ९८,२१९ | १,०६,३३८ | २५,०२९ | २८,५०५ | ४९ +४५६९* | ७१+४५३२* |
| २ | एकूण विद्यार्थी नोंदणी (लाख) | १६०.४ | १५३.९ | ६४.२ | ६५.२ | ४०.१६ | ४५.४६ |
| ३ | मुलींची नोंदणी (%) | ४६.९ | ४६.९ | ४५.५ | ४७.० | ४४.२ | ४५.१९ |
| ४ | शिक्षक संख्या (लाख) | ५.२ | ५.१ | २.२० | २.४८ | १.५१ | १.६३ |
| ५ | शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर | १:३१ | १:३० | १:२९ | २६:१ | २७ :१ | २६:१ |

स्त्रोत- Economic Survey of Maharashtra, 2016-17 and 2022-23.

टीप : * विद्यापीठ व महाविद्यालयांची संख्या स्वतंत्र व इतर माहिती एकत्रित दर्शविली आहे.

**• राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**

शिक्षणातील प्रगती साध्य करण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात अनेक शैक्षणिक धोरणे व आयोग नेमण्यात आले. याद्वारे भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल सुचवण्यात आले. आतापर्यंत १९६८ साली कोठारी आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शिक्षण आराखडा सुरू होता. तब्बल ३० वर्षानंतर के.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलात आले. या आयोगाने १०+३+२ हा आराखडा बदलून ५+३+३+४ असा नवीन आराखडा प्रस्थापित करून पूर्वप्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. देशातील २ कोटी शाळा बाह्य मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे धोरण ठेवले. किमान इयत्ता ५ वी पर्यंत मातृभाषेतून शिक्षण, ६ वी पासून व्यावसायिक शिक्षण, २०३५ पर्यंत उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण (GER) ५०% पर्यंत वाढविणे, शैक्षणिक क्रेडिट बँक सुरू करणे, राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच स्थापन करणे अशा अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी या पूर्वप्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सुचवल्या गेल्या आहेत.

**• शैक्षणिक क्षेत्रापुढील आव्हाने**

**१. शिक्षणाची गुणवत्ता :** 'असर' या संस्थेच्या अहवालातून गुणवत्तेविषयी व विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी सकारात्मक मूल्यांकन दिसून येत नाही. अलीकडील काळात लक्षणीय सुधारणा झाल्या असूनही शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये अनेक पायाभूत सोयीसुविधा, अद्ययावत अभ्यासक्रम व पात्र व प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव असल्याचे दिसून येते. गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांपर्यंत पोहचवणे हे शिक्षणक्षेत्रापुढील सर्वात मोठे आव्हान आहे.

**२. शिक्षक प्रशिक्षण :** विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासोबत व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकसनासाठी, कौशल्यप्राप्त शिक्षक व प्रशिक्षक पुरविणे हे आव्हान असू शकते. तसेच भारतात व महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडणारे तरुण यांच्याकडे उद्योगस्तरीय कौशल्य नाहीत. यामुळे या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**३. सुलभ व परवडणारे शिक्षण :** भारतातील शिक्षण अजूनही मोठ्या लोकसंख्येला परवडणारे नाही. शहरी आणि ग्रामीण भागात शिक्षणाच्या प्रवेशामध्ये असमानता दिसून येते. ग्रामीण भागात विद्यापीठे निर्माण करून शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिष्यवृत्ती उपलब्ध करून देणे; तसेच ऑनलाईन शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हे आव्हान आहे. खाजगी शाळांची वाढती फी नियंत्रित करून शिक्षणाचे व्यापारीकरण रोखण्यासाठीच्या उपायांमध्ये समतोल राखण्याची गरज आहे.

**४. संशोधनास प्रोत्साहन देणे :** इतर देशांच्या तुलनेत भारतात संशोधकांची संख्या फार कमी आहे. २०१७-१८ च्या सर्वेक्षणामध्ये पीएच.डी. (संशोधन) करणाऱ्या विद्यार्थीसंख्येत वाढ झाल्याचे दिसून येते. शिष्यवृत्तीची संख्या आणि प्रमाण अधिक वाढवल्यास गुणात्मक संशोधनामध्ये वाढ होऊ शकते.

**५. शिक्षणावरील खर्च :** १९६८ साली कोठारी आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% खर्च हा शिक्षणावर करणे अपेक्षित होते. परंतु आजपर्यंत भारतीय शिक्षणावर ३% पेक्षा जास्त खर्च केला गेल्याचे दिसून येत नाही. शिक्षणावर होणाऱ्या खर्चापैकी सर्वाधिक खर्च हा शिक्षकांच्या वेतनावर होत आहे. तर शैक्षणिक सोयीसुविधा व शिक्षणाच्या प्रगतीवर प्रमाणात खर्च होत आहे. हा खर्च वाढवणे व एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% पर्यंत शिक्षणावरील खर्च वाढवणे हे भारतीय शिक्षणापुढील आव्हान असणार आहे.

**सामाजिक संरचनांतर्गत आरोग्यक्षेत्राची वास्तवता व आव्हाने:**

शिक्षणाप्रमाणेच आरोग्य हा सामाजिक-आर्थिक उत्पादनफलनाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. उत्तम आरोग्य हा श्रमिक उत्पादकता आणि कार्यक्षमतेचा प्रमुख निर्धारक आहे. मोठ्या प्रमाणावरील आरोग्यविषयक सुविधा केवळ सार्वजनिक संसाधनाद्वारे करता येतात. सार्वजनिक आरोग्याचे मापन करताना प्रामुख्याने ग्रामीण आणि नागरी भागातील स्वच्छ पाणीपुरवठा, गृहनिर्माण, पोषक आहार, सार्वजनिक आजारांवर नियंत्रण, वैद्यकीय सुविधा, औषधांचा पुरवठा, महिला व बालकल्याण सेवा, आरोग्यशिक्षण, कुटुंब नियोजन, आरोग्यसेवा क्षेत्रातील सेवकांना प्रशिक्षण, पर्यावरणपूरक सफाई यंत्रणा, मल:निस्सारण सुविधा या बाबींना महत्त्व दिले जाते.

सामाजिक विकास अंतर्गत देशातील लोकसंख्येची गुणवत्ता व राहणीमान दर्शवणारे आरोग्य आणि शिक्षण हे महत्त्वाचे घटक आहेत. राहणीमानाच्या संदर्भात २०२२ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, भारताचा मानव विकास निर्देशांक हा ०.६४ आहे की जो मध्यम श्रेणीत येतो. जागतिक पातळीवर आपला १३४ वा क्रमांक असून जागतिक आनंदी लोकसंख्या निर्देशांकात (World Happiness Index) भारत १२६ व्या स्थानावर आहे. ह्याला कारणीभूत महत्त्वाचे दोन घटक म्हणजे आरोग्य व शिक्षणाची सद्य:स्थिती आणि त्यामध्ये न झालेले कालानुरूप आवश्यक गोष्टींचे बदल.आरोग्यक्षेत्राविषयी रंगवले जाणारे चित्र आणि वास्तविक स्थिती यात बरीच तफावत दिसून येते. भारत हा प्रगतीशील देश आहे, आपण टप्प्याटप्प्याने योग्य दिशेने वाटचाल करीत आहोत. World Population Review 2024च्या आकडेवारीनुसार भारत हा अमेरिकानंतर दुसऱ्या क्रमांकाचा उत्तम गुणवान डॉक्टर निर्माण करणारा देश आहे.

'आरोग्य' हा विषय समवर्ती सूचित समाविष्ट असल्याने नियोजन काळातील भारतातील व महाराष्ट्रातील आरोग्यविषयक व कुटुंब कल्याणविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणीमुळे आरोग्यक्षेत्र संबंधित अलीकडील दशकातील काही महत्त्वपूर्ण बदल तक्ता ३ मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता क्र. ३ : मुख्य आरोग्यविषयक निर्देशक**

| अ. क्र. | निर्देशक | महाराष्ट्र | | भारत | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१३-१४ | २०२०-२१ | २०१३-१४ | २०२०-२१ |
| १. | अर्भक मृत्युदर (दरहजारी) | २५ | १७ | ४२ | ३० |
| २. | ढोबळ मृत्युदर (दरहजारी) | ६.३ | ५.४ | ७.० | ६.० |
| ३. | ढोबळ जन्मदर (दरहजारी) | १६.६ | १५.३ | २१.६ | १९.७ |
| ४. | माता मृत्युदर (दर लाख) | ८७ | ४६ | १७८ | ११३ |
| ५. | नवजात मृत्युदर (दरहजारी ) | १७ | १३ | २८ | २३ |
| ६. | मृतजन्म दर (दरहजारी) | ४ | ३ | ४ | ४ |
| ७. | एकूण जननक्षमता दर | १.८ | १.७ | २.४ | २.२ |

स्रोत: १. Health Dossier 2021: Reflections on key health indicator - Maharashtra.

२. Sample Registration System Statistical Report 2013.

तक्ता क्र. ३ नुसार, भारत व महाराष्ट्रातील आरोग्यविषयक स्थितीत समाधानकारक बदल होत असले तरी निश्चित लक्ष्य साध्य करण्यासाठी आणखी वेगाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. भारतातील आरोग्यव्यवस्थेची संरचना कागदोपत्री चांगली असली तरी तिची वास्तविक स्थिती, गुणवत्ता व कार्यक्षमता समाधानकारक नाही. यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यातला महत्त्वाचा घटक म्हणजे सरकारचा आरोग्यक्षेत्रावर केला जाणारा कमी खर्च. भारत सरकारद्वारा आरोग्य क्षेत्रावर एकूण राष्ट्रीय उत्पन्न (GDP) च्या केवळ १.९% खर्च होत आहे. इतर देशांशी तुलना केली असता हा खर्च खूपच कमी आहे. आरोग्यावर केला जाणारा खर्च आणि देशातील बालमृत्युदर यांचा थेट संबंध आहे. जसजसा आरोग्य क्षेत्रावरील खर्च वाढत जातो तसतसे बालमृत्यूचे प्रमाण कमी होताना दिसत आहे. २०२१ या वर्षाचा विचार करता भारताचा दरडोई आरोग्य खर्च केवळ १९० डॉलरएवढा आहे, तर चीन ९६२ डॉलर, रशिया २,२७८ डॉलर, तर अमेरिकेत ११,७०२ डॉलरएवढा होता. आरोग्य खर्च आणि देशातील लोकांचे आयुर्मान याचाही थेट संबंध आहे. जसजसा आरोग्यावरील खर्च वाढतो तसा देशातील लोकांचे आयुर्मान वाढताना दिसते. २०२१ या वर्षाचा विचार करता, भारताचे सरासरी आयुर्मान ६७.४ वर्षे, चीनमध्ये ७६.७ वर्षे तर अमेरिकेत ७८.८ वर्षे एवढे होते. आरोग्यक्षेत्रावरील खर्च कमी असल्याने आपल्या देशातील सर्व नागरिकांना सार्वजनिक सेवा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. आपल्या नागरिकांना आपल्या खिशातून आरोग्याच्या सेवांवर खर्च करावा लागतो याचे प्रमाणही आपल्या देशात ५०% आहे. चीनमध्ये हा खर्च ३४.७९% तर अमेरिकेत ९.८९ आहे. इतर देशाच्या तुलनेने भारतात हा खर्च फार जास्त आहे. त्यामुळे आपल्या देशातील मध्यमवर्गीय हे गरिबीच्या स्तराकडे जाण्याचे प्रमाण वाढत आहे.

**तक्ता क्र. ४ : भारत व महाराष्ट्र राज्यातील आरोग्यविषयक स्थिती (२०२१)**

| National Health Account (NHA) (२०१७-१८) | महाराष्ट्र | भारत |
|---|---|---|
| दरडोई शासकीय आरोग्य खर्च (रुपये) | १३५६ | १७५३ |
| शासकीय आरोग्य खर्चाचा GSDP मधील वाटा (%) | ०.७ | १.३५ |
| खाजगी आरोग्य खर्च (OOPE) (%) | ४९.१ | ४८.८ |

स्रोत : Health Dossier 2021: Reflections on key health indicators- Maharashtra.9

**महाराष्ट्र राज्यातील आरोग्यक्षेत्राची स्थिती:**

महाराष्ट्र राज्याची आरोग्यक्षेत्राची सद्यस्थिती तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. ४ नुसार, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने २०२१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र शासन एकूण GDP च्या केवळ ०.७% खर्च आरोग्यसेवांवर करीत आहे. बिहार, ओडिशा आणि राजस्थान ही राज्ये महाराष्ट्रापेक्षा जास्त खर्च करीत आहेत. २०१८ मध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने आरोग्यावरील राज्यनिहाय खर्च टप्प्याटप्प्याने वाढवत नेऊन २.५ टक्केपर्यंत करावा असे सांगितले आहे.

**मानवी संसाधन स्थिती :**

महाराष्ट्र राज्यातील आरोग्यक्षेत्रातील मानवी संसाधनाची मागणी आणि पुरवठा यांच्याबाबत विचार करता मानवी संसाधन अपुरे आहे. तक्ता क्र. ५ मध्ये आरोग्यक्षेत्रातील उपलब्ध मानवी संसाधनाची स्थिती दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ५ : महाराष्ट्र राज्यातील आरोग्य सेवाक्षेत्रातील मानव संसाधन**

| प्रकार | आवश्यक पदे (R) | मंजूर पदे (S) | प्रत्यक्ष कार्यरत पदे (P) | रिकामी पदे (V) | वास्तव फरक (R-P) | मानवी संसाधन तफावत निर्देशांक (HR gap Index) |
|---|---|---|---|---|---|---|
| बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी | ३५,८९१ | ४०,१९२ | २७,२६५ | १२,९२७ | ८,६२६ | ७१.४१ |
| कर्मचारी व परिचारिका | २४,५५१ | १६,१२३ | ११,४५१ | ४,६७२ | १३,१०० | |
| प्रयोग शाळा तंत्रज्ञ | ६,४९६ | ४,५१३ | २,८७५ | १,६३८ | ३,६२१ | |
| फार्मासिस्ट | ३,५८८ | ४,२१० | ३,५८५ | ६२५ | ३ | |
| वैद्यकीय अधिकारी (MBBS) | ६,०१५ | ६,२५८ | ५,८८६ | ३७२ | १२९ | |
| विशेषज्ञ | ४५०२ | ४,१२६ | २,६६२ | १४६४ | १८४० | |

स्रोत: Health Dossier 2021: Reflections on key health indicator - Maharashtra

तक्ता क्र. ५ नुसार, आवश्यक असणारे कर्मचारी आणि वास्तवात असणारे कर्मचारी यात कमालीची तफावत आहे. मानवी संसाधन तफावत निर्देशांक जवळपास ७१% एवढा आहे. परिणामी, आरोग्यसेवेच्या गुणात्मकतेवर विपरीत परिणाम होतो. आरोग्यक्षेत्रावरील खर्च कमी असल्याने आरोग्यक्षेत्रातील विभागांना खर्चासाठी कात्री लावली जाते. कमी खर्चापायी मुख्य उत्पादकता आणि कार्यक्षमता कमी होते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (WHO) 'सर्वांसाठी आरोग्य' (Health for all) हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशांनी त्यांच्या GDP च्या किमान ५% खर्च केला पाहिजे. तरच लोकसंखेच्या उत्पादकतेत आणि राहणीमान दर्जात वेगाने वाढ होऊ शकते.

**सारांश :**

आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजांची पूर्तता व त्यात गुणात्मक सुधारणा होणे अत्यावश्यक आहे. स्वातंत्रोत्तर काळात भारतासह महाराष्ट्र राज्यात प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण संस्थाची संख्या वाढत असून उच्च शिक्षणात एकूण विद्यार्थी संख्येत राखीव व दुर्बल गटातील मुलींचे प्रमाण वाढत आहे. ही सकारात्मक बाब असली तरी व्यावसायिक शिक्षणात मुलींचे प्रमाण आजही कमी आहे. सरकारचा सहभाग कमी होत असल्याने खाजगी शिक्षणसंस्थांची संख्या वाढून गुणात्मक शिक्षणाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच शिक्षणासह विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा परिणाम म्हणून अर्भक मृत्युदर, बालमृत्युदर, माता मृत्युदर, ढोबळ जन्मदर व मृत्युदर यांत सकारात्मक बदल झालेले असले तरी वाढती लोकसंख्या, कुपोषण, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे वाढते प्रमाण या समस्या आजही आहेत. लोकसंख्येच्या मानाने आरोग्यविषयक उपलब्ध सेवा अपुऱ्या आहेत. आधुनिक आरोग्यसेवा उभारण्यासाठी सार्वजनिक आरोग्यक्षेत्रातील गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


१. All India Survey on Higher Education 2020-21, Government of India, Ministry of Education, Department of Higher Education, New Delhi.

२. Census of India- 2001 and 2011.

३. Economic Survey of Maharashtra 2016-17 and 2022-23, Directorate of Econom-

ics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.

४. Health Dossier 2021: Rflections on key health indicators - Maharashtra, National Health Systems Resource Centre.

५. Kaliya, S., (2024), 'The great Indian unhappiness: What a new report says about India's young and old?', The Hindu newspaper, 26th March.

६. नरवणे मिनल, (१९९९), 'भारतीय शिक्षण आणि समस्या', नूतन प्रकाशन, पुणे.

७. पाटणकर चिन्मय, (२०२३), 'देशातील उच्च शिक्षणाचा लेखाजोखा काय सांगतो? उच्च शिक्षणात महाराष्ट्र कुठे?' दैनिक लोकसत्ता, ९ फेब्रुवारी २०२३.

८. पाटील सुभाष, (२०१८), 'महाराष्ट्रातील सामाजिक संरचना : वास्तव प्रश्न व उपाय', अर्थसंवाद, जानेवारी-मार्च २०१८, खंड ४१, अंक ४.

९. Sample Registration System Statistical Report 2013, Office of the Registrar General and Census Commissioner, India, Ministry of Home Affairs, Government of India, New Delhi (https://censusindia, gov.in).

१०. Sharma Sanjay, (2024), 'AISHE 2024 Maharashtra's higher education trends', Times of India, 20th November.

११. WHO India, World Health Organization (https://www.who.int).

१२. World population review report 2024(https://worldpopulationreview.com).

◆

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवाद मधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# प्रधानमंत्री जनधन योजनेचे समीक्षात्मक मूल्यमापन

**शीतल मोहन कदम** †
**प्रज्ञा शरद लाड** ††

**प्रस्तावना -**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील व्यक्तींना सबल करण्यासाठी वित्तीय प्रवाहात समाविष्ट करून घेणे गरजेचे आहे. समाजातील दुर्बल गटातील व्यक्तींना वित्तीय प्रवाहात समाविष्ट करून घेतल्याशिवाय देशाचा सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक विकास घडून येणे अशक्य आहे. हाच दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून मोदी सरकारने पहिल्यांदा सत्तेत आल्यावर वित्तीय समावेशनाचा एक पद्धतशीर कार्यक्रम निश्चित केला. या वित्तीय समावेशनात व्यक्तीचे बँकेत बचत खाते उघडणे, तिला कर्जाची सुविधा उपलब्ध करून देणे, व्यक्तीला विमा व पेन्शन सुविधा तसेच गुंतवणूक सुविधा उपलब्ध करून देणे व या सर्वांच्या माध्यमातून समाजातील दुर्बल गटातील व्यक्तीच्या उत्पन्न पातळीत वाढ करून त्यांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे हे उद्दिष्ट ठरवले. देशातील दुर्बल गटातील लोकांच्या उत्पन्न पातळीत वाढ घडवून आणण्यासाठी वर्तमान सरकारने पहिल्यांदा प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीचे बँक खाते असावे, या दृष्टिकोनातून 'मेरा खाता - भाग्य विधाता' (My bank account - the creator of good fortune) अंतर्गत प्रधानमंत्री जनधन योजना जाहीर केली. या योजनेला लोकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला व बहुसंख्य लोक संस्थात्मक वित्त प्रवाहापासून बाहेर होते ते वित्तीय प्रवाहात येण्यास मदत झाली. या योजनेच्या माध्यमातून अल्प उत्पन्न गटातील लोकांना बचतीची सवय लावणे व त्याचा वापर भांडवल निर्मितीसाठी करून देशाचा आर्थिक विकास वेग वाढवणे हे उद्दिष्ट होते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये - सदर संशोधनात पुढील उद्दिष्ट्ये ठरवण्यात आली आहेत.

१) वित्तीय समावेशन संकल्पनेचा अभ्यास करणे.
२) प्रधानमंत्री जनधन योजनेचे स्वरूप अभ्यासणे.
३) प्रधानमंत्री जनधन योजनेचे मूल्यमापन करणे.
४) प्रधानमंत्री जनधन योजनेच्या

† संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा. (स्वायत्त) घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.
आजीव सदस्य क्र. : मोबाईल नंबर - ९९७५२३१९१४, ई - मेल - shitalkadam5633@gmail.com
†† संशोधक विद्यार्थिनी, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा. (स्वायत्त) घटक महाविद्यालय कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.
आजीव सदस्य क्र. : २०७३ मोबाईल नंबर - ७०२०००४६२८, ई - मेल - pradnyalad20699@gmail.com

अंमलबजावणीतील आव्हाने शोधणे.

५) प्रधानमंत्री जनधन योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचवणे.

**अभ्यासाची पद्धत**

सदरचा अभ्यास वर्णनात्मक स्वरूपाचा आहे. तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे. दुय्यम सामग्री प्रधानमंत्री जनधन योजनेची केंद्र सरकारची अधिकृत वेबसाईट, भारतीय रिझर्व्ह बँकेचे विविध अहवाल, वर्तमानपत्रे, प्रकाशित लेख यांचा वापर केला आहे.

**वित्तीय समावेशन संकल्पना**

समाजातील वंचित गटातील लोकांना परवडणाऱ्या दरात सहजासहजी वित्तीय सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांना वित्तीय प्रवाहात समाविष्ट करून घेणे म्हणजे वित्तीय समावेशन होय.

**प्रधानमंत्री जनधन योजनेची उद्दिष्ट्ये**

खालील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी मोदी सरकारने प्रधानमंत्री जनधन योजना सुरू केली.

१) औपचारिक बँकिंग व्यवस्थेच्याबाहेर असणाऱ्या लोकांना बँकिंग व्यवस्थेत समाविष्ट करून घेणे.

२) ग्रामीण तसेच शहरी भागातील लोकांना वित्तीय प्रवाहात समाविष्ट करून घेणे.

३) सरकारी अनुदान योजनेतील भ्रष्टाचार कमी करणे.

४) डिजिटल इंडिया बनविणे.

५) भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर वाढवणे.

**प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत मिळणारे लाभ -**

प्रधानमंत्री जनधन योजना अंतर्गत पुढील लाभ मिळतात.

प्रत्येक प्रौढ व्यक्तीला जर तिचे अद्याप बँकेत बचत खाते नसेल, तर शून्य रुपये शिल्लक ठेवून बँकेत बचत खाते उघडता येते.

या खात्यातील शिल्लक ठेव रकमेवर बँक बचत खात्यावरील प्रचलित दराने व्याज देते.

सदर योजनेअंतर्गत बचत खाते उघडणाऱ्या खातेधारकाला रु.१०००० इतकी जादा रक्कम उचल करण्याची सुविधा (ओव्हर ड्राफ्ट फॅसिलिटी )उपलब्ध असते. वयाच्या ६५ वर्षांपर्यंत ओव्हरड्राफ्ट फॅसिलिटीचा लाभ घेता येतो.

या योजनेअंतर्गत पात्र व्यक्तीला रूपे डेबिट कार्ड सुविधा उपलब्ध होते आणि रूपे डेबिट कार्ड धारण करणाऱ्या व्यक्तीला रु.२,००,०००/ इतके अपघात विमा संरक्षण उपलब्ध होते.

तक्ता क्र.१ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि ग्रामीण सहकारी बँका यांनी प्रधानमंत्री जनधन योजनांतर्गत दिनांक १३ /११ /२०२४ पर्यंत किती बँक बचत खाती उघडली हे दर्शवले आहे. या योजनेंतर्गत सर्व बँकांनी मिळून एकूण ५३ कोटी ९९ लाख बँक बचत खाती उघडली. यातील सर्वाधिक बँक बचत खाती (७७.८८%) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी उघडली तर प्रादेशिक ग्रामीण बँकांनी (२०.३५%) व खाजगी क्षेत्रातील बँकांनी (३.०९%) बँक खाती उघडली. या योजनेअंतर्गत सहकारी क्षेत्रातील बँकांनी केवळ (०.३५ बँक बचत खाती उघडली. या योजनेंतर्गत ग्रामीण व अर्धनागरी भागातील लोकांनी एकूण बँक खात्यापैकी (६६.५८%) तर शहरी भागातील लोकांनी (३३.००%) बँक बचत खाती उघडली. आजपर्यंत बहुतांश महिला बँकिंग क्षेत्राच्या प्रवाहाबाहेर होत्या. त्यामुळे या योजनेचा फायदा महिलांना मोठ्या प्रमाणात झाला. एकूण बँक खात्यापैकी (५५.६५%) बँक खाती ही फक्त महिलांची होती. सरकारने वर्ष २०१४ पासूनच या योजनेचा प्रारंभ केला होता. त्यामुळे महाराष्ट्रात नुकतीच राबवली गेलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना याकरता महिलांना या बँक खात्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला. या खात्याअंतर्गत खातेदाराला आपल्या बँक खात्यातून रक्कम काढण्यासाठी रूपे डेबिट कार्डची सुविधादेखील देण्यात आली. एकूण

**तक्ता क्र.१ : प्रधानमंत्री जनधन योजना लाभार्थ्यांची बँकनिहाय दि.१३/११/२०२४ पर्यंत स्थिती**

(आकडे कोटी)

| बँक प्रकार | ग्रामीण व अर्ध नागरी भागातील लाभार्थी संख्या | नागरी भागातील लाभार्थी संख्या | ग्रामीण नागरी भागातील महिला लाभार्थी संख्या | एकूण लाभार्थी | बँक खात्यात एकूण शिल्लक रक्कम | लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेली डेबिट कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक क्षेत्रातील बँका | २६.३९ | १५.६६ | २३.१७ | ४२.०५ | १८६३२७.०२ | ३१.८४ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ८.६४ | १.४५ | ५.८७ | १०.०९ | ४६१६४.१६ | ३.६५ |
| खाजगी क्षेत्रातील बँका | ०.७४ | ०.९३ | ०.९१ | १.६७ | ७१४२.६८ | १.३८ |
| ग्रामीण सहकारी बँका | ०.१९ | ०.०० | ०.१० | ०.१९ | ०.०१ | ०.०० |
| एकूण | ३५.९५ | १८.०४ | ३०.०५ | ५३.९९ | २३९६३३.८८ | ३६.८८ |

स्रोत - Department of Financial Services, Department of Finance, Government of India.

बँक खातेदारांपैकी (६८.३०%) बँक खातेधारकांना रूपे डेबिट कार्ड वितरित करण्यात आली.

तक्ता क्रमांक २ मध्ये भारतातील विविध राज्यांत व केंद्रशासित प्रदेशात या योजनेअंतर्गत उघडण्यात आलेली बँक बचत खाती दर्शवली आहेत. तसेच या योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील लोकांनी उघडलेली खाती, या खात्यांमध्ये शिल्लक असलेली एकूण व सरासरी रक्कम या खात्यांतर्गत दिलेली रूपे डेबिट कार्ड सुविधा याची स्थिती दर्शवली आहे. यात असे दिसून येते की, या योजनेअंतर्गत सर्वाधिक बँक खाती उत्तर प्रदेश या राज्यात उघडण्यात आली आहेत. वरील तक्त्यातील आकडे पाहिले असता असे दिसून येते की, या योजनेचा सर्वाधिक फायदा बीमारू स्टेट - Bihar, Madhya Pradesh, Rajasthan, Uttar Pradesh (BIMARU State)ना झाला आहे. एकूण बँक खात्यापैकी ४६% खाती केवळ या चार बीमारू राज्यात उघडण्यात आली. यावरून असे दिसून येते की, आजपर्यंत गरीब राज्यातील बहुतांश व्यक्ती वित्तीय प्रवाहाच्या बाहेर होत्या त्या वित्तीय प्रवाहात सामील झाल्या. यावरून असे दिसून येते की, मोदी सरकारचे जनधन योजनेच्या अंतर्गत समाजातील गरीब लोकांना वित्तीय प्रवाहात आणण्याचे जे उद्दिष्ट होते ते साध्य झाले. सरकारने शून्य रुपयावर या योजनेअंतर्गत बँक खाते उघडले असले तरी आजअखेर या खात्यांवर भरपूर रक्कम शिल्लक असलेली दिसून येते. सरासरी या बँक खात्यात ६८३० रुपये इतकी रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येते. देशातील लोकांना बचतीची सवय लागावी या उद्देशाने सरकारने ही योजना सुरू केली. सरकार या योजनेच्या उद्दिष्टात थोड्याफार प्रमाणात का होईना सफल झाल्याचे दिसून येते.

तक्ता क्रमांक ३ मध्ये भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत किती बचत खाती उघडली हे दर्शविले आहे. यामध्ये असे दिसून येते की, सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक

## तक्ता क्र.२ : प्रधानमंत्री जनधन योजनेची राज्य व केंद्रशासित प्रदेशातील स्थिती (१३/११/२०२४)

| राज्य व केंद्र शासित प्रदेश | ग्रामीण व अर्धनागरी भागातील लाभार्थी संख्या | नागरी भागातील लाभार्थी संख्या | एकूण लाभार्थी | बँक खात्यात एकूण शिल्लक रक्कम | लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेली डेबिट कार्ड | एकूण लाभार्थी मध्ये राज्य व केंद्रशासित प्रदेश याचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर प्रदेश | ६,९४,४९,९९४ | २,६८,५४,१४२ | ९,६३,०४,१३६ | ५०,४२०.५२ | ६,४४,७३,४७४ | १९.३२० |
| बिहार | ४,४२,६५,८६५ | १,७१,४६,३०९ | ६,१४,१२,१७४ | २३,२०४.७६ | ४,४२,१४,३५४ | १२.३१४ |
| पश्चिम बंगाल | ३,८९,४२,९०६ | १,३६,०६,८९८ | ५,२५,४९,८०४ | २३,६७६.४९ | ३,३४,१०,४७६ | १०.८३३ |
| मध्यप्रदेश | २,६९,३२,३७० | १,७४,११,२९८, | ४,४३,४३,६६८ | १४,९२१.४९ | ३,३०,३१,५०५ | ७.४९२ |
| राजस्थान | २,३४,०४,९२७ | १,२८,३६,९२९ | ३,६२,४१,८५६ | १८,९७५.५५ | २,६९,१७,५०५ | ६.५११ |
| महाराष्ट्र | १,९८,३८,५९९ | १,६२,५४,०१४ | ३,६०,५७,६१३ | १५,६०३.८९ | २,५२,२८,७७५ | ५.५०९ |
| आसाम | १,९१,८२,५८० | ५२,९५,६५० | २,४४,७८,२३० | ६,५७१.०१ | १,३७,६६,७५९ | ५.३३६ |
| ओडिसा | १,७६,२५,९९० | ४८,४३,८४४ | २,२४,६९,८३४ | ९,९९७.९६ | १,५८,५१,९५३ | ४.९०३ |
| झारखंड | १,५९,०३,२७५ | ३२,९२,४१४ | १,९१,९५,६८९ | ९,०००.०५ | १,३०,१८,२८६ | ४.४२४ |
| छत्तीसगढ | १,२६,३३,८३५ | ५३,७२,१७८ | १,८०,०६,०१३ | ७,७५६.१८ | १,०९,०३,४६९ | ३.५१५ |
| कर्नाटक | १,१५,६४,७१३ | ८१,८०,३०५ | १,९७,४५,०१८ | ९,४१६.९२ | १,२०,६१,३६६ | ३.२१७ |
| गुजरात | १,१३,३९,०९६ | ७६,३२,८६३ | १,८९,७१,९५९ | ९,९४४.३१ | १,४३,३८,४२० | ३.१५४ |
| तामिळनाडू | ८५,२०,२९९ | ७९,०८,७३१ | १,६४,२९,०३० | ५,५४७.६१ | १,१८,७६,९१९ | २.३७० |
| आंध्रप्रदेश | ८०,०१,५७६ | ७१,७४,५७२ | १,५१,७६,१४८ | ४,४३४.६१ | ९५,९७,४६२ | २.२२६ |
| तेलंगणा | ६८,७५,५३१ | ५२,९८,७५६ | १,२१,७४,२८७ | ४,३५०.०५ | ८७,८४,१३५ | १.९१३ |
| पंजाब | ५२,७३,५०६ | ४०,५६,४४५ | ९३,२९,९५१ | ४,६६३.५३ | ६६,०१,९२९ | १.४६७ |
| हरियाणा | ५१,८४,२२२ | ५०,८४,३२५ | १,०२,६८,५४७ | ६,६६९.१२१ | ७०,०३,२१३ | १.४४२ |
| केरळ | ३८,८०,५०४ | २६,३८,८१४ | ६५,१९,३१८ | २,९४०४५ | ३६,४१,०१४ | १.०८० |
| उत्तराखंड | २५,०३,९५० | १२,४२,४१० | ३७,४६,३६० | २,४८१.०५ | २५,०८,४३६ | ०.६९७ |
| जम्मू आणि काश्मीर | २०,५४,४५१ | ४,५४,३३२ | २५,०८,७८३ | १,६९२.९५ | १९,३६,०५७ | ०.५७२ |
| हिमाचल प्रदेश | १७,९१,१६६ | १,६१,१९३ | १९,५२,३५९ | १,५४१.८९ | १२,८३,४४६ | ०.४९८ |
| त्रिपुरा | ८,६९,७४४ | २,२१,४२६ | १०,९१,१७० | ६२२.५४ | ५,४०,८३४ | ०.२४२ |
| मेघालय | ७,३२,१६३ | ८४,५२६ | ८,१६,६८९ | ४५६ | ४,९४,९६५ | ०.२०४ |
| मणिपूर | ६,९३,५३६ | ४,१८,०९१ | ११,११,६२७ | २८६.३९ | ६,८७,५१८ | ०.१९३ |
| दिल्ली | ६,०३,५३६ | ५९,२३,८५९ | ६५,२७,२३२ | ३,१०९.१३ | ५०,०१,४९७ | ०.१६८ |
| अरुणाचल प्रदेश | ३,३०,५४१ | १,२८,२५६ | ४,५८,७९७ | २५०.०७ | ३,०८,१२३ | ०.०९२ |
| मिझोराम | २,४२,१९९ | १,६०,५५७ | ४,०२,७५६ | १८५.२ | १,७२,४६० | ०.०६७ |
| दादरान.ह.आणि दीवदमन | २,०८,६०४ | २८,१९९ | २,३६,८०३ | १६८.६१ | १,६४,५०४ | ०.०५८ |
| नागालंड | १,८८,९३२ | २,१४,८६७ | ४,०३,७९९ | १३४.३८ | ३,०२,५७३ | ०.०५३ |
| गोवा | १,७३,८५२ | ३६,४५८ | २,१०,३१० | १७७.२६ | १,४७,४५३ | ०.०४८ |
| पाँडेचरी | १,१६,३११ | ३६,४५८ | २,१०,३१० | ११०.०४ | १,५२,३०१ | ०.०३२ |
| सिक्कीम | ६२,३३६ | ३०,८४३ | ९३,१७९ | ५३.९३ | ६७,१८८ | ०.०१७ |
| अं. आणि नि. बेट | ४२,५६९ | १७,७२८ | ६०,२९७ | ३६.१५ | ३७,३१४ | ०.०१२ |
| छत्तीसगढ | ४६,२३६ | २,८६,३०० | ३,३२,५३६ | १९१.१२ | २,१३,७०८ | ०.०१३ |
| लडाख | १५,३७९ | ४,६६३ | २०,०४२ | २४.२७ | १५,६६१ | ०.००४ |
| लक्षद्वीप | ७,६११ | १,९९४ | ९,६०५ | १८.३८ | ७,६५२ | ०.००२ |
| **एकूण** | **३५,९४,६७,७४११** | **१८,०४,२०,२७६५** | **५३,९८,८८,०१७** | **२,३९,६३३.८८** | **३६,८७,६२,९०४** | **१००.०००** |

स्त्रोत - Department of Financial Services, Department of Finance , Government of India.

## तक्ता क्र. ३ : सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची प्रधानमंत्री जन धन योजनेची स्थिती

(१३ /११ /२०२४)

| बँकेचे नाव<br><br>संख्या | ग्रामीण व अर्धनागरी भागातील लाभार्थी (कोटी) (कोटी) | नागरी भागातील लाभार्थी संख्या | एकूण लाभार्थी (कोटी) | बँक खात्यात एकूण शिल्लक रक्कम डेबिट कार्ड | लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेली उघडण्यात (कोटी) | सार्वजनिक क्षेत्रातील एकूण बँकात बचत खाते<br><br>बँकेचा शेकडा वाटा |
|---|---|---|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ६२१५४८०८ | ८७१९१८८४ | १४९३४६६९२ | ५८६७५३०.९८ | १३०८४५४७० | ३५.५४ |
| बँक ऑफ इंडिया | ४४२८०१०९ | १९१९०६४९ | ६३४७०७५८ | ३२७१२१८.३८ | ५८२२२१२२ | १५.१० |
| पंजाब नँशनल बँक | ४४३८२९०२ | ८४८१५९२ | ५२८६४४९४ | २२४०११४.९८ | ३५७८५७३३ | १२.५८ |
| युनियन बँक ऑफ इंडिया | २३३१८८५६ | ७८१८२४१ | ३११३७०९७ | ११३६४१३.६८ | १३२४४१०० | ७.४१ |
| बँक ऑफ इंडिया | २३००२७८७ | ५०६५३५१ | २८०६८१३८ | १४१५४७४.८२ | २५०८१६७६ | ६.६८ |
| इंडिअन बँक | १८४३९७७७ | ४८५१८७१ | २३२९१६४८ | १०७६४८.०६ | १३१२६२१८ | ५.५४ |
| कॅनरा बँक | १४२४०४६९ | ५८१६३७७ | २००५६८४६ | १२०७८२२ | १२६८४३४८ | ४.७७ |
| सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया | १५८९२६७२ | २३९१०६८ | १८२८३७४० | ७१२३२२.६ | १०८८४८७३ | ४.३५ |
| युको बँक | ८४५३९२४ | ६२२५४२२ | १४६७९३४६ | ७९३०९५.१२ | ५१३३१८४ | ३.४९ |
| इंडिअन ओवरसीज बँक | २३८९२७३ | ६०६३७९१ | ८४५३०६४ | ३७१५१३.९१ | ७२०५९११ | २.०१ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ५६१५२८५ | २४३७७१४ | ८०५२९९९ | ४००३०१.५९ | ४३६७६२० | १.९२ |
| पंजाब आणि सिंद बँक | १५१६९३४ | १०१९९७५ | २५३६९०९ | ५१३२०.३९ | १६५३२७२ | ०.६० |
| **पब्लिक सेक्टर बँक्स एकूण आकडेवारी** | **२६३६८७७९६** | **१५६५५३९३५** | **४२०२४१७३१** | **१८५४३१७६.५९** | **३१८२३४५२७** | **१००.००** |

स्रोत- Department of Financial Services, Department of Finance , Government of India.

असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाने या योजनेअंतर्गत सर्वाधिक ३५.५४% बचत खाती उघडली आहेत. त्यानंतर बँक ऑफ इंडियाने १५.१०% तर पंजाब नॅशनल बँकेने १२.५८% बँक खाते उघडले आहेत. या योजनेअंतर्गत उघडलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील एकूण बँक खात्यांपैकी ६३ % बँक खाते की स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया आणि पंजाब नॅशनल बँकेने उघडली आहेत. या योजनेअंतर्गत बँक खाते उघडण्यात कमी वाटा (०.६० %) पंजाब आणि सिंध बँकेचा आहे.

तक्ता क्रमांक ४ मध्ये खाजगी क्षेत्रातील बँकांनी प्रधानमंत्री जनधन योजनाअंतर्गत किती बचत खाती उघडली याचे प्रमाण दर्शविले आहे. यामध्ये असे दिसून येते की, खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक असलेल्या आयसीआयसीआय बँकेने या योजनेअंतर्गत सर्वाधिक २७ % बचत खाते उघडले आहेत. त्यानंतर एचडीएफसी बँकेने एकूण बँक खात्याच्या २६.३४% बचत खाती उघडली आहेत. आयसीआयसीआय बँक व एचडीएफसी बँक या दोन्ही बँकांनी मिळून खाजगी क्षेत्रातील एकूण बँक खात्याच्या ५३% बँक खाती

**तक्ता क्र. ४ : खाजगी  क्षेत्रातील बँकांची प्रधानमंत्री जनधन योजनेची स्थिती (१३/११/२०२४)**

| बँकेचे नाव | ग्रामीण व अर्धनागरी भागातील लाभार्थी संख्या | नागरी भागातील लाभार्थी संख्या | एकूण लाभार्थी | बँक खात्यात एकूण शिल्लक रक्कम (रु) | लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेली डेबिट कार्ड | खाजगी क्षेत्रातील एकूण बँकात बचत खाते उघडण्यात बँकेचा शेकडा वाटा |
|---|---|---|---|---|---|---|
| आय. सी. आय. सी. आय. बँक | ३४९७६४८ | ९९४४६१ | ४४९२१०९ | ८२३२४.४ | ४४९२१०९ | २७.०० |
| एच. डी. एफ. सी. बँक लिमि. | ६२१३४३ | ३७६१५२७ | ४३८२८७० | २७३९९३ | ४३८२२२० | २६.३४ |
| आय. डी. बी. आय. बँक | २६६१४१ | १६१९८८२ | १८८६०२३ | ६२१७२.३ | ८७३४२० | ११.३४ |
| जम्मू आणि काश्मीर बँक लिमि. | १३७६५८८ | २०३८१३ | १५८०४०१ | १२२८३९ | १३७९६३८ | ९.५० |
| ॲक्सिस बँक लिमि. | २०१४१२ | ११५९७३६ | १३६११४८ | ७९९६४.९ | ८८७३४८ | ८.१८ |
| कोटक महिंद्र बँक लिमि. | ४०७६३५ | ५५१०४१ | ९५८६७६ | १३२७९.८ | ६२१३२१ | ५.७६ |
| फेडरल बँक लिमि. | ५७०६८६ | १३००१० | ७००६९६ | ३६६१५.१ | ३५१७४२ | ४.२१ |
| इंडसलंड बँक लिमि. | ३२६२५ | ३९८१६० | ४३०७८५ | १०५९७.५ | ५१३२४ | २.५९ |
| साउथ इंडिअन बँक लिमि. | ३३५१४ | २३१४४४ | २६४९५८ | १०३३१.२ | १७४९३५ | १.५९ |
| एस बँक लिमि. | १८४६९२ | ३९२३४ | २२३९२६ | २९७३.१७ | २२३९२६ | १.३५ |
| करुर व्यास बँक | १०९५५३ | ६३१४४ | १७२६९७ | २९०७.७६ | १७०८३६ | १.०४ |
| आर. बी. एल. बँक लिमि. | ६४०५२ | ३९३६४ | १०३४१६ | १५५१.५१ | १०३४१६ | ०.६२ |
| सिटी युनियन बँक लिमि. | ८८४७ | ७००९५ | ७८९४२ | १७२७.९७ | ७१६८२ | ०.४७ |
| **एकूण** | **७३७४७३६** | **९२६१९११** | **१६६३६६४७** | **७०१२७८** | **१३७८३९१७** | **१००.००** |

स्रोत - Department of Financial Services, Department of F9inance, Government of India.

**तक्ता क्र. ५ : प्रादेशिक ग्रामीण बँकांची प्रधानमंत्री जनधन योजनेची स्थिती (१३/११/२०२४)**

| बँकेचे नाव | ग्रामीण व अर्धनागरी भागातील लाभार्थी संख्या | नागरी भागातील लाभार्थी संख्या | एकूण लाभार्थी | बँक खात्यात एकूण शिल्लक रक्कम | लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेली डेबिट कार्ड | प्रादेशिक ग्रामीण बँकातील एकूण बँकात बचत खाते उघडण्यात बँकेचा शेकडा वाटा |
|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब नशनल बँक | २१२७७७७० | २७५३४९९ | २४०३१२६९ | १०७९१७४.६६ | ६०८४७८९ | २३.८४ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १९८८६६१० | ३३८१७६० | २३२६८३७० | १०४२९९४.३८ | ६३६८३०० | २३.०९ |
| बँक ऑफ बरोदा | १६८९२९४८ | ४६००८८३ | २१४९३८३१ | ११६२०३१.५१ | १०१९०१८५ | २१.३३ |
| बँक ऑफ इंडिया | ९८८८८६५ | ५२७४८३ | १०४१६३४८ | ३५२८१७.८९ | ५०८६०५५ | १०.३४ |
| कॅनरा बँक | ६७५४८१९ | २११४८२० | ८८६९६३९ | ४५७५७१.७१ | ३४८६७६९ | ८.८० |
| सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया | ४२३३१०६ | २००२४२ | ४४३३३४८ | १४८५८९.७३ | २६६८५६० | ४.४० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | २८४९२२५ | १०२४६९ | २९५१६९४ | १४८५८९.७१ | ११३९८८७ | २.९३ |
| इंडिअन ओवरसीज बँक | १६८६६५८ | १६२७८६ | १८४९४४४ | ९९५७२.०१ | ६६४६९७ | १.८४ |
| इंडिअन बँक | ११९२७९५ | ३८५२०८ | १५७८००३ | ३०७८३.२३ | ४१३५५० | १.५७ |
| युको बँक | ११५२५५६ | १७१३१० | १३२३८६६ | ५८१८८.६२ | ४९५५३ | १.३१ |
| जम्मू आणि काश्मीर बँक लिमि. | २३३९८२ | ५८२४३ | २९२२२५ | १६८९२ .२३ | १९८२२२ | ०.२९ |
| युनियन बँक ऑफ इंडिया | २४४०९८ | ३०८३१ | २७४९२९ | ७५४३.७६ | १२३६३८ | ०.२७ |
| **एकूण** | **८६२९३४३२** | **१४४८९५३४** | **१००७८२९६६** | **४६०१८३८.४१** | **३६४७४२०५** | **१००.००** |

स्रोत - Department of Financial Services, Department of Finance , Government of India

उघडली आहेत.

तक्ता क्रमांक ५ मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकेने या योजनेअंतर्गत उघडलेल्या बँक खात्याची स्थिती दर्शवली आहे.

यामध्ये सर्वाधिक बँक खाती (२३.८४%) पंजाब नॅशनल बँकेने तर स्टेट बँक ऑफ इंडियाने २३.९% बँक खाती उघडली आहेत.

**प्रधानमंत्री जनधन योजनेच्या अंमलबजावणीतील आव्हाने -**

प्रधानमंत्री जनधन योजनेच्या अंमलबजावणीपासूनचा आजपर्यंतचा आढावा घेतला असता त्यामध्ये पुढील आव्हाने दिसून येतात.

**खाजगी क्षेत्रातील बँकांचा अल्प प्रतिसाद -** देशातील एकूण बँकिंग व्यवसायात खाजगी क्षेत्रातील बँकांचा सहभाग असूनही या योजनेअंतर्गत खाजगी क्षेत्रातील बँकांनी एकूण बँक खात्यांच्या केवळ (३.०९%) बँक खाती उघडली आहेत.

**ग्रामीण भागातील सहकारी क्षेत्रातील बँकांचा अल्प सहभाग -** प्रधानत्री जनधन योजने अंतर्गत जी एकूण बँक खाते उघडण्यात आली, त्यामध्ये ग्रामीण भागातील सहकारी बँकांचे प्रमाण केवळ (०.०१ %) आहे. ग्रामीण सहकारी बँका या गावपातळीवर कार्य करत असल्यामुळे या बँकांना सदर योजनेअंतर्गत बँक खाते उघडणे सोपे आहे.

**एकाच व्यक्तीची या योजनेअंतर्गत एकपेक्षा अधिक खाते असण्याची शक्यता -** प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत बँक खाते उघडत असताना सरकारने केवायसीमध्ये सवलत दिलेली असल्यामुळे या खात्याचे लाभ मिळवण्यासाठी एकाच व्यक्तीची एकपेक्षा अधिक बँक खाते असण्याची शक्यता आहे.

**रूपे डेबिट कार्डची कमी उपलब्धता -** तत्कालीन सरकारने योजना जाहीर करत असताना प्रत्येक खातेधारकाला रूपे डेबिट कार्ड देण्याचे आश्वासन दिले होते; परंतु दिनांक १३/११/२०२४ पर्यंत या योजनेअंतर्गत जेवढी बँक खाते उघडण्यात आली त्यापैकी केवळ ६८.३०% खातेधारकांना रूपे डेबिट कार्ड उपलब्ध करून दिली.

**ओव्हरड्राफ्ट सुविधा लाभ किती खातेधारकांना झाला याची जाहीर माहिती उपलब्ध नाही -** तत्कालीन सरकारने या योजनेअंतर्गत खातेधारकाला दहा हजार रुपयाची ओव्हरड्राफ्ट फॅसिलिटी लागू केली होती. परंतु प्रत्यक्षात या योजनेअंतर्गत उघडलेल्या किती खातेधारकांना किती रकमेची ओव्हरड्राफ्ट फॅसिलिटी दिली याची माहिती प्रधानमंत्री जनधन योजनेच्या वेबसाईटला उपलब्ध नाही.

**प्रधानमंत्री जनधन योजनेच्याबरोबरच वित्तीय समावेशनासाठीच्या ज्या इतर योजना होत्या त्याचा लाभ किती खातेधारकांना झाला याची खुली / जाहीर आकडेवारी प्रसिद्ध नाही -** प्रधानमंत्री जन धन योजना खाते, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, मुद्रा योजना, थेट लाभ हस्तांतरण या योजनेसाठी पात्र असणार होते. परंतु प्रत्यक्षात प्रधानमंत्री जनधन योजनेच्या किती लाभार्थ्यांनी वित्तीय समावेशनाच्या या इतर सुविधांचा लाभ घेतला याची जाहीर/खुली आकडेवारी प्रधानमंत्री जनधन योजनेच्या वेबसाईटला उपलब्ध नाही.

**प्रधानमंत्री जनधन योजनेच्या खातेधारकांना उपलब्ध माहितीचा अभाव -** प्रधानमंत्री जनधन योजनेच्या अंतर्गत खातेधारकांना अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत; परंतु बँकांकडून खातेधारकांना याची व्यवस्थित माहिती दिली जात नाही. त्यामुळे बरेचसे खातेधारक केवळ सरकारकडून मिळणारे थेट लाभ हस्तांतरण घेण्याकरता या खात्याचा वापर करतात.

**प्रधानमंत्री जनधन योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उपाययोजना -**

**खाजगी क्षेत्रातील बँकांनी सहकार्य करण्याची गरज -** नवीन आर्थिक धोरणानंतर खाजगी क्षेत्रातील बँकांचा प्रसार वाढल्याचे दिसून येते. परंतु खाजगी क्षेत्रातील बँका या नफा मिळवण्याच्या उद्देशाने कार्य करत असल्यामुळे या बँका अशी शून्य रकमेवर बँक बचत खाते उघडण्यास तयार होत नाहीत. तसेच बऱ्याचदा सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे बंधनकारक असते. त्यामुळे देखील व्यक्ती राष्ट्रीयकृत बँकेत बँक खाते उघडण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँकांमध्ये या योजनेअंतर्गत उघडलेल्या खात्यांचे प्रमाण कमी दिसते. सरकारने खाजगी क्षेत्रातील बँकांनाही सरकारी योजनेचे पैसे मिळवण्यासाठी वैधानिक धरले पाहिजे.

**ग्रामीण भागातील सहकारी बँकांचा सहभाग वाढवणे आवश्यक -** ग्रामीण भागात सहकारी बँका या समाजातील दुर्बल आणि वंचित घटकातील लोकांना

वित्तीय सुविधांचा पुरवठा करत असतात. परंतु प्रधानमंत्री जनधन योजनेच्या बाबतीत पाहिले असता असे दिसून येते की, या बँकांनी प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत नगण्य बँक खाते उघडलेली आहेत. ग्रामीण भागातील सहकारी बँकांनी अशी बँक खाते उघडण्यासाठी स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे.

**डुप्लिकेट बँक बचत खाते शोधणे व ती बंद करणे -** या योजनेअंतर्गत खाते उघडत असताना केवायसीची पूर्तता करण्यामध्ये सूट दिलेली असल्यामुळे एकाच व्यक्तीची लाभ मिळवण्यासाठी एकाधिक बँक खाते असण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे अशा बँक खात्यांची चौकशी करून ती बंद करणे आवश्यक आहे.

**रूपे डेबिट कार्डची सुविधा सर्व जनधन खातेधारकांना देणे आवश्यक -** तत्कालीन सरकारने योजना जाहीर केली त्यावेळेस या योजनेअंतर्गत बँक खाते उघडणाऱ्या सर्व खातेधारकांना रूपे डेबिट कार्डची सुविधा पुरवली जाईल असे घोषित केले होते. परंतु बँकांनी अद्याप केवळ ६८% खातेधारकांना ही सुविधा पुरविली आहे. जनधन योजनेच्या सर्व खातेधारकांना रूपे डेबिट कार्डची सुविधा मिळणे आवश्यक आहे. यामुळे या खातेधारकांना ऑनलाइन बँकिंग सुविधांचा लाभ घेता येणार आहे.

**ओव्हरड्राफ्ट फॅसिलिटीचा लाभ सर्व पात्र खातेधारकांना देणे आवश्यक -** तत्कालीन सरकारने जाहीर केल्यानुसार बँकांनी सर्व पात्र खातेधारकांना ओव्हरड्राफ्ट सुविधा पुरवणे बंधनकारक आहे व बँकांनी किती जनधन खातेधारकांना ओव्हरड्राफ्ट फॅसिलिटी दिली याची आकडेवारी प्रसिद्ध करणे गरजेचे आहे.

प्रधानमंत्री जनधन योजनेच्याबरोबरच वित्तीय समावेशनासाठीच्या ज्या इतर योजना होत्या त्याचा लाभ किती खातेधारकांना झाला याची खुली / जाहीर आकडेवारी प्रसिद्ध करणे गरजेचे - प्रधानमंत्री जनधन योजना खातेधारकांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, मुद्रा योजना, थेट लाभ हस्तांतरण याचा लाभ मिळणार होता. प्रत्यक्षात प्रधानमंत्री जनधन योजनेच्या किती लाभार्थ्यांनी वित्तीय समावेशनाच्या या इतर सुविधांचा लाभ घेतला त्याची जाहीर / खुली आकडेवारी प्रसिद्ध करणे गरजेचे आहे.

**प्रधानमंत्री जनधन योजनेच्या खातेधारकांना खात्याशी संबंधित योजनांची माहिती देणे गरजेचे** - प्रधानमंत्री जनधन योजनेच्या अंतर्गत खातेधारकांना अनेक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत; परंतु बँकांकडून खातेधारकांना याची व्यवस्थित माहिती दिली जात नाही त्यामुळे बरेचसे खातेधारक या सुविधांपासून वंचित राहातात. बँकांनी वित्तीय प्रशिक्षण कार्यक्रम घेऊन वेगवेगळ्या बँकिंग सुविधांची माहिती लोकांना देणे गरजेचे आहे.

**समारोप -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा सत्तेत आल्यानंतर १५ ऑगस्ट २०१४ रोजी प्रधानमंत्री जनधन योजनेची घोषणा केली. लगेच २८ ऑगस्ट २०१४ पासून या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात केली. या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात बचत खाती उघडण्यात आली. त्यामुळे सरकारच्या या अभियानाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली. योजनेच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीपर्यंत बँकेचे बचत खाते पोहोचवण्याचे उद्दिष्ट मोदी सरकारने ठेवले होते. सन २०१८ मध्ये मोदी सरकारने या योजनेचा विस्तार करून कुटुंबातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीचे बँकेत बचत खाते असावे असे उद्दिष्ट ठेवले. मोदी सरकारने वित्तीय समावेशनाचा पद्धतशीर कार्यक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. वित्तीय समावेशनाच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक प्रौढ व्यक्तीचे बँक खाते उघडण्यावर भर देण्यात आला. त्यानंतर या

योजनेचा विस्तार मुद्रा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, पैसे देवाणघेवाणीची सुलभ यंत्रणा असा करणार आहे. नरेंद्र मोदी सन २०१४ ते २०२९ देशाचे पंतप्रधान राहाणार आहेत. पंतप्रधान पदाचा एक प्रदीर्घ कालावधी त्यांना उपलब्ध होणार आहे. या योजनेची घोषणा करत असताना 'मेरा खाता भाग्यविधाता' अशी जी टॅग लाईन त्यांनी वापरली होती ती वित्तीय समावेशनाच्या प्रधानमंत्री जनधन योजनेच्या खात्याशी संबंधित विविध योजना प्रभावपणे राबवून वास्तवात येणे गरजेचे आहे. समाजातील वंचित घटकांना सहजासहजी व परवडणाऱ्या दरात विविध वित्तीय समावेशनाच्या योजना प्रत्यक्षात उपलब्ध झाल्या तरच देशाचा आर्थिक विकास सर्वसमावेशक होणार आहे. मोदी सरकार समाजातील दुर्बल घटकातील लोकांना वित्तीय समावेशनाच्या प्रक्रियेत सामावून घेईल, अशी लोकांची अपेक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- Dr. Rajeshwari M. Shettar, Pradhan Mantri Jan-Dhan Yojana: Issues and Challenges IOSR Journal of Business and Management (Volume 18, Issue 2.Ver. IV (Feb. 2016)
- Dr. Singh S., Pande J.C., ''Pradhan Mantri Jan-Dhan Yojana: A Giant Leaf towards Financial Inclusion'', International Journal of Research in Management and Business Studies. (2014)
- Guha S., "The role of Pradhan Mantri Jan-Dhan Yojana in Financial Inclusion-An Evaluative Study", GJRA-Global Journal for Research Analysis July, 2015
- Hussain A., "Pradhan Mantri Jan-Dhan Yojana: The most intensive Financia Inclusion scheme in India, International Journal of Core Engineering and Management (IJCEM) (2015)
- Kaur H., Singh S., "Pradhan Mantri Jan-Dhan Yojana (PMJDY): A Leap towards Financial Inclusion in India", International Journal of Emerging Research in management and Technology. (2015)
- Keshavamurthy H.R., "Pradhan Mantri Jan Dhan-Yojana -A Step towards Sab Ka Sath Sab Ka Vikas", Kurukshetra, MoRD, GOI, New Delhi, Vol. 62, October 2014
- Khan H. Report of the Working Group on Development Financial Institutions. Reserve Bank of India Report.
- Kumar V., Singh D., "PMJDY: A Conceptual Analysis and Inclusive Financing", International Journal of Innovative Social Science and Humanities Research. (2015)
- Leeladhar V. Taking Banking Services to the Common Man-Financial Inclusion. Reserve Bank of India Bulletin.(2006)
- Malligar I.,Bankapur B. "Performance of Pradhan Mantri Jan-Dhan Yojana", Indian Journal of Applied Research January, 2016
- Rangarajan C. The Committee on Financial Inclusion Reort Submitted to Reserve Bank of India. (2008)
- Sarma, M. Index of financial inclusion. Working paper Indian Council For Research On International Economic Relations.(2008)(No. 215)
- Shabna T.P., "Financial Inclusion: Concepts and Overview in Indian Context", Abhinav International Monthly Refereed Journal of Research in Management & amp; Technology, 3(6), 2014.


**संकेत स्थळ :**


- Pradhan Mantri Jan-Dhan Yojana | Department of Financial Services | Ministry of Finance 18/12/2024


◆

# झोपडपट्टीतील स्त्रियांची अवस्था : विशेष संदर्भ मराठवाडा

**वनिता केरुजी बनकर** †
**रोहिदास शेकू जाधव** ††

**प्रस्तावना**

औद्योगीकरणाच्या विकासाबरोबरच देशातील विविध सामाजिक समस्येतही वाढ होत असून, औद्योगिक वसाहतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. कारण औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढत गेल्या व त्यामुळे ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या संधीच्या शोधात शहरात स्थलांतरित होऊन त्या ठिकाणी वास्तव्य करून निवासाची गरज पूर्ण करू लागले. त्यातूनच झोपडपट्टीची निर्मिती झाली असल्याचे दिसून येते. झोपडपट्टीला भारतामध्ये विविध नगरात विविध नावाने ओळखले जाते. जसे, मुंबईमध्ये चाळ, कानपूरमध्ये आहाते, कोलकत्यामध्ये वस्ती, चेन्नईमध्ये चेरी, दिल्लीमध्ये कटरा, खान क्षेत्रामध्ये धोरण, तर बंगाल क्षेत्रामध्ये बॅरेक्स. झोपडपट्टीला जरी वेगवेगळ्या नावाने संबोधले जात असले तरी प्रत्येक ठिकाणच्या समस्या मात्र सारख्याच असल्याचे अभ्यासकांनी नमूद केले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

१. झोपडपट्टीची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
२. झोपडपट्टी निर्माण होण्यामागील कारणांचा शोध घेणे.
३. झोपडपट्टीतील महिलांच्या समस्यावर प्रकाश टाकणे.
४. झोपडपट्टीतील महिलांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या योजनांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला असून, प्राथमिक स्रोतामध्ये प्रश्नावली, प्रत्यक्ष मुलाखत या साधनांचा वापर करून झोपडपट्टीतील महिलांची माहिती संकलित करण्यात आली आहे, तर दुय्यमस्रोतांमध्ये प्रकाशित पुस्तके, साहित्य, वर्तमानपत्र, आंतरजाल इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**झोपडपट्टीची वैशिष्ट्ये**

१. झोपडपट्टी भागातील रस्ते, घरे आणि आजूबाजूचा परिसर अत्यंत मागास आणि दुर्लक्षित असतो.

† संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर. आजीव सभासद १७६३ मोबाईल नंबर - ७९७२५९६५१६, इ - मेल - vanitabankar3@gmail.com

†† संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर. आजीव सभासद १९५१ मोबाईल नंबर - ८८०६४४५९७७, इ - मेल - rohidasjsfi@gmail.com

२. झोपडपट्ट्यांमध्ये राहाणारे लोक अत्यंत प्रदूषित वातावरणात जीवन जगत असतात.
३. झोपडपट्टी भागात सामाजिक प्रदूषण, आरोग्यासाठी अतिशय हानिकारक परिसर, बांधकाम नियोजनाचा अभाव, या भागातील लोकांमध्ये शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात अभाव, घाणीचे साम्राज्य आणि शहरी आकर्षण इत्यादी घटकांचा मोठ्या प्रमाणात या ठिकाणी प्रादुर्भाव असल्याचे पाहावयास मिळते.

**झोपडपट्टी निर्माण होण्याची कारणे**

१) शेती उत्पन्नाची अनिश्चितता आणि लोकसंख्येतील मोठ्या प्रमाणातील वाढ आणि रोजगार संधीचा मोठ्या प्रमाणातील अभाव, शहरासाठी रोजगाराच्या संधीची कमतरता या कारणामुळे झोपडपट्टी निर्मितीस चालना मिळते.

२) वाढते नागरीकरण, नगररचना नियोजनाचा अभाव, राजकीय नेतृत्वाचा तथा निर्णयाचा क्षमतेचा अभाव, वाढती गरिबी आणि बेरोजगारीच्या जटील प्रश्नाकडे सरकार आणि समाजाचे टोकाचे दुर्लक्ष याही कारणाचा झोपडपट्टी निर्मितीच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

३) निवास व्यवस्थेच्या जागेचा अभाव आणि घरांच्या वाढत्या किंमती, जमिनीचे वाढते दर, कमी साक्षरतेचे प्रमाण, कामाच्या ठिकाणचे अंतर इत्यादी घटक झोपडपट्टी निर्माण होण्यास हातभार लावणारे घटक आहेत.

**केंद्र सरकारचा स्लम एरिया ॲक्ट १९५८**

थॉमस व क्वीन हे झोपडपट्टीला समाजासाठी रोगप्रस्थ असा पर्यायवाची शब्द वापरतात. केंद्र सरकारच्या स्लम एरिया ॲक्ट १९५८ नुसार झोपडपट्टी मुख्य रूपाने असे निवासी क्षेत्र आहे की, 'जेथे निवासस्थान नष्ट झालेले आहे किंवा अतिशय गर्दीमय झालेले आहे. त्याची डिझाईन त्रुटीपूर्ण झालेली आहे, सूर्यकिरणे प्रकाश व साफसफाईचा अभाव आहे. या कारणाच्या एकत्रित प्रभावाने सुरक्षा, सूर्यकिरणे, आरोग्य आणि नैतिकतेच्या दृष्टीने हानिकारक असे क्षेत्र म्हणजे झोपडपट्टी असे म्हटले गेले आहे.'

भारतातील झोपडपट्टीविषयक वास्तव समजून घेण्यासाठी काही आलेख तथा आकडेवारीचा आधार घेता येईल.


अशा प्रकारे भारतातील विविध राज्यांत झोपडपट्टीचे प्रमाण दिसून येते. यामध्ये अधिकचे झोपडपट्टीची संख्या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, तामिळनाडू, मध्यप्रदेश, कर्नाटक, राज्यस्थान व छत्तीसगड या राज्यांत दिसून येते.

तक्ता क्रमांक १ वरून असे दिसून येते की, मराठवाड्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांत झोपडपट्टीत वास्तव्यास असलेली लोकसंख्या पाहावयास मिळते. झोपडपट्टीमध्ये राहाणाऱ्या महिलांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १० लाख ७ हजार ३५० इतक्या महिला झोपडपट्टीत वास्तव्य करतात, तर त्या खालोखाल नांदेड जिल्ह्यात ६१ हजार २४८ महिला झोपडपट्टीत आपले जीवन कष्टदायक अवस्थेत व्यथित करतात. मराठवाड्यातील झोपडपट्टीतील महिला अत्यंत वाईट अवस्थेत जीवन व्यथित करतात. समाजात त्यांना अतिशय निकृष्ट दर्जाची वागणूक मिळते. घरातसुद्धा त्यांचा दर्जा दुय्यम असतो. असा दुय्यम दर्जा असलेल्या महिलांच्या आयुष्यात त्यांना भेडसावणाऱ्या काही समस्यांचा विचार आपणास पुढीलप्रमाणे करता येईल. यासाठी संशोधकांनी मराठवाड्यातील झोपडपट्टीतील ४०० महिलांच्या प्रत्यक्ष सर्व्हे केला असून त्याआधारे मांडणी केली आहे.

**शिक्षण**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हे सर्वात महत्त्वाचे साधन मानले जाते. शिक्षण केवळ व्यक्तीचे व्यक्तिमत्त्वच विकसित करीत नाही, तर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासात मोलाची भूमिका

**आलेख क्र. १ : झोपडपट्टीतून वास्तव्य करणारी सर्वाधिक लोकसंख्येची राज्य.**




स्त्रोत- भारतातील झोपडपट्टीची जनगणना, २०१७.

**तक्ता क्र. १ : मराठवाड्यातील झोपडपट्टीत वास्तव्य करणारी लोकसंख्या**

| जिल्हा | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | ११३६५१ | १०७३५० | २२१००१ |
| जालना | ५३७२१ | ५१४२२ | १०५१४३ |
| लातूर | ४४२७० | ४१८६९ | ८६१३९ |
| धाराशीव | १८५८८ | १७५४३ | ३६१३१ |
| बीड | ४९९९७ | ४६६८४ | ९६६८१ |
| हिंगोली | १९२३२ | १८५४९ | ३७७८१ |
| नांदेड | ६५०७८ | ६१२४८ | १२६३२६ |
| परभणी | ३८००१ | ३७५४४ | ७५५४५ |

स्त्रोत : भारतातील झोपडपट्टीतील जनगणना, २०१७.

बजावते. शिक्षणामुळे स्त्रीची आरोग्य आणि आरोग्य जागरूकता वाढते. यामुळे तिच्या जोडीदाराची आणि कुटुंबाचीसुद्धा आरोग्यविषयक समज विकसित होते. स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि प्रगत प्रशिक्षणाच्या स्तरावर पुढे जाण्यामुळे लैंगिक क्रियाकलाप, पहिले लग्न आणि पहिले बाळंतपण विलंब होऊ शकतो. महिलांच्या आरोग्यासाठी देखील महिलांचे शिक्षण महत्त्वाचे आहे, लैंगिक संक्रमित संसर्ग कमी करताना गर्भनिरोधक वापर वाढवणे आणि घटस्फोट घेणाऱ्या किंवा घरगुती हिंसाचाराच्या परिस्थितीत असलेल्या महिलांसाठी उपलब्ध संसाधनांची पातळी वाढवणे. शिक्षण महिलांचा भागीदार आणि नियोक्त्यांसोबतचा संवाद सुधारतो.

शिक्षणाच्या अभावामुळे याउलटची परिस्थिती निर्माण होते. झोपडपट्टीतील महिलांच्या शिक्षणाची अवस्था अत्यंत वाईट आहे. मुलीच्या शिक्षणाकडे म्हणावे तसे लक्ष दिले जात नाही. मुळात शिक्षणाचे महत्त्व कमी, त्यातही लक्ष दिलेच तर मुलींपेक्षा मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष अधिक असल्याचे दिसून येते. मुलगी ही घर कामासाठी योग्य आहे अशी झोपडपट्टीतील महिलांची व पुरुषांची धारणा आहे. झोपडपट्टीतील महिला या फक्त शाळेत जाऊन सही शिकतात. त्यांना फारसे लिहिता-वाचता येत नसल्याचेच प्रत्यक्ष निरीक्षणावरून स्पष्ट होते. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण तक्ता क्रमांक २ वरून अधिक चांगले स्पष्ट होऊ शकेल.

**तक्ता क्र. २ : मराठवाड्यातील झोपडपट्टी विभागातील महिलांचे शिक्षणाचे प्रमाण**

| **शिक्षण** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अक्षर ओळख नसलेले (निरक्षर) | ६१ | १५.२ |
| प्राथमिक शिक्षण | २७४ | ६८.५ |
| माध्यमिक शिक्षण | ३४ | ८.५ |
| उच्च माध्यमिक शिक्षण | १५ | ३.८ |
| पदवी | १३ | ३.२ |
| पदव्युत्तर | ३ | ०.८ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

स्रोत - प्राथमिक स्रोत.

उपरोक्त तक्ता क्रमांक २ वरून स्पष्ट होते की, कर्तृत्वावर कमी आणि नशिबावर अधिक विश्वास ठेवणाऱ्या असल्याचे दिसून येते. उपवास करणे, जत्रेला जाणे, नवस बोलणे इत्यादी गोष्टी त्या करतात. त्यांचा जादूटोणा अशा भ्रामक बाबींवर विश्वास असल्याचे दिसते. प्रत्यक्ष सर्व्हेतील १५.२% झोपडपट्टीतील महिला अक्षरओळख नसलेल्या तर ६८.२% महिला या केवळ प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आहेत. म्हणजेच जवळपास मराठवाडा विभागातील झोपडपट्टीतील ८४% महिला या फक्त प्राथमिक शिक्षणाची पायरी चढलेल्या किंवा निरक्षर आहेत. माध्यमिक शिक्षण झालेल्यांचे प्रमाण ८.५% इतके असून, उच्च माध्यमिक ३.८% इतके कमी आहे. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या संदर्भात याठिकाणी अत्यंत दयनीय अवस्था असून पदवीपर्यंत शिक्षण झालेल्यांचे प्रमाण केवळ ३.२% इतके आहे. तर पदव्युत्तर शिक्षणाविषयी कोणताही गंध नसल्याचेच स्पष्ट होते. पदव्युत्तर शिक्षण आत्मसात करणाऱ्या महिलांचे प्रमाण ०.८% इतके नगण्य आहे. या आकडेवारीच्याआधारे आपणास असे म्हणता येऊ शकते की, झोपडपट्टीतील महिलांच्या शिक्षणास कशी उतरती कळा लागली असून, शिक्षणाचा अभाव हेच झोपडपट्टीतील महिलांच्या अधोगतीचे व मागासलेपणाचे सर्वात गंभीर कारण असावे. झोपडपट्टीतील महिला अशिक्षित किंवा कमी शिकलेल्या असल्यामुळे त्या मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धाळू असतात असं म्हणालो तर चुकीचे ठरणार नाही.

### दारिद्र्य

दारिद्र्याच्या संदर्भात अनेक अर्थतज्ज्ञांनी / विचारवंतांनी विविध व्याख्या केलेल्या आहेत. त्या आपण अभ्यासल्याही आहेत. परंतु ढोबळमानाने वैयक्तिक स्तरावरील अपुऱ्या उत्पन्नाच्या स्तराला दारिद्र्य म्हणतात. अन्न, वस्त्र व निवारा या किमान गरजांची

पूर्तता करण्यास दरिद्री व्यक्ती आर्थिक दृष्टीने असमर्थ असते. महिलांना पुरुषांच्या तुलनेत दारिद्र्यात जगण्याची शक्यता जास्त आहे. यामागचे काही कारणांचा विचार करता येईल. एक म्हणजे लैंगिक असमानता ही जगातील सर्वात जुनी आणि व्यापक असमानता आहे. यामुळे महिलांचा आवाज नाकारला जातो आणि त्यांच्या कामाचे अवमूल्यन केले जाते. दुसरे असे की, महिलांना सर्वात जास्त पगार नसलेल्या ठिकाणच्या कामाचा आणि घरगुती कामाचा फटका सहन करावा लागतो.

**अनौपचारिक नोकऱ्या**

महिलांना अनौपचारिक आणि अनिश्चित नोकऱ्यांमध्ये काम करावे लागते. आणखीन म्हणजे गरिबीमुळे महिलांना सामाजिक आणि सांस्कृतिक बहिष्काराचा सामना करावा लागतो. या अनुषंगाने विचार केला असता झोपडपट्टीतील महिला अत्यंत गरीब अवस्थेत जीवन जगत असल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणातून दिसून आले आहे. जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा या अत्यावश्यक गरजासुद्धा त्यांना पूर्ण करणे शक्य होत नाही. झोपडपट्टीतील महिलांच्या दारिद्र्यामागील महत्त्वाचे कारण म्हणून आपणास शिक्षणाचा अभाव याबाबींचा उल्लेख करावा लागेल. शिक्षणाअभावी योग्य कामाच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे त्यांना घरातील मोलकरणीची कामे किंवा एखाद्या हॉस्पिटल, कारखाना किंवा एखाद्या खाजगी कार्यालयात साफसफाईची उपलब्ध होणारी कामे करावी लागतात. अशा स्वरूपाच्या कामातून कुटुंबाच्या गरजा भागवणे कठीण होऊन जाते. असे प्रत्यक्ष निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे.

प्राप्त होणारी मिळकत व कौटुंबिक गरजांवर होणारा खर्च यामध्ये काहीएक मेळ बसत नसल्याचे भावना अनेक महिलांनी व्यक्त केली आहे. उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, झोपडपट्टीतील महिला अत्यंत दारिद्र्य अवस्थेत जीवन जगत आहेत. त्याच्या पगारातून त्याच्या कौटुंबिक गरजासुद्धा पूर्ण होत नाहीत. तक्ता क्रमांक तीन मधील आकडेवारीवरून प्राप्त होणाऱ्या उत्पनातून कौटुंबिक गरजांची पूर्तता होते असं मत व्यक्त करणाऱ्या महिलांचे प्रमाण केवळ ५% इतके अल्प असून, प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून गरजांची पूर्तता होत नाही. असं स्पष्ट मत नोंदवणाऱ्या महिलांचे प्रमाण ९५% इतके अधिक आहे.

**महिलांवरील अत्याचाराचे स्वरूप**

झोपडपट्टीतील महिलांच्या घरात व बाहेर असलेला निकृष्ट दर्जा हा त्यांची एकूणच परिस्थितीवर भाष्य करतो. झोपडपट्टीतील स्त्रियांना घरामध्ये निकृष्ट स्वरूपाची वागणूक दिली जाते. त्यांना हिनतेची, अपमानजनक वागणूक दिली जाते. झोपडपट्टीतील महिलांवर घरांमध्ये अत्याचार होतात. या अत्याचारामध्ये बलात्कार, शारीरिक हिंसा व मानसिक त्रास अशा प्रकारे त्यांच्यावर अत्याचार केला जातो. झोपडपट्टीतील कुटुंबांमध्ये महिलांचे मत विचारात घेतले जात नाही. महिलांना काहीच समजत नाही आणि त्यांची मते ही योग्य नसतात अशा प्रकारचा समज झोपडपट्टीतील पुरुषांमध्ये दिसून येतो. झोपडपट्टीतील बहुतेक पुरुष व्यसनी असतात व व्यसन करून महिलांवर विविध पातळीवर अत्याचार करतात. मराठवाड्यातील झोपडपट्टीतील ४०० महिलांचा प्रत्यक्ष सर्व्हे करताना महिलांना प्रश्न विचारला की तुमच्यावर कोणत्या प्रकारचा आत्याचार तुमचे पती किंवा घरातील पुरुष तुमच्यावर करतात. त्यांनी दिलेल्या उत्तराचे वर्णन तक्ता क्रमांक ४ मध्ये केले आहे.

सामाजिक विषमता ही जात, धर्म आणि लिंग या तीन घटकांवर आधारित आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले आहे. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे अशी पारंपारिक, प्रतिगामी मानसिकता आहे. स्त्रियांना शिक्षण, सत्ता, संपत्तीचे सारे अधिकार नाकारण्यात आले होते. धार्मिक कायद्यांचा आधार घेऊन स्त्रियांवर अधिकाधिक बंधने

**तक्ता क्र. ३ : प्राप्त उत्पन्नातून कुटुंबाच्या गरजा पूर्ण होतात का?**

| कौटुंबिक गरजांची स्थिती | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| कौटुंबिक गरजा पूर्ण होतात | २० | ५ |
| कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत | ३८० | ९५ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

स्रोत -प्राथमिक स्रोत.

लादली गेली. भारतीय संविधानाच्या निर्मितीनंतर यावर काहीअंशी पायबंध लावण्यात आला असला, तरी झोपडपट्टीतील महिलांना मात्र अनेक अत्याचारांचा सामना करावा लागतो. झोपडपट्टीतील महिलांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे जीवन जगावे लागत असून, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराला कुणीही वाली नाही असेच म्हणावे लागेल. झोपडपट्टीतील महिलांवर बलात्कार होण्याचे प्रमाण १७.२% इतके अधिक असून लैंगिक हिंसाचार ३३.२% महिलांवर होतो. बलात्कार आणि लैंगिक अत्याचार या दोन्ही घटकांचा एकत्रित विचार केला तर ५०.४% इतके भरते. म्हणजेच झोपडपट्टीतील अर्ध्याहून अधिक महिला या बलात्कार आणि लैंगिक

**तक्ता क्र. ४ : मराठवाड्यातील झोपडपट्टीतील महिलांवर घरात होणारे अत्याचार**

| घरात महिलांवर होणारे अत्याचार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| बलात्कार | ६९ | १७.२ |
| लैंगिक हिंसाचार | १३३ | ३३.२ |
| शारीरिक हिंसाचार | १७२ | ४३ |
| मानसिक त्रास | २६ | ६.५ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

स्रोत - प्राथमिक स्रोत.

अत्याचाराच्या बळी ठरलेल्या आहेत असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. शारीरिक हिंसाचारचे प्रमाण ४३% तर मानसिक त्रासाला सामोरे जाणाऱ्या महिलांचे प्रमाण ६.५% इतके आहे. यावरून आपणास स्पष्टपणे म्हणता येते की, झोपडपट्टीतील महिला खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जीवन जगत आहेत काय?

### आवश्यक सोयीसुविधांचा अभाव

झोपडपट्टी हे एक क्षेत्र आहे. ज्यामध्ये इमारतींची खराब भौतिक स्थिती, अस्वच्छ परिस्थितीमध्ये खराब झालेले वातावरण आणि वीज, पिण्यायोग्य पाणी, ड्रेनेज सिस्टम, शाळा, आरोग्यसुविधा आणि मनोरंजनाची मैदाने यांसारख्या मूलभूत आणि आवश्यक सुविधांचा अभाव आहे. झोपडपट्ट्यांचे वर्णन निकृष्ट गृहनिर्माण वातावरण म्हणून केले जाऊ शकते. इमारतींचे नैसर्गिक वृद्धत्व, देखभालीचा अभाव आणि दुर्लक्ष, इमारतींचा चुकीचा वापर, सांडपाणी आणि घनकचऱ्याच्या विल्हेवाटीत अस्वच्छता, जमिनीचा चुकीचा विकास आणि नैसर्गिक लँडस्केपचा वाढता ऱ्हास या सर्वांच्या एकत्रित परिणामांमुळे झोपडपट्टीची परिस्थिती उद्‌भवते. झोपडपट्टीतील महिला या अत्यंत वाईट वातावरणात आपले जीवन व्यथित करतात. झोपडपट्टीत नाल्या, गटारी नसतात. व्यवस्थित व कायम टिकणारी

वीज नसते, संडास बाथरूम नसते, महिला शैचास बाहेर उघड्यावर जातात. गटाराचे पाणी रस्त्यावर जमा होते. कचराकुंड्यांचा अभाव असल्यामुळे रस्त्यावर - घरासमोर कचरा सर्वत्र पसरलेला दिसतो. यामुळे एकूणच परिसर स्वच्छतेच्या बाबतीतील चित्र विदारक स्वरूपाचेच असल्याचे पाहावयास मिळते.

**महिलांचे आरोग्य**

झोपडपट्टीतील महिला या बहुतेक निरक्षर व कमी शिकलेल्या असल्यामुळे त्यांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याचेही ज्ञान त्यांच्याकडे नाही. या महिला कष्टाची कामे करतात; परंतु आपल्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करतात. मानसिक, शारीरिक त्रास असल्यामुळे झोपडपट्टीतील महिलांचे आरोग्य खालावते. झोपडपट्टीतील महिलांना आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. झोपडपट्टीत राहाणाऱ्या महिलांना आजार, जखम आणि अकाली मृत्यू होण्याची शक्यता जास्त असते. झोपडपट्ट्यांमध्ये कुपोषण मोठ्या प्रमाणावर असते, ज्यामुळे मुले आणि प्रौढ दोघांवरही परिणाम होतो. शौचालये उपलब्ध नसल्यामुळे महिलांना खुल्या जागेत प्रातविधी करावा लागतो, ज्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होतो. शहरी झोपडपट्ट्यांमध्ये अतिसार, श्वसन संक्रमण आणि त्वचारोग यांसारखे सामान्य आजार होतात. योग्य सांडपाणी व्यवस्था आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचा अभाव या समस्यांना आणखी वाढवतो. झोपडपट्टीतील महिलांना टीबी, ॲनिमिया, मानसिक आजाराला सामोरे जावे लागते.

**काही महत्त्वाच्या सरकारी योजना**

सरकारने महिलांना चांगले व पक्के घर बांधून देण्यासाठी योजना सुरू केल्या आहेत. त्यापैकी वाल्मिकी आंबेडकर आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, लोक आवास योजना इत्यादी. या योजनेचा फायदा झोपडपट्टीतील ज्या महिलांना/कुटुंबीयांना झाला त्यांना चांगली व पक्की घरे मिळाली आहेत. त्यामुळे त्यांचा किमान निवास व्यवस्थेचा प्रश्न निकाली निघाला आहे.

याबरोबरच महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण, महिलांसाठी स्वयंरोजगार योजना, मुली दत्तक योजना, शहरात महिला सक्षमीकरण केंद्राची स्थापना, महिला स्वरक्षण, विधवा अनुदान, महिलांसाठी पायलट इनक्युबॅशन सेंटरची स्थापना, महिलांसाठी उद्योजकता विकास शिबिर, व्यावसायिक प्रशिक्षण योजना, कन्यारत्न योजना, बालविकास केंद्र, अशा प्रकारे विविध योजना सरकार झोपडपट्टीतील महिलांच्या पुनर्वसनासाठी किंवा झोपडपट्टीतील महिलांना सक्षम करण्यासाठी राबवत आहे. यामुळे झोपडपट्टीतील महिलांच्या निकृष्ट परिस्थितीत नक्कीच काही पातळीवर सकारात्मक बदल झाल्याचे पाहावयास मिळते.

उपरोक्त विश्लेषणाच्याआधारे आपणास स्पष्टपणे असे म्हणता येते की, झोपडपट्टीतील महिलांच्या एकूणच उन्नतीच्या दृष्टीने अनेक पातळीवर काम करणे आवश्यक आहे. समाज म्हणून आपला त्यांच्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. आपण याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणार आहोत का? हा खरा प्रश्न आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१) कांबळे अर्चना आर., 'पंचायतीराजमधील महिला नेतृत्व : एक समाजशास्त्रीय अभ्यास', पीएच.डी. प्रबंध, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक १५

२) पाटील उषा, 'परितक्त्या स्त्रिया आणि वास्तव', अक्षरदीप प्रकाशन, पुणे, २०१२, पृष्ठ क्रमांक ११

३) शर्मीन शादिया आणि लुना फरहानाझ, 'झोपडपट्टीतील महिलाची सामाजिक - आर्थिक परिस्थिती', जर्नल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्स, २०१५, खंड, पृ.२८

४) सांख्यिकी संकलन, गृहनिर्माण आणि शहरी गरिबी निर्मूलन मंत्रालय, नॅशनल बिल्डिंग ऑर्गनायझेशन, भारत सरकार, नवी दिल्ली, २०११, पृष्ठ क्रमांक ४५,४६


◆

# सामाजिक संरचना आरोग्य आणि शिक्षण

**हरिभाऊ सामा खरात** †
**स्नेहल नितेश जाधव** ††

**प्रस्तावना**

मानवाच्या ज्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजा मानल्या जातात. यापैकीच तितक्याच महत्त्वाच्या गरजा म्हणजे आरोग्य आणि शिक्षण होय. खरं तर, आपण शिक्षण, आरोग्य यांनाच सामाजिक गरजादेखील संबोधू शकतो. देशाच्या विकासाच्या वाटचालीचा विचार करताना आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय विकासाबरोबरच सामाजिक विकासदेखील तितकाच महत्त्वाचा मानला जातो. आर्थिक वाढ आणि विकास या निरंतर प्रक्रिया आहेत. आर्थिक वाढ होण्यासाठी मानवी भांडवल, ज्ञान आणि कौशल्य यांचा सुयोग्य वापर करून भांडवलनिर्मिती, गुंतवणूक, चलनवाढ, परकीय गुंतवणूक ही माध्यमे योजावी लागतात. आर्थिक विकासासाठी मात्र रोजगार सुविधा, आरोग्य, शिक्षण, दारिद्र्य निर्मूलन, सामाजिक न्याय देणारी बृहतलक्ष्यी धोरणे राबवावी लागतात.

आर्थिक संसाधने राष्ट्राची उत्पादनक्षमता सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात, तर सामाजिक संसाधने ही मानवी साधनसंपत्ती गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक ठरतात. देशातील लोक म्हणजे राष्ट्राची मानवी साधन संपत्ती होय. यात शिक्षण, आरोग्यसेवा इत्यादींचा समावेश होतो. ते अर्थव्यवस्थेतील मानवी संसाधनांच्या विकासाला सहाय्यक ठरतात. 'विकास हे अर्थव्यवस्थेने राबवायचे सर्वांत महत्त्वाचे बृहतलक्ष्यी धोरण आहे', असे आर्थर लेविस यांनी म्हटले. म्हणून लेविस यांना 'विकास अर्थशास्त्राचा जनक' असे म्हणतात. 'समावेशक विकास' हा शब्द भारतात ११व्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात उल्लेखिलेल्या 'गतिशील व समावेशक विकास' या उद्दिष्टापासून जास्त वापरात आला. सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये येणारी क्षेत्रे - उत्पादन प्रक्रियेस अप्रत्यक्षपणे मदत करतात. उदा. शिक्षणामुळे शिक्षित - प्रशिक्षित समाज, तर आरोग्यसेवांमुळे आरोग्यवान समाज निर्माण झाल्यास लोकांची उत्पादकता व कार्यक्षमता अधिक असते.

**उद्दिष्ट्ये**

१. सामाजिक संरचनेतील आरोग्यक्षेत्राच्या वास्तविकतेचा आणि आव्हानांचा अभ्यास करणे.

२. सामाजिक संरचनेतील शिक्षण क्षेत्राच्या

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
आजीव सभासद क्र.: १९२३ भ्रमणध्वनी क्रमांक : ९५९४४७६०४८ ई-मेल :- kharathari33@gmail.com.
†† संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
आजीव सभासद क्रमांक : २०९४ भ्रमणध्वनी क्रमांक : ९७०२३११६५० ई-मेल : jadhavsnehal794@gmail.com

वास्तविकतेचा आणि आव्हानांचा अभ्यास करणे.

**सामाजिक संरचनेतील आरोग्य :**

मानवप्राणी जन्मत:च स्वतंत्र असून प्रत्येकाला प्रतिष्ठित जीवन जगण्याचा हक्क आहे. हा एक नैतिक दृष्टिकोन आहे. मानवी हक्कांचा विकास हळूहळू होत गेला. आज आपण ज्याला मानवी हक्क म्हणतो ते अतिशय नि:संदिग्ध स्वरूपाचे आहेत. राष्ट्रीय सरकारे व आंतरराष्ट्रीय संस्था यांनी मानवी हक्कासंबंधी कायदे बनवले आहेत. १० डिसेंबर, १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र संघाने 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा' संमत व स्वीकृत केला. मानवाधिकाराच्या वैश्विक घोषणेला भारतासकट ४८ देशांनी संमती दर्शविली. तेव्हापासून १० डिसेंबर हा दिवस संपूर्ण जगभर 'मानवी हक्क दिन' म्हणून साजरा केला जातो. एखादा व्यक्ती जसा त्याच्या संगतीवरून ओळखला जातो, तसाच एखादा देश त्याच्या नागरिकांना प्रदान करत असलेल्या हक्कांवरून ओळखला जातो. प्रत्येक व्यक्तीला भेदभाव न करता 'उच्च आरोग्याची पातळी गाठून आयुष्य जगण्याचा मूलभूत हक्क आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या सरनाम्यानुसार प्रत्येक व्यक्तीला 'आरोग्याचा हक्क' आहे. जगातील सर्व अर्थव्यवस्था व जागतिक आरोग्य संघटना यांचं मुख्य ध्येय २००० पर्यंत 'सर्वांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या लाभकारक ठरेल असे आरोग्यसंपन्न जीवन देणे' असे होते. यामध्ये 'लोकांना आरोग्यसेवा पुरविणे ही राष्ट्राची जबाबदारी आहे आणि लोकांच्या आरोग्याच्या गरजा व सेवा या लोकांच्याच म्हणजेच सार्वजनिक नियंत्रणात असल्या पाहिजेत. जागतिक शांततेसाठी तसेच शाश्वत विकासासाठी सर्वांचे आरोग्य महत्त्वाचे आहे आणि सर्वांना आरोग्य मिळण्यासाठी आर्थिक व सामाजिक विकास होणे आवश्यक आहे. साधारणत: सन २०२०-२१ मध्ये कोरोना या अदृश्य विषाणूनेने संपूर्ण जगभर थैमान घातले होते. संपूर्ण जगभर अशांतता निर्माण झाली होती.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार आरोग्य म्हणजे ''शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या पूर्णत: स्वस्थता होय. फक्त निरोगी असणे नव्हे'' म्हणजे केवळ शारीरिक रोगापासून मुक्तता नव्हे, तर ती व्यक्ती मानसिक व सामाजिकदृष्ट्यादेखील स्वस्थ, सदृढ असली पाहिजे. मानव साधनसंपत्तीच्या गुणवत्तेत आरोग्य महत्त्वाचा घटक आहे. लोकसंख्या निरोगी असेल तर लोकसंख्येतील पुरवले जाणारे श्रमिक उत्पादनाच्या दृष्टीने कार्यक्षम ठरतील. उत्तम आरोग्यासाठी उत्तम आहाराचीसुद्धा आवश्यकता असते. आहारावर व्यक्तीचे राहणीमान, जीवनमान व विकास अवलंबून असतो. मानवाची कार्यक्षमता ही पूर्णपणे आरोग्यावर, आहारावर अवलंबून असते. माणसाची जर कार्यक्षमता चांगली असेल तर राष्ट्रीय उत्पन्न वाढून देशाचा विकास व वृद्धीही होते. म्हणूनच आरोग्य हा मानवी विकासाचा 'आत्मा' आहे असे म्हटले जाते. खरं तर, चांगल्या आरोग्यासाठी दोन गोष्टी आवश्यक असतात. एक म्हणजे योग्य संतुलित पोषक आहार आणि दुसरे म्हणजे वैद्यकीय सुविधा. थोडक्यात, व्यक्तीला एका दिवसात आहारामध्ये २४०० कॅलरी मिळणे आवश्यक असते. जर पोषक आहार उपलब्ध होत असेल तर व्यक्ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम राहातो. 'आरोग्य हीच संपत्ती' ही म्हण सर्वार्थाने योग्य आहे.

भारतात १९४३ मध्ये 'आरोग्य सर्वेक्षण व विकास समिती' श्री.जोसेफ भोर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. या समितीने 'आरोग्यसेवा देणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा विकास करण्यात यावा', अशी महत्त्वपूर्ण शिफारस करण्यात आली. भारतातील प्राथमिक आरोग्य सेवांमध्ये प्रतिबंधात्मक, प्रोत्साहनात्मक आणि उपचारात्मक सेवांचा समावेश होतो. प्राथमिक आरोग्यसेवा यंत्रणेचे वर्गीकरण ग्रामीण आणि शहरी असे करता येते. आरोग्यसेवा देणाऱ्या प्राथमिक आरोग्यकेंद्राची वास्तविकता पाहिली असता, त्या आरोग्य

केंद्रामध्ये सेवा-सुविधांचा अभाव दिसून येतो. यामध्ये प्रामुख्याने तज्ज्ञ डॉक्टरांचा अभाव, मुबलक प्रमाणात औषधांचा तुटवडा, अत्याधुनिक सेवांचा अभाव इत्यादी.

भारतात १९८३ मध्ये पहिले राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर करण्यात आले. जागतिक स्तरावर होत असलेल्या सार्वजनिक आरोग्यक्षेत्रातील सुधारणांना विचारात घेऊन भारताच्या आरोग्य धोरणात सुधारणा करण्यात आल्या. प्रामुख्याने या धोरणात सार्वजनिक आरोग्य, रोगप्रतिबंध, लोकसहभाग व जनजागृती यावर अधिक भर देण्यात आला. सर्वांना आरोग्य सुविधा देणे व आरोग्य सेवेचे वैश्विकरण करणे या उद्देशाने २००२ मध्ये दुसरे राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर २००० मधील राष्ट्रीय लोकसंख्या धोरण व त्याचे तातडीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी २००२ मधील राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर करण्यात आले होते. या धोरणानुसार आरोग्यावर जीडीपीच्या ५.२% खर्च होत होता. तो २०१० पर्यंत ६% करण्याची शिफारस करण्यात आली. या धोरणानुसार सरकारी खर्चापैकी ३३% खर्च (केंद्र २५% + ८%) आरोग्यावर करण्याची शिफारस करण्यात आली होती. १२ एप्रिल, २००५ ला राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू करण्यात आले होते. या अभियानात 'आशा स्वयंसेविका' हा महत्त्वाचा घटक आहे. आशा स्वयंसेविकांच्या निरंतर प्रशिक्षण व कौशल्य विकासास सर्वाधिक प्राधान्य दिले जाते.

सन २०१७ मध्ये तिसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात दर्जेदार वैश्विक आरोग्य सेवेचा स्वीकार करण्यात आला. या धोरणाची 'समानता, वैश्विक उपलब्धतता, रुग्णकेंद्रित उच्चप्रतिची आरोग्यसेवा, समावेशक भागीदारी, बहुविध आरोग्य सेवा, विकेंद्रीकरण, जबाबदारी व परवडण्याजोगी आरोग्यसेवा' ही तत्त्वे आहेत. सन २०१८-१९ मध्ये सुरू करण्यात आलेली 'आयुष्मान भारत' योजना. प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक स्तरावरील सेवांचा विकास करणे असा योजनेचा मुख्य उद्देश होता.

राष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने देखील आरोग्याचे महत्त्व आहे. मानवी विकासाच्या दृष्टीने आरोग्यसंदर्भातल्या पायाभूत संरचनांचा विकास महत्त्वाचा असून लोकसंख्येच्या मानवी विकासातील आरोग्यसुविधा एक महत्त्वाचा निर्देशांक आहे. 'सार्वजनिक आरोग्य' हा देशाच्या सर्वांगीण विकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारत आरोग्य व्यवस्थेच्या बाबतीत काही प्रमाणात यशस्वी झाला. पण काही बाबतीत भारतात आरोग्ययंत्रणा कोलमडलेली दिसून येते. आजही भारतीय आरोग्याची व्यवस्था असमान व खर्चिक आहे. शहरी व ग्रामीण अशी तफावत आरोग्यसेवेच्या उपलब्धतेसंदर्भात आढळून येते. भारतातील प्राथमिक स्तरावरील आरोग्ययंत्रणापुढे अपुरी डॉक्टरांची संख्या, अपुरा कर्मचारी वर्ग, अपुऱ्या प्रमाणातील वैद्यकीय उपकरणे व औषधे या महत्त्वाच्या समस्या दिसून येतात. सार्वजनिक स्वच्छता हा सार्वजनिक आरोग्यातील एक महत्त्वाचा घटक आहे. आजही भारतात सार्वजनिक स्वच्छतेची स्थिती चांगली नाही. भारतात अजूनही 'सर्वांना स्वच्छ पिण्याचे पाणी' हा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी झाला नाही व त्यामुळे त्याचा परिणाम भारताच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर होताना दिसून येत आहे. कुपोषणाची समस्या तीव्र असून कुपोषणासाठी आर्थिक कारणांबरोबरच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अपुरेपणा हे देखील महत्त्वाचे कारण आहे. भारताच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये लोकसहभाग पुरेशा प्रमाणात नसल्याने सार्वजनिक आरोग्य कार्यक्रम व कुटुंबकल्याण यांना पुरेशी यशप्राप्ती झाली नाही. आजही सार्वजनिक रुग्णालयांमध्ये कायमस्वरूपी डॉक्टरांची, आवश्यक मनुष्यबळाची पुरेशा वेतनावर भरती न करता हंगामी तत्त्वावर भरती करून कामकाज पाहिले जाते, अशा प्रकारची वास्तवता आणि

आव्हाने आरोग्यक्षेत्रात दिसून येतात.

**सामाजिक संरचनेतील शिक्षण :**

शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले जाते. शिक्षणामुळे समाजात शांतीयुक्त क्रांती निर्माण होते. शिक्षण ही आर्थिक व सामाजिक विकासाची पूर्वअट आहे. शिक्षण म्हणजे बाहेर काढणे, प्रशिक्षण देणे, नेतृत्व करणे. मानवाधिकाराच्या वैश्विक घोषणेतील २६ वे कलम शिक्षणासंबंधित आहे. भारतात २००२ मध्ये ८६व्या घटनादुरुस्ती कायद्याने भारतीय राज्यघटनेत २१-अ हे हक्काचे कलम टाकण्यात आले. '६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क' देण्यात आला. या कलमाला अनुसरून २००९ मध्ये शिक्षणहक्काचा कायदा करण्यात येऊन १ एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला. शिक्षण हक्काची प्रभावी अंमलबजावणी भारतीयांना विकासाचा हक्क प्राप्त करून देण्यात आला. रोजगार आणि दारिद्र्य निर्मूलनानंतर आर्थिक समावेशनात सर्वांत महत्त्वाची भूमिका बजावणारा विषय म्हणजे शिक्षण. 'शिक्षण' ही शांतता व सामाजिक विकासाची गुरुकिल्ली आहे', अशी व्याख्या युनिसेफने केली. समाजपरिवर्तनाचे हुकमी हत्यार म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीच विद्यमान आहे, त्याचे प्रकटीकरण होय. अशा विविध संकल्पना आपण अभ्यासल्या आहेत. भारतीय शिक्षण पद्धतीवर इंग्रज आणि त्यांनी स्थापन केलेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध आयोगांच्या शिफारशींनी मोठा प्रभाव टाकला आहे. याची सुरुवात वूडसच्या खलित्याने होते. या खलित्याला भारतातील पाश्चिमात्त्य तथा इंग्रजी शिक्षणाची सनद असे म्हटले जाते. १४ जुलै, १९६४ ला 'शिक्षण आयोग' डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. यालाच 'कोठारी आयोग' या नावाने संबोधले जाते. या आयोगाने शिक्षणात माणूस आणि समाज बदलण्याची तीव्र क्षमता आहे, शिक्षण हे राष्ट्रीय उत्पन्नवाढीचे आणि म्हणून उत्पादनाचे प्रमुख साधन आहे. शिक्षण आधुनिकीकरणास हातभार लावते. विद्यार्थ्यांमधील सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्ये जपणारी राष्ट्रीय शिक्षणव्यवस्था असावी, अशा महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या.

कोठारी आयोगाच्या शिफारशी लागू करून शिक्षणयंत्रणेत सुधारणा करण्यासाठी १९६८ मध्ये पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर केले. राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक व आर्थिक विकास आणि शिक्षणाची शीघ्र पुनर्रचना करणे या धोरणांचा उद्देश होता. या धोरणानुसार भारतीय शिक्षण पद्धतीत १०+२+३ या आकृतीबंधाची संरचना करण्यात आली. समाजबदलाचे महत्त्वाचे अस्त्र म्हणून माध्यमिक शिक्षणाकडे बघितले पाहिजे. या धोरणात राष्ट्राने जीडीपीच्या ६% खर्च शिक्षणावर करण्याचा उच्चार केला होता. पहिल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अनुसरून एनसीईआरटीने १९७५ मध्ये पहिली राष्ट्रीय पाठ्यक्रम रचना प्रकाशित केली. शालेय अभ्यासक्रमातील त्रुटी शोधून त्यावर उपाय सुचविण्याच्या उद्देशाने श्री. ईश्वरभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली जून १९७७ मध्ये राष्ट्रीय आढावा समिती स्थापन करण्यात आली. शिक्षण हा विषय भारतीय राज्यघटनेतील राज्यसूचीतून क्रमांक २५ वर टाकण्यात आला. या विषयाचा उल्लेख 'शिक्षण' असा आहे. केंद्रस्तरावर राष्ट्रीय शिक्षणयंत्रणा, एकीकृत शिक्षण व शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी नियोजन करता यावे, या उद्देशाने ही सुधारणा करण्यात आली.

पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण व त्यायोगे शिक्षण प्रक्रियेत झालेले बदल यांचा आढावा घेऊन नवीन मूल्य रुजविणारे हे दुसरे राष्ट्रीय धोरण मे १९८६ मध्ये जाहीर केले. शिक्षणाने विषमता दूर करून शिक्षणाची समान संधी प्राप्त करून देणे, शिक्षणव्यवस्थेची शीघ्र पुनर्रचना करून विज्ञान व तंत्रज्ञानास सर्वाधिक महत्त्व

द्यावे, नैतिकमूल्ये रुजवावीत आणि शिक्षण व लोकांच्या जीवनात जवळीक निर्माण करावी. शिक्षक प्रशिक्षण व अभिमुखता कार्यक्रमांवर भर दिला पाहिजे. यासाठी जिल्हास्तरावर प्रशिक्षण देणाऱ्या 'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था' स्थापन करण्यास प्रारंभ झाला. या धोरणामुळे मुक्त विद्यापीठ स्थापन करण्यास सुरुवात झाली. या आधीच १९८५ मध्ये 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची' स्थापन करण्यात आली होती. या धोरणानुसार १९८५-८६ मध्ये नवोदय विद्यालये स्थापण्यास प्रारंभ झाला. सन १९८७-८८ मध्ये खडू-फळा मोहीम सुरू झाली. या धोरणाचा आढावा घेण्यासाठी १९९० मध्ये आचार्य राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. १९९१ मध्ये शिक्षण सल्लागार मंडळाने जनार्दन रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली नवीन धोरण जाहीर करण्यासाठी एक समिती स्थापन केली. याच अनुषंगाने १९९२ मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण कृती आराखडा तयार करण्यात आला. २०००-२००१ पासून सर्व शिक्षा अभियान कार्यरत झाले. 'स्कूल चले हम' या गीताने या अभियानाचा शुभारंभ झाला. २००० मध्ये संयुक्त राष्ट्संघाने २०१५ मध्ये गाठण्यासाठी जे सहस्रक विकास ध्येय (MDGs) ठरविली होती त्यातील दुसऱ्या क्रमांकाचे MDGs 'वैश्विक प्राथमिक शिक्षण' गाठण्याच्या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले. भारतातील ज्ञानाचा साठा आणि त्याचे उपयोजन यांचे संशोधन व संकलन करण्यासाठी व त्यात सुधारणा सुचविण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांनी सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली १३ जून, २००५ ला राष्ट्रीय ज्ञान आयोग स्थापन केला. या आयोगाने शिफारशी सुचविताना ज्ञानाधारित पाच मुख्य क्षेत्रे सांगितली, ती म्हणजे ज्ञानापर्यंत पोहोच, ज्ञान संकल्पना, ज्ञाननिर्मिती, ज्ञानाचे उपयोजन आणि सेवाप्रदानता होय. संपूर्ण देशभर १ एप्रिल, २०१० पासून शिक्षणहक्क कायदा लागू केला. मानव संसाधन विकासमंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांच्या २४ मे २०१८ रोजी समग्र शिक्षा अभियानाचे अनावरण करण्यात आले. 'समावेशक व न्याय्य असे दर्जेदार शिक्षण देऊन सर्वांना आयुष्यभर शिकता येईल अशा संधी निर्माण करणे', हे शाश्वत विकास ध्येयातील चौथ्या ध्येयाच्या पूर्तीसाठी हे अभियान सुरू करण्यात आले.

बदलत्या लोकसंख्येसाठी दर्जेदार शिक्षण, संशोधन, नावीन्यता पुरविणे तसेच विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योगांसाठी कुशल आणि जाणकार विद्यार्थी घडविणे या उद्देशाने केंद्र शासनाने नवीन शिक्षण धोरण जाहीर करण्याचे ठरविले. २९ जुलै, २०२० प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय धोरणाला अर्थात तिसऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिली. खरं तर, हे २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण होय. या धोरणाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे मानव संसाधन विकास मंत्रालयाचे नामकरण 'शिक्षण मंत्रालय' करण्यात आले. या धोरणात राज्य आणि केंद्राचा शिक्षणावरील सार्वजनिक खर्च जीडीपीच्या ६% पर्यंत वाढविण्यात येईल. प्रामुख्याने शिक्षणाचा आकृतीबंध ५+३+३+४ असा करण्यात आला. सन २०४० पर्यंत भारतीय शिक्षणयंत्रणेला जगात सर्वोत्तम बनविणे, उच्चप्रतिचे, न्याय्य व समावेशक शिक्षण देणे, भारतीय परंपरा व मूल्यांचा आदर २१व्या शतकाला आवश्यक असणारी शैक्षणिक आदाने पुरविणे, २०३० चे SDGs - ४ ध्येय - समावेशक व न्याय्य असे दर्जेदार शिक्षण देऊन सर्वांना आयुष्यभर शिकता येईल अशा संधी निर्माण करणे. या ध्येयाच्या पूर्तीसाठी आणि ज्ञानाधारित शाश्वत भारताची निर्मिती करणे ही या धोरणाची प्रमुख ध्येय मानली जातात.

जागतिकीकरणामुळे शिक्षणात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून येत आहेत. तंत्रज्ञान आणि शिक्षण संरचनामध्ये वेगाने विकास घडून येत आहे. जगभराच्या शिक्षण पद्धतीतील ज्ञान, मूल्य आणि विचारात परिवर्तन

घडून येत आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या भूमिका बदलत आहे. औद्योगिक समाज ते माहिती आधारित समाज अशी वाटचाल दिसून येत आहे. शिक्षणाची भूमिका जागतिक स्पर्धेशी निगडित बनली आहे. आज भारत गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण देण्याच्या सातत्यपूर्ण वाटचाल करत आहे. शैक्षणिक धोरणांची ध्येयदेखील स्पष्ट आहेत. 'शाळा' हे अधिकृत शिक्षणाचे प्रवेशद्वार आहे. शाळेकडे निघालेली मुले बघून एक आश्वासन मिळाल्यासारखे वाटते. कोणत्याही देशाचे भवितव्य त्या देशाच्या वर्गखोल्यांमध्ये घडते. अशी दोन निरीक्षणे कोठारी आयोगाने नोंदविली होती. पण आज वास्तवता काय? आजच्या तरुण पिढीबद्दल खूप काही बोललं जातं - ते काय?

ज्ञानाची ओढ नाही, अज्ञानाची जाणीव नाही, विज्ञानाची आवड नाही. बोलण्यात सभ्यता नाही, वागण्यात शिष्टाचार नाही, विचारांना व्यापकता नाही. वाचनाची आवड नाही, लेखनाला सवड नाही, टेलिफोनशिवाय बोलणं नाही, मोबाईलशिवाय चालणं नाही, बाईकशिवाय हालणं नाही 'हे कसलं जिणं'

सद्य परिस्थितीवर नजर फिरवली तर वरील परिस्थिती काहीअंशी प्रत्ययास येते. आज खऱ्या अर्थाने शिक्षणातील गुणवत्ता काही प्रमाणात घसरत असल्याचे दिसून येते. शांततादायी, प्रसन्नदायी आणि आनंददायी वातावरणाचा अभाव बहुतांश शैक्षणिक संकुलांमध्ये दिसून येतो. आज दिवसेंदिवस वाढत चाललेले शिक्षणाचे खाजगीकरण, शिक्षणाकडे काही मंडळी व्यावसायिकरण चक्षुतून पाहातात. नागरिकांमधील शिक्षणाबद्दलचा बदलता दृष्टिकोन, विद्यार्थी-शिक्षक यांमधील संबंध, पारंपारिक आणि व्यावसायिक शिक्षणातील विविध अभ्यासक्रमाचे वाढते प्रवेश शुल्क, पालकांना न परवडणारे प्रवेश शुल्क, खाजगी कोचिंग क्लासेचे वाढते वर्चस्व, खाजगी शिक्षण संस्थामध्ये शिक्षकांना दिले जाणारे तुटपुंज्य मानधन अशा असंख्य प्रकारची वास्तवता आणि आव्हाने दिसून येतात.

शिक्षण हे बदलत्या स्वरूपाचे असते. विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक विकास इत्यादी सर्व घटकांवर शिक्षणाचा दर्जा अवलंबून असतो. शिक्षण हे सर्व प्रकारच्या बदलांचे कारण व परिणाम असते. मानवी संसाधन विकासामध्ये शिक्षण हा घटक जास्त महत्त्वाचा आहे. कारण शिक्षणामुळे लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा वाढतो. शिक्षणाने जगाचा विस्तार होतो. गुणवत्तेचा विकास होतो. सुजाण व जबाबादार लोकांची निर्मिती होते. समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतात. थोडक्यात, मानव संसाधन विकासामध्ये 'आरोग्य' आणि 'शिक्षण' हे दोन्ही घटक अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जातात. विकसित भारत - २०४७ च्या स्वप्नपूर्तीसाठी या दोन्ही घटकांचा जलद गतीने गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार विकास होणे आवश्यक आहे. यासाठी नागरिक आणि शासन या दोन्ही घटकांनी अविरतपणे कार्यरत राहाणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) देसले किरण जी. - आर्थिक आणि सामाजिक विकास - दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव - सातवी आवृत्ती, मे - २०२१.

२) देशपांडे ज्योत्स्ना - विकासाचे अर्थशास्त्र - पिंपळापुरे अँड पब्लिशर्स, नागपूर, पहिली आवृत्ती, जुलै - २०११.

३) जाधव तुकाराम - सामान्य अध्ययन -, द युनिक अकॅडमी, पुणे, जानेवारी - २००८.

४) कानपिळे श्रीहरी का. - मनशक्ती - प्रमोद सी. शिंदे (विश्वस्त), लोणावळा- संच ३७, पाठ ३, मार्च - २०२२.

५) कोहली रीना सोनोवाल - योजना - वर्ष ३९! अंक २! सप्टेंबर२०११.

६) कोळंबे रंजन - भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे - सुधारित चौदावी आवृत्ती, जानेवारी

- २०२२.

७) पाटील दिनकर - जीवन शिक्षण - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, वर्ष ६४! अंक ४ था! जुलै, २०२०.

८) साबडे भा. र. - विकल्पवेध - वर्ष ११! अंक १! १६ ते ३१ जानेवारी, २०११.

९) सोनटक्के विठ्ठल - प्रा. देवराम मनवर, आर्थिक वृद्धी आणि विकास - शेठ पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती, जून - २०१४.

10) Sanghamitra Pati1, Kavya Sharma2, Sanjay Zodpey2, Kavita Chauhan2 & Madhumita Dobe3 Health Promotion Education in India : Present Landscape and Future Vistas Global Journal of Health Science ; Vol. 4, No. 4; 2012 ISSN 1916-9736 E-ISSN 1916-9744 Published by Canadian Center of Science and Education.

◆

---

विकासाला मानवाधिकाराचा मुद्दा म्हणून पाहिले पाहिजे केवळ सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा प्रयत्न म्हणून नव्हे.

**- मुहम्मद युनुस**

---

लोक मुर्ख किंवा आळशी असल्यामुळे गरिब नव्हते, दिवसभर कष्ट?? शारिरिक काम करून सुद्धा गरिब होते कारण देशातील वित्तीय संस्थांनी लोकांच्या अर्थिक पायाची व्याप्ती वाढविण्यास मदत केली नाही.

**- मुहम्मद युनुस**

---

तुम्ही जर अशा गोष्टींवर खर्च करत असाल ज्याची तुम्हाला गरज नाही, तर लवकरच तुम्हाला गरज असलेल्या गोष्टी विकाव्या लागतील

**- वॉरेन बफे**

---

# महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीच्या अहवालाचे मूल्यमापनः एक टिपण

**केशव नागोराव देशमुख** †
**राणी नवनाथराव पावडे** ††

समतोल प्रादेशिक विकास म्हणजे एखाद्या देशातील किंवा राज्यातील सर्व प्रदेशांचा/विभागांचा समान विकास करणे होय. यामुळे देशातील किंवा राज्यातील असमानता दूर होऊन, सर्व प्रदेशांतील रहिवाशांना एकसमान दराने चांगले जीवनमान मिळते. ज्या देशामध्ये किंवा राज्यामध्ये किंवा विभागांमध्ये संसाधने, संपत्ती, विकास आणि संधी यांचे असमान वितरण असते. तसेच विशिष्ट प्रदेशांमध्ये उद्योग, रोजगाराच्या संधी आणि संपत्ती यांचे केंद्रीकरण असते, यामुळे असमान विकास होत असतो. परिणामस्वरूप विविध आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक दुष्परिणाम दिसून येतात. हे दुष्परिणाम दूर करावयाचे असतील तर संसाधनांची कमतरता असलेल्या प्रदेशात विशेष लक्ष केंद्रित करावे लागते. याकरिता आरोग्य, शिक्षण व कौशल्य, कृषी व सिंचन, उद्योग, पायाभूत सुविधा इ. क्षेत्रांमध्ये अविकसितपणा असल्याने त्यासाठी अधिकची आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. त्यास 'अनुशेष' ह्या शब्दाचा प्रयोग केला जातो. 'अनुशेष' म्हणजे पूर्ण करणे आवश्यक असलेल्या कामाचा उभार किंवा साठा होय. 'अनुशेष' म्हणजे विशिष्ट मुदतीपर्यंत पूर्ण न झालेली कामे, कामाच्या वस्तू किंवा जबाबदाऱ्यांचा संचय, अशी दुसरी व्याख्या करता येईल.

महाराष्ट्राचा समतोल प्रादेशिक विकास साध्य करणे हे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून महत्त्वाच्या ध्येयधोरणापैकी एक धोरण आहे. मराठवाडा प्रदेश हा पूर्वीच्या हैद्राबाद राज्याचा एक भाग होता आणि तो निजामाच्या राजवटीखाली होता. भारत सरकारच्या 'पोलीस ॲक्शन'नंतर दि. १७ सप्टेंबर, १९४८ रोजी हा प्रदेश मुक्त झाला. संयुक्त मराठी राज्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीचे वाढते आंदोलन आणि स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीस होणारा विरोध लक्षात घेता विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील नेत्यांनी दि. २८ सप्टेंबर, १९५३ रोजी एक करार केला, त्यास 'नागपूर करार' असे म्हटले जाते.

या करारानुसार पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी विदर्भ व मराठवाड्यातील राजकीय नेते, कार्यकर्ते व जनतेला

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आजीव सभासद क्र.: २०८५, भ्रमणध्वनी क्रमांक : ९९२२३२६५०९, ई-मेल : keshdeshi84@rediffmail.com
†† संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र अधिविभाग, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आजीव सभासद क्र. : १९३६, भ्रमणध्वनी क्रमांक : ९११२४२५६०२, ई-मेल : ranipawde1@gmail.com

त्यांच्या विकासाबाबत हमी देण्यात आली होती. विदर्भ व मराठवाड्यावर विकाससंदर्भात कोणताही अन्याय होऊ दिला जाणार नाही. त्यांच्या समतोल व सुनियोजित विकासासाठी या विभागांना लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान, शैक्षणिक सुविधा व नोकऱ्या दिल्या जातील, असे आश्वासन देण्यात आले होते.

मराठवाडा व विदर्भ या प्रदेशाचा अनुशेष दूर करून त्यांचा समतोल आर्थिक विकास साध्य करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने आजपर्यंत विविध स्तरावर अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये प्रामुख्याने सन १९८३ मध्ये प्रा. व्ही. एम. दांडेकर व प्रा. निलकंठ रथ या दोन अर्थतज्ज्ञांचा समावेश असलेली 'प्रादेशिक असमतोल सत्यशोधन समिती' स्थापन केली होती. महाराष्ट्र शासनाने या समितीचा अहवाल स्वीकारला नाही. त्यानंतर स्वतंत्र विदर्भाची मागणी पुन्हा जोर धरू लागल्यामुळे भारताच्या राष्ट्रपतींनी, महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालाची विशेष जबाबदारी) आदेश, असा वर्णन करणारा आदेश काढून संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशासाठी विकास मंडळे स्थापन करण्याची विशेष जबाबदारी मा.राज्यपालांकडे सोपविली. त्यास अनुसरून महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी दि. ३० एप्रिल, १९९४ रोजी तीन विकास मंडळे स्थापित करून त्यांची कार्येही विशद केली होती.

त्यानंतर महाराष्ट्रामध्ये मागासलेपणाची व्याप्ती व अनुशेषाची सद्यस्थिती ठरविण्यासाठी राज्यपालांनी 'निर्देशांक व अनुशेष समिती' नेमली. सदर समितीचा अहवाल १९९७ मध्ये आला. सदर समितीच्या अहवालावर आक्षेप घेण्यात आल्यामुळे मा. राज्यपालांनी पुनर्घटित केलेल्या समितीने आपला अंतिम अहवाल दि. २७ सप्टेंबर, २००० रोजी शासनास सादर केला. सदरचा अहवाल राज्यपाल व शासनाने स्वीकारला. ह्या समितीच्या शिफारशीवरील मा. राज्यपालांची निरीक्षणे विचारात घेऊन मा. राज्यपाल महोदयांनी समतोल प्रादेशिक विकासाच्या मुद्याचा आढावा घेण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती स्थापित करण्याचा निर्णय घेतला. तिला केळकर समिती या नावाने ओळखली जाते.

मराठवाड्याचा अनुशेष महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांनी 'अनुशेष आणि विकास खर्चाचे' समान वितरणाच्या नव्या दृष्टीने विचार करून साधनसंपत्तीचे समन्यायतेने नियत वाटप होईल याची खात्री करून देणारे पर्यायी मार्ग शोधणे अत्यावश्यक आहे, म्हणून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीनही प्रदेशातील विविध क्षेत्रांतील विद्यमान स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या समस्या लक्षात घेण्यासाठी आणि सर्व संबंधितांची मते विचारात घेऊन संतुलित प्रादेशिक विकासाच्या मुद्यावर लक्ष देण्यासाठी आणि खर्चाच्या समान न्यायवाटपासाठी समुचित नियत वाटपांची तत्त्वे सूचित करण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठीत करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार श्री. विजय केळकर, तेराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली इतर १३ सदस्य असलेली उच्चस्तर समिती दि.३१.०५.२०११ रोजी स्थापित करण्यात आली आहे.

सदरील उच्चस्तरीय समितीने आपली कार्यपद्धती स्वतः ठरवून खालील कार्यकक्षेच्या अधीन एका वर्षाच्या आत अहवाल सादर करावयाचा होता.

१) विकासातील क्षेत्रीय असमतोलाचा अंदाज घेण्यासाठी Indicators ठरविणे.

२) वरील १ बाबत सन-२०१० अखेर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल निश्चित करणे. हे करीत असताना राज्य शासनाची थेट गुंतवणूक / खर्च आणि राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने

खाजगीने औद्योगिक क्षेत्रात झालेली गुंतवणूक याचा विचार करणे.

३) निश्चित केलेल्या Indicators पैकी प्राधान्याने कोणत्या Indicator वर कार्यवाही होऊ शकेल, याची मर्यादा ठरविणे.

४) निश्चित होणारा असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व त्याअनुषंगाने विकासात्मक निधीच्या आवंटनाचे सूत्र ठरविणे. तसेच भविष्यात पुन्हा असमतोल निर्माण होऊ नये म्हणून उपाय सुचविणे. त्याअनुषंगाने वैधानिक विकास मंडळाच्या भूमिकेबाबत सूचना करणे.

सदरील समितीला शासनाकडून तीन वेळा मुदतवाढ मिळाली होती. दि. ९ व १० नोव्हेंबर, २०११ रोजी समितीने औरंगाबाद येथे विभागीय मुख्यालयास भेट दिली. सदर समितीने बहुजन हिताय या तत्त्वावर, म्हणजेच कोणतेही मानधन न घेता अथक काम करून माहे ऑक्टोबर २०१३ मध्ये आपला अहवाल शासनास सादर केला होता. समितीचा मूळ अहवाल इंग्रजी भाषेत असून त्याचा मराठी अनुवाद भाषा संचालनालयाने केला आहे. या समितीने महाराष्ट्राचा समतोल आर्थिक विकास साध्य करण्यासाठी अनेक शिफारशी केल्या आहेत. या अहवालात 'अनुशेष' हा शब्दप्रयोग करण्याऐवजी 'प्रादेशिक असमतोल' ह्या शब्दाचा वापर केला आहे. श्री. केळकर यांच्या मते, 'अनुशेष' हा शब्द Accounting Concept आहे. या समितीने केलेल्या एकूण १४६ शिफारशींपैकी येथे मराठवाड्याचा समतोल विकास साध्य करून अनुशेष दूर करण्यासाठी प्रामुख्याने खालील शिफारशी विचार करण्यात आला आहे.

१) समितीने संसाधनांचे वाटप योजनाबद्ध पद्धतीने सुचविले आहे. अनुसूचित जाती उपयोजना आणि अनुसूचित जमाती उपयोजना या क्षेत्रांसाठी राखून ठेवलेले वाटप वगळून पुढील ८ वर्षांकरिता सर्वसाधारण क्षेत्र आणि जलक्षेत्र यांसाठी ७०:३० या प्रमाणात वाटप करावे.

२) राज्यामध्ये राज्यस्तरीय योजना, प्रदेशस्तरीय योजना, जिल्हास्तरीय योजना व गटस्तरीय योजना असे योजनांचे चार स्तर असावेत.

३) प्रादेशिक विकास मंडळाकडून विभाज्य साधनसंपत्तीच्या प्रादेशिक संकोषापैकी जिल्हा नियोजन समित्यांना व गटांना समितीच्या नियतवाटप सूत्राचा वापर करून नियतवाटप करण्यात यावे.

४) प्रादेशिक विकास मंडळाची पुनर्रचना करून ती कार्यक्षम करावी.

५) नागपूर कराराच्या पालनाच्या अनुषंगाने अनेक संचालनालये औरंगाबाद येथे स्थलांतरित करण्यात यावीत.

६) मराठवाड्याकरिता प्रादेशिक पाणलोट क्षेत्र अभियान निर्माण करावे.

७) मराठवाड्याकरिता कापूस अभियानाची स्थापना करावी.

८) मराठवाड्याकरिता फलोत्पादनाचा विकास करण्यासाठी पुढील पाच वर्षांसाठी प्रादेशिक फलोत्पादन मिशनची स्थापना करावी.

९) वैरण व पशुधन यांमध्ये स्थैर्य आणण्याकरिता पुढील पाच वर्षांसाठी वैरण व पशुधन विकास अभियानाची स्थापना करावी.

१०) प्रत्येक प्रदेशाकरिता एक 'शेतकरी महिला प्रशिक्षण' संस्था असावी.

११) राज्यातील संशोधनाला चालना देण्यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या धर्तीवर रु. ५०० कोटींच्या प्रारंभिक अनुदानासह 'महाराष्ट्र कृषी संशोधन परिषद' औरंगाबाद येथे स्थापन करावी.

१२) प्रदेशातील कृषी-उद्योगाच्या विकासावर भर देण्यासाठी सध्याच्या महाराष्ट्र कृषी औद्योगिक

विकास महामंडळाच्या जागी चार प्रादेशिक कृषी-उद्योग विकास महामंडळे स्थापन करावी. त्यातील एक मराठवाड्यासाठी असावे.

१३) राज्य शासनाने, परभणी-हिंगोली-वाशिम हा संपूर्ण प्रदेश 'वस्त्रोद्योग प्रदेश' म्हणून जाहीर करावा आणि या जिल्ह्यांसाठी एक विशेष एकत्रित धोरण लागू करावे.

१४) दूरगामी विकासाचे पैलू लक्षात घेऊन ते पूर्ण करण्यासाठी शहरातील रस्ते, उड्डाणपूल, पाणी पुरवठा, मलनिःसारण, परिवहन आगार, क्रीडा संकुल, उद्योग केंद्रे, पर्यटकांना आकर्षित करणारी स्थळे आणि हरित शहरे बनवणे याकरिता एक स्वतंत्र 'औरंगाबाद प्रादेशिक विकास प्राधिकरण' स्थापन करण्यात यावे.

१५) शेंद्रा आणि जालना यांमधील औद्योगिक वसाहतीसह औरंगाबाद-जालना हा एक औद्योगिक पट्टा, म्हणून विकसित करण्यात यावा.

१६) मराठवाडा प्रदेशाकरिता, न्यायाधिकरणाचा निवाडा पाण्याच्या वापराचे प्रमाण निर्बंधित करतो. तर या निवाड्याचे पुनर्विलोकन करण्यात यावे.

१७) आरोग्य क्षेत्रात प्रादेशिक असमतोल आहे. तुटीच्या मोजमापाच्या परिभाषेत आरोग्याची अंदाजित तूट ही विदर्भ (१२१.८), मराठवाडा (१०८.९) आणि उर्वरित महाराष्ट्र (६९.३) इतकी आहे. ती तूट भरून काढावी.

१८) 'मराठवाडा पर्यटन विकास महामंडळ' स्थापन करण्यात यावे.

१९) 'शेतमजूर महिला प्रशिक्षण संस्था' मराठवाड्यातील बीड येथे सुरू करण्यात यावीत.

२०) मराठवाड्यामध्ये तूर, मिलेट व कापूस तंत्रज्ञान संशोधन केंद्र स्थापन करण्यात यावेत.

२१) मराठवाड्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी वैतरणा नदीचे पाणी आणावे. कापसाच्या पिकाची खोल काळी माती असणाऱ्या क्षेत्रांसाठी पाईपलाईनद्वारे पाण्याचे वितरण करणे.

केळकर समितीने अहवालाच्या अंमलबजावणीसाठी कालबद्ध कार्यक्रम ठरवून दिला असून २०२७ पर्यंत अपेक्षित उद्दिष्टे साध्य करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तथापि, अद्यापपर्यंत केळकर समितीचा अहवालातील शिफारशी शासनाने लागू केल्या नाहीत. या समितीने प्रामुख्याने प्रादेशिक असमतोल करण्यावर भर दिला. यामध्ये त्यांनी वैद्यकीय शिक्षण, तांत्रिक शिक्षण इ.भर देऊन युवकांच्या रोजगारनिर्मितीनजक कौशल्यावर भर दिला आहे. तसेच सिंचनावरसुद्धा अधिक भर दिला आहे. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक मंडळाची पुनर्रचना करावी, असे सुचविल्यामुळे निश्चितच प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होईल. व्यावसायिक कृषी प्रशिक्षण संस्था, शेतमजूर महिला प्रशिक्षण संस्था, कृषी महाविद्यालये व तंत्रनिकेतन, कृषी विस्तार सेवा, इ. शिफारशीमुळे मराठवाड्यासारख्या कमी पर्जन्यमान असलेल्या प्रदेशाचा विकास होण्यास मदत होईल. शेंद्रा आणि जालना यांमधील औद्योगिक वसाहतीसह औरंगाबाद-जालना हा एक औद्योगिक पट्टा विकसित करून मराठवाड्याच्या सर्व औद्योगिक वसाहती जवाहरलाल नेहरू पोर्ट Trust, नवी मुंबई जोडावे, या शिफारशीमुळे मराठवाड्याचा औद्योगिक विकास होण्यास मदत होईल.

तथापि, या अहवालामध्ये मराठवाड्याच्या ऐतिहासिक बाबींकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. कारण विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र हा साधारणपणे मागील दोन शतकापासून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असल्यामुळे त्या प्रदेशामध्ये रस्ते, सिंचन सुविधा इ. पायाभूत संरचना जास्त आहेत. परंतु मराठवाडा निजामांच्या अधिपत्याखाली असल्यामुळे याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे होते. या समितीच्या

अहवालानुसार उर्वरित महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न १ मानल्यास मराठवाड्याचे दरडोई उत्पन्न ०.६० इतके आहे. त्यामुळे विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र यांच्या तुलनेत मराठवाड्याच्या विकासाकडे लक्ष देणे अधिक आवश्यक आहे. एकदंरीत सदर समितीचा अहवाल सन २०१५ मध्येच स्वीकारून त्यानुसार कार्यवाही केली असती तर आज रोजी निश्चितच मराठवाड्याचे चित्र विकासात्मक दिसून आले असते.

या अहवालावर विधिमंडळात चर्चा होत असताना तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सांगितले की, राज्य सरकार डॉ. विजय केळकर समितीचा संतुलित प्रादेशिक विकासाचा अहवाल 'जशास तसे' अंमलात आणू शकत नाही. कारण त्याचे मापदंड संविधानात नमूद केलेल्या निकषांशी जुळत नाहीत. जर हा अहवाल जसाच्या तसा लागू झाला तर मराठवाडा आणि विदर्भावर मोठा अन्याय होईल, असे ते म्हणाले. तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने स्थापन केलेल्या केळकर समितीने संतुलित प्रादेशिक विकासासाठी काही शिफारसी दिल्या आहेत आणि डिसेंबर २०१४ मध्ये राज्य सरकारने हा अहवाल स्वीकारला. 'समितीने तहसीलला आपले एकक मानले आहे, तर संविधान प्रादेशिक असमतोलाबद्दल बोलते. त्यामुळे, आम्ही अहवाल जसा आहे तसा स्वीकारू शकत नाही आणि त्याची अंमलबजावणी करू शकत नाही', असे फडणवीस म्हणाले. 'जर समितीच्या शिफारशी लागू करायला सुरुवात केली तर मराठवाडा आणि विदर्भावर मोठा अन्याय होईल म्हणून आपण ते जसेच्या तसे लागू करू शकत नाही', असे फडणवीस म्हणाले.

एप्रिल २०१५ मध्ये प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना मुनगंटीवार म्हणाले की, ''विधिमंडळात सविस्तर चर्चा होईपर्यंत त्यांच्या शिफारशींवर कोणताही निर्णय घेता येणार नाही.'' त्यानंतर शासनाने सदर उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी व त्यानुषंगाने प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन अहवालातील शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात, अहवाल सादर करण्यासाठी शासनाने दि. १७ जानेवारी, २०१५ रोजी मा. मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली आहे. सदरील उपसमितीचा अहवाल अद्यापपर्यंत आलेला नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**


- महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, ऑक्टोबर २०१३.
- श्री. निंबाळकर अजित, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली पुणे इंटरनॅशनल सेंटर, यशदा, बाणेर रोड, पुणे येथे दि.२ जानेवारी, २०१५ रोजी महाराष्ट्रातील प्रादेशिक समतोल विकासाबाबत श्री. केळकर समितीच्या अहवालावरील गोलमेज परिषदेतील मुलाखत.
- श्री. केळकर, अध्यक्ष, तेरावा वित्त आयोग, भारत सरकार यांनी अध्यक्षतेखाली पुणे इंटरनॅशनल सेंटर, यशदा, बाणेर रोड, पुणे येथे दि. २ जानेवारी, २०१५ रोजी साम टी. व्ही. ला दिलेली मुलाखत, दि.२ जानेवारी, २०१५.
- श्रीमती कुलकर्णी अंजली यांचा केळकर समितीबाबत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई या वेबसाईटवर प्रकाशित लेख, दि. १३.९.२०२२.


◆

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२–२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२–२४३२ ५९३१ ई–मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना–विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित–संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास–रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला– के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई–बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी मनःपूर्वक शुभेच्छा



**प्रा.(डॉ.) सौ.अस्मिता प्रधान** – गारगोटी

**श्री गणेश टेकळे** – कोल्हापूर

**डॉ. गजानन खामकर** – सातारा

**श्री निलेश गुरव** – सातारा

**प्रा. प्रशांत गांजवे** – विटा

**श्री अमृत चव्हाण** – कोल्हापूर

**श्री गौरव पवार** – सातारा

**डॉ. आशुतोष राराविकर** – मुंबई

**श्रीमती वनिता बनकर** – छ. संभाजीनगर

123Freevectors

मूल्य : रु. १०/– (सभासदांकरिता विनामूल्य)

भारती मुद्रणालय, कोल्हापूर